फायदा होतो. परंतु जरूरीमुळें किंवा खुशीनें असें करण्यांत येईल तेव्हां पुष्कळ पिढ्यांपर्यंत अरबी वळू देत गेलें पाहिजे.

सामान्य नियम ह्मटला ह्मणजे एका जातीची मादी व दुसरे जातीचा नर असें प्रथम असणें अवश्य आहे. ही गोष्ट कबूल झाल्यावर पुढें औलाद शुद्ध ठेवण्याकडे लक्ष दिलें पाहिजे. आणि या कारणासाठीं एकाच जातीचे आणि शक्य असेल तेव्हां एकाच वंशाचे वळूचा नेहमीं उपयोग केला पाहिजे. कारण बिजाची वारंवार बदलाबदली केली तर त्यापासून मिश्र जाती झाल्यावांचून राहणार नाहींत आणि ती औलाद निरुपयोगी व निः संशय नाहींशी होणारी आहे.

वळूघोड्याची सामान्य जतन करण्याबाबद.

खाणें—या घोड्यांस चांगली नुसती चंदी व वैरण पोटभर दिली पाहिजे. प्रत्येक जनावरास चंदी देणें ती त्याची कद, उमर, बांधा व पाचक शक्ति पाहून व ऋतु कोणता आहे तें व तो किती खर्ची पडतो तें मनांत आणून दिली पाहिजे. मोठे वयाचे घोड्यांस तरण घोड्यापेक्षां बहुशः अधिक चंदी पाहिजे. तसेंच ज्या घोड्यांस घोड दौडींत फार घातलें असेल त्यांस ज्या घोड्यास घोड दौडींत घातलें नसेल त्याहून जास्ती चंदी पाहिजे. जे घोडे भरपूर खर्ची पडत असतील त्यांस त्यांच्यानें जिरवेल तितकी चंदी दिली पाहिजे. चंदी अधिक झाली तर घोडा पोहोटी करतो आणि तिला घाण येते. असें झालें ह्मणजे चंदी कमी करून कांहीं दिवस मामूल वैरण शिवाय कांहीं ओला चारा व भुसा दिला पाहिजे असें समजावें. बद्ध कोष्ट झालें असेल तेव्हांही सदर्हू प्रमाणेंच केलें पाहिजे. मध्यम कदीचे अरबी घोड्याचे चंदीची सीमा ६ रत्तल आणि इंग्लंद देशांतील किंवा इंग्लिश वसाहतींतील मोठे घोड्यांचे चंदीची सीमा १२ रत्तल

समजावी. ज्या ज्या प्रकारचें धान्य देण्यांत येत असेल तें सर्व मिळून चंदीची ही सीमा समजावी.

चंदीचे भेद—या इलाख्यांत चणे देण्याची चाल फार आहे, आणि एकंदरीनें विचार केला तर ही चंदी सर्वांहून चांगली वाटते. परंतु दक्षिण भागांत कुळथी देतात ती बहुत अंशीं चण्या सारखीच चांगली आहे परंतु ती उकडून दिली पाहिजे.

बाजरी केव्हां केव्हां देतात आणि ती देण्यास हरकत नाहीं. बाजरीच्या भाकरी करून तिंत पौष्टिक पदार्थ घालून त्या दिल्यावर थंडे झालेले घोडे ताजे व कुवतदार होतात.

मठ—हेंही पौष्टिक व उपयोगी धान्य आहे. मठ भरडून चांगले भिजविले पाहिजेत, ते न भिजले तर त्यापासून अपाय आहे.

सातू देण्याचा बहुधा कमी प्रकार आहे. चंदी ह्मणून नुसते सातू कधीं देत नाहींत, परंतु केव्हां केव्हां चण्या बरोबर ते दिले असतां घोडे ताजे होतात.

कोंडा (गव्हाचा)—कोंड्याचा खिचडा चांगला उकडून दिला असतां तो सारका प्रमाणें उपयोगी पडतो. घोडा भरपूर खर्ची पडत नसेल तेव्हां चंदीचे कांहीं अंशाचे ऐवजीं तितकेच वजनाचा कोंडा दिला असतां चालेल परंतु कोंडा क्वचित चांगला उकडतात. चांगला न उकडलेला कोंडा पुष्कळ दिला तर त्यापासून बद्धकोष्ठ होऊन पोटशूळ होण्याचें भय आहे.

वैरण-सुकलेलें गवत व कडबा व हारळी या वैरणी निरनिराळे ठिकाणीं व निरनिराळे ऋतूंत निरनिराळ्या प्रकारच्या असतात. घोड्यास सर्वोत्कृष्ट मिळणारी वैरण कोणती हें नेहमीं फार लक्ष लावून ठरविलें पाहिजे. रोजचे वैरणीचें मान घोड्याची कद व वैरणीचा प्रकार पाहून कमजास्त ठरविलें पाहिजे. १९ रत्तलांपासून २९ रत्तलांपर्यंत

रोमचें सामान्य मान आहे. कडबा सर्व वैरणीपेक्षां अधिक पौष्टिक आहे. सुकलेली हारळी त्याहून कमी पौष्टिक आहे आणि सुकलेलें गवत सर्वांपेक्षां कमी पौष्टिक आहे. घोडे मुशाफरी करीत असतील तर वैरणीची नासाडी होते यास्तव नित्याचे मानापेक्षां त्यांस जास्ती वैरण त्यावेळीं दिली पाहिजे.

ओलाचारा—लुसर्न (विलायती गवत) व गाजरें हीं मिळत असतील तेव्हां थोडकीं थोडकीं दिलीं असतां घोडे निरोगी राहतात. घोडे अजारी किंवा अशक्त झाले असतील तेव्हां हीं अधिक दिल्यास चिंता नाहीं. प्रायः लुसर्न १० रत्तलांहून जास्ती देऊं नये, व गाजरें ५ पांच रत्तलांहून जास्ती देऊं नयेत. घोडे अजारी वगैरे असतील तेव्हां हीं दुपट द्यावीं.

गाजरानें घोडा थंडा होतो अशी एतद्देशीय लोकांची समजूत आहे परंतु ही खरी असण्याचा संभव नाहीं. तथापि त्यांच्या पोकळ समजुती वारंवार मनास आणाव्या लागतात.

ओली हारळी शुद्ध खचित मिळेल तर ती फार चांगली आहे परंतु असें कधीं घडत नाहीं. गवत कापणारे भेळलेली ओली हारळी आणतात ती भयकारक आहे यास्तव ती वर्जणें बेहत्तर आहे.

मसाला—घोड्यांचे एतद्देशिय मालकांस व मोत्तदारांस मसाले देणें फार आवडतें परंतु ते नेहमीं किंवा वारंवार देणें घोड्यास फार अपकारक आहे. घोड्यांस चेतना होण्यासाठीं व त्यांची कुवत वाढविण्यासाठीं मसाले देतात आणि त्यापासून याप्रमाणें फळ कांहींवेळपर्यंत कदाचित झालें तर होईल. परंतु शेवटीं त्यापासून त्यांची शक्ति फार कमी होते. घोडा अजारी असल्या वांचून मसाले कधीं देऊं नयेत आणि तेव्हांही देणें ते वैद्याची सल्ला घेऊन मात्र द्यावेत.

मीठ—मीठ फार हितकारक आहे आणि ते घोड्यांस दररोज

द्यावें. घोड्याचे मर्जीस येईल तेव्हां त्याणें मीठ चाटावें ह्मणून सैंधवाचा खडा त्याजपुढें ठेवणें ही मीठ चारण्याची सर्वांहून चांगली रीति आहे. परंतु ही न चालली तर १। तोळा मीठ दररोज त्याचे चंदींत द्यावें.

सामान्य सूचना—अन्नांत केव्हां केव्हां थोडका फेरफार करणें मनुष्या सारखें घोड्यासही योग्य व सुखावह आहे. परंतु फेरफार करणें ते एका एकी व मोठे करूं नयेत.

पाणी—पाणी शुद्ध व गोड देण्याविषयीं जपणें अवश्यक आहे. वाहते ओढ्याचें किंवा विहिरीचें पाणी मिळेल तर दुसरें देऊं नये. सांचलेलें पाणी चालेल तोंपर्यंत वर्ज करावें. घोड्यांस चंदी देण्यापूर्वीं पाणी नेहमीं देणें हें अवश्य आहे. चंदी दिल्यानंतर पाणी देणें फार भयकारक आहे व तसें केल्यानें पुष्कळ घोडे मेले आहेत. या गोष्टी विषयीं एतद्देशिय लोकांची समजूत बहुतकरून उलटी आहे व या विषयीं ते फार आग्रही आहेत. परंतु या बाबतींत त्यांच्या पोकळ समजुती कधीं कबूल करूं नयेत. वर सांगितल्याप्रमाणें मोत्तदारांकडून करविण्या विषयीं सक्त तजवीज ठेवणें जरूर आहे.

उन्हाळ्यांत घोड्यांस दिवसांतून तीन वेळां पाणी द्यावें, ह्मणजे एकदां सकाळीं फिरून आल्यावर, मग सकाळचे ११ वाजतां (चंदी देणें ती बारा वाजतां द्यावी); आणि पुनः सायंकाळीं फिरून आल्यावर द्यावें. फारच गर्मी असेल त्याजागीं व फार गर्मीचे ऋतूंत रात्रीस घोडा शेजेस येण्या पूर्वीं आणखी पाणी दिलें असतां तें त्यास मोठें सुखावह होईल. हिंवाळ्यांत दिवसांतून दोनदां पाणी दिलें असतां पुरें ह्मणजे सकाळचे व संध्याकाळचे चंदीचे वेळाचे अर्धा कलाक अगोदर द्यावें. सकाळीं पाणी देणें तें फारच थंड देण्यांत येऊं नये ह्मणून तजवीज ठेवावी. सगळ्या पेक्षां चांगली रीति ह्मटली ह्मणजे गोडे पाण्याचें मोठें पिंप नेहमीं घोड्याजवळ ठेवावें.

व्यायाम (फिरावयास नेणें)—सरकारी वळू घोड्यास व्यायामाची जरूरी आहे परंतु तिजकडे बहुधां दुर्लक्ष होतें. व्यायाम न झाल्यानें घोड्यांस अन्न बरोबर पचत नाहीं. ते रोड होतात. अजारी नसणारे प्रत्येक घोड्यास सकाळीं व सायंकाळीं निदान एक तास चांगले जलद कदम कदम न्यावें, अथवा शक्य असेल तेव्हां कांहीं अंतरावर त्यास फिरावयास नेणें बेहत्तर आहे. दिवसांतून दोनदां चार चार मैल फिरावयास न्यावें अथवा सकाळचे ५ मैल आणि सायंकाळीं ३ मैल न्यावें. मोत्तदार चांगला व विश्वासू असेल तेव्हां घोड्यास फिरावयास नेतेवेळीं त्यास त्यावर बसूं दिलें तर फायदा आहे, परंतु त्याणें घोड्यास नुमतें कदम कदम नेलें पाहिजे.

मालीश करणें—घोड्याचे मालिशीकडेही देखरेख ठेवली पाहिजे. घोडा अगदीं निरोगी व ताजा राहण्यास अन्न व व्यायाम अवश्य आहे तशी मालीशही अवश्य आहे. मालीश करणें ती मुख्यत्वें करून घोड्याचे ब्रुमानें व हाताळीनें करावी. जातवंत घोड्याचे पातळ कांतडीवर खरारा करणें जरूर नाहीं, तो केल्यानें दाहा होऊन नुकसान होतें. चांगले मालिशीची परीक्षा ह्मटली ह्मणजे चकचकीत पांघरूण घेऊन त्यानें मालीश केलेल्या घोड्याचे केंश उलटे घांसले असतां त्या पांघरुणास डाग पडूं नये व आयाळींत व शेपटांत मळ असूं नये.

धुणें—धुण्याची चाल निरुपयोगी व भयकारक आहे. मालिशीचें काम धुतल्यानें कधीं होत नाहीं ह्मणून धुणें निरुपयोगी आहे. धुतल्यानें घोड्याचे सांधे धरण्याची व कुमरी व शेंबा व बरसाती व ग्रीस (पायांचे खुरींत रस उतरतो तो) वगैरे रोग होण्याची भीति आहे ह्मणून धुण्याची चाल भयकारक आहे. धुण्याविषयींही मोत्तदार फार आग्रही असतात. धुतल्यानें मेहनत वाचते असें त्यांस वाटतें. फिके, करडे व पांढरे घोड्यांचे आंगावरील डाग धुवून काढण्या वि-

षयीं मोत्तदार मबूत होतात, परंतु त्यांस इतर रंगाचे घोड्यांपेक्षां जास्ती जोखीम आहे. कारण वर लिहिलेले रोग होण्याची त्यांस जास्ती भीति आहे. घोड्यास धुणें ही चांगली गोष्ट आहे असें पुष्कळ अंमलदार वगैरे यांचें मत आहे, परंतु ही त्यांची चुकी आहे. घोड्याचीं कांतडीं खरोखर स्वच्छ करण्यासाठीं धुणें हा उपाय व्यर्थ आहे हें जरा विचार केला असतां सहजें लक्षांत येईल. बाहेरील मळ केंशांतून काढून टाकणें इतकें मात्र धुण्यापासून होतें. आंगाचा मळ व दारणा काढून टाकणें हा मालिशीचा हेतु आहे. परंतु घोड्यास धुतलें असतां त्याच्या कांतडींवर आंगचे मळाच्या व दारणाच्या खपल्या पूर्वीं पेक्षां अधिक घट्ट बसतात. धुतल्यापासून भय आहे हें पुष्कळ वर्षांचे अनुभवावरून सिद्ध झालें आहे.

या देशांतील सरकारी सर्व तबेले फार उघडे असतात. घोड्यास धुतल्या नंतर त्याला पुसून कोरडें करण्याकडे मोत्तदार दुर्लक्ष करितात यास्तव घोड्यास वारा न लागे अशी बरोबर तजविज ठेवणें बहुतकरून अवश्य होतें; आणि या मुळें सदरीं लिहिलेलें भय उत्पन्न होतें. आपली मेहनत वाचावी ह्मणून मात्र मोत्तदार घोड्यांस धुतात. परंतु धुण्याचें काम बरोबर केलें तर मामूल मालिशीपेक्षां तें अधिक मेहनतीचें आहे. कारण घोड्यास धुतल्या नंतर त्याचे सुरक्षीतपणासाठीं त्याला प्रथम पुसून अगदीं कोरडा केला पाहिजे. मग त्याजवर भुरका घालून त्याला थोडासा घाम येई तोंपर्यंत त्यास दुडकी चालीनें चालविलें पाहिजे. मग त्याला पुनः पुसून कोरडा करून बारिक भुरकी घालून व त्याचे कांतडींची उष्णता स्वाभाविक उष्णतेप्रमाणें होई तोंपर्यंत त्यास फिरविलें पाहिजे.

खुर साफ वगैरे करणें हें मालिश करण्याचा मुख्य भाग आहे. खुरांतून कचरा दिवसांतून निदान दोनदां उकरून काढला पाहिजे

आणि ते नेहमीं स्वच्छ व कोरडे राखिले पाहिजेत नाहींतर रोग खचित होईल. त्यांत ज्या घोड्याची नालबंदी नियमानें होत नसेल त्यास तर विशेषें करून रोग होईल असे प्रसंगीं नालबंदी न करणें हितावह आहे. परंतु बहुतेक विलायती घोडे आणि ज्या घोड्याचे खूर नाजूक किंवा चापटे असतात त्या सर्व घोड्यांस नालबंदी केलीच पाहिजे; आणि ती महिन्यांतून एकदां शक्य असेल त्या प्रमाणें नेमानें केली पाहिजे व चांगल्यांत चांगला जो नालबंद सांपडत असेल त्याला बोलाविण्याची तजविज ठेविली पाहिजे. चांगले मोठे नाल बसविण्याची व खुराचे बाहेरचे आंगास कानसीनें न घासूं देण्याची आणि तळवा व पुतळी न सोलूं देण्याची तजवीज घोडे स्वाधिन असणारे मनुष्यांनीं ठेवली पाहिजे.

पसू घोड्या.

पसू घोड्या काढण्यापूर्वी त्यांची जतन करण्याबाबद.

पसू घोड्यांविषयीं घोड्यांचे एतद्देशीय मालक थोडकाच विचार करतात. त्यांस फारच लठ्ठ ढमाल होऊं देऊं नये कारण तशा झाल्या असतां त्या बहुतकरून सबर होत नाहींत. तसेच त्यांजकडून फार काम घेऊं नये व त्यांस अर्ध्या उपाशीं मारूं नये व रोड होऊं देऊं नये, याखेरिज दुसरी कांहीं तजवीज ठेवणें जरूर नाहीं. वर सांगितलेल्या दोन्ही प्रकारच्या स्थितीपेक्षां जी मादी चांगलें अन्न व मोकळी हवा व पुष्कळ व्यायाम असल्यामुळें चांगलें स्थितींत असते ती मामूल वेळीं हातेणास येण्याचा व ती काढविली असतां सबर होण्याचा व कष्ट पडल्यावांचून किंवा जोखीम झाल्यावांचून निरोगी शिंगरूं पसवण्याचा अधिक संभव असतो.

मादी काढविल्यानंतर तिची जतन—मादी सबर असेल त्या·

वेळीं तिला पोटभर खाणें दिलें पाहिजे, परंतु मर्यादे बाहेर देऊं नये. तिला पुष्कळ चालीनें फिरवावें परंतु फार पळवूं नये. तिला वाईट हवा लागूं न देतां पुष्कळ मोकळी हवा दिली पाहिजे. पहिले साहा महिनेपर्यंत तिजजवळून मामूल काम घेण्यास हरकत नाहीं. पुढें तीन महिनेपर्यंत काम घेणें तें हलकें व हळू हळू घेतलें पाहिजे. शेवटले दोन महिने पर्यंत नुसते फिरविण्यापेक्षां किंचित् जास्ती असलें ह्मणजे पुरे. परंतु तिला जितकें अधिक फिरविलें तितकें बरे पडेल. कांहीं प्रांतांत सवर माद्यांस त्यांत विशेषें करून ज्या माद्या मोठ्या किंमतीच्या असतात त्यांस उजेड व हवा न लागे अशा कोंडून ठेवतात. त्यांस फारच खाऊं घालतात व त्यांस फार फिरवित नाहींत. परंतु ही रीति खाली लिहिलेले रीतपेक्षां मादीस व पुढें होणारे शिंगरास अधिकच नुकसानकारक आहे, ह्मणजे सवर घोड्यास चरण्यासाठीं जंगलांत मोकळें सोडून देण्याचे रीतिपेक्षां अधिक नुकसानकारक आहे. माद्यांस चरण्यासाठीं जंगलांत सोडणें हें बहुतकरून त्यांस अर्धे उपाशीं मारणें आहे.

पसवणें—पसवते वेळा माद्यांस एकट्या ठेवणें हें इतर सर्व गोष्टींपेक्षां अधिक जरूरीचें आहे. मादीस खुलाशाची जागा असली व तिचे वाटेस कोणी न गेलें ह्मणजे तिचें पसवणें यथास्थित होतें. मदत क्वचितच लागते आणि अज्ञानानें कारणावांचून मदतीस गेलें असतां नुकसान होतें आणि कदाचित शिंगराचे जिवास जोखिम होते.

पसवल्या नंतर—निरनिराळे ठिकाणीं निरनिराळ्या पुष्कळ मनःकल्पित तजविजी घोडीचे व नवीन उपजलेले शिंगराचे हितासाठीं लोक करितात. त्यांपैकीं कोणत्याही तजविजी पासून नुकसानी आहे असें मला माहित नाहीं, वास्तव रुढी सर्वांत बलवत्तर आहे. तित

दखलगिरी करूं नये हेंच बेहत्तर आहे. परंतु पसवतेवेळीं कांहीं दखल करण्याची जरूरी नाहीं, त्याचप्रमाणें पसवल्या नंतरही कांहीं दखल करणें जरूर नाहीं. स्वाभाविकरित्या जें होणें तें होऊं देणें हीच मुख्य गोष्ट आहे. लीद मोकळी व्हावी ह्मणून मादीस मऊ व ओला चारा माफक द्यावा. तिस हवेंत पुष्कळ मोकळें फिरूं द्यावें. या खेरिज पहिले दोन महिने पर्यंत आणखी कांहीं तजविज करणें जरूर नाहीं.

पसू घोडीच्या गर्भाशयाचें वर्णन.

व्हेजायना ह्मणजे योनि व तिच्या दोन्ही किनाऱ्यास व्हलव्हा ह्मणतात. हिच्या खालीं अंडाशया सारखे तिन पडदे आहेत त्यांस कलटिव्हर्स ह्मणतात. व्हेजायना ह्मणजे योनि ही नळी सारखी असून अठरा इंच लांब आहे. हिचे आंत म्यूकसमेमरन ह्मणून पातळ वस्तु निघणारा एक घडी सारखा पडदा आहे. ज्यावेळेस गर्भ राहून वाढूं लागतो त्यावेळेस म्यूकसमेमरन हा पडदा रुंद होत जातो. व्हलव्हा ह्मणजे योनीचा किनारा यापासून योनीचे आंत चार इंचाचे अंतरावर एक थैली आहे व तिचे तोंडावर एक पडदा आहे. योनीच्या तळाशीं एक भोंक आहे त्यासही व्हेजायना ह्मणतात त्याचे खालीं बच्चेदानीची गर्दन असून त्यांतही म्यूकसमेमरन ह्मणून घडी सारखा राहणारा पडदा आहे. त्याचे तीन भाग असे आहेत कीं, नेक ह्मणजे (मान), बाडी (शरिर) व हार्न ह्मणजे (शरिराचें तोंड). ह्या प्रत्येकांत एकेक पडदा आहे त्याचीं नांवें पेरिटोनिय, मसक्यूलर व म्यूकस हीं होत. शरिराचे तोंडापासून एक नळी निघते तिस पेलोपोनेयमयूब्ज ह्मणतात. त्याचे तोंडावर झुबक्या सारखी एक वस्तु आहे तिस फ्रिंज ह्मणतात. तिचे खालीं ओव्ह-

रिज ह्मणून पेल्यासारखी थैली आहे त्यांत बिनाचा आकार होतो व ज्यावेळेस घोडा घोडीशीं संग करतो त्या वेळेस ग्ल्यान्डपेनिस ह्मणजे घोड्याच्या शरिराचें तोंड ह्मणजे शिश्नाचें तोंड व घोडीच्या योनीचें तोंड यांचा बचेदानीशीं ह्मणजे गर्भाषयाचे तोंडाशीं मिळाफ होतो. नंतर घोड्याचें रेत गर्भाषयांत मानेच्या नळीवाटे ओव्हरिजांत ह्मणजे पेल्यासारख्या थैलींत जाऊन पडतें. नंतर पुढें गर्भ वाढण्याचे जागेंत येऊन राहतें. तेथें गर्भ मोठा होऊन मग बचेदानींत येतो व शिगराचें तोंड व्हेनायना ह्मणजे योनि हिच्याजवळ राहतें. ओव्हरिज ह्मणजे पेल्यासारखी थैली ही जर उलटी झाली तर तिस कारपेलारिटिया ह्मणतात. ह्या थैलींतून बिज उलटें पोटांत जातें व तेथें बच्चा वाढतो तो कापून काढावा लागतो, नाहीं तर घोडी मरते. बच्चाचे वर तीन मेमरन ह्मणजे पडदे आहेत त्यांस बेलिसेन्टर ह्मणतात. पहिल्यास अमानियलमेमरन ह्मणतात ह्यांत पाणी राहते व ह्याच्यांत बच्चा तरता राहतो. दुसरा रिसेंटद्रायसेपस ही थैली बाजुला राहते व ह्याच्यांत बच्चाचा मूत राहतो. तिसरा कारडियल मेमरन हा मोठा असून ह्याचे आजूबाजूस आईचें रक्त राहतें आणखी ह्यांत आंबेलिकल कार्डस ह्मणजे बेंबीच्या शिरे पासून एक मांसाची शिर युरिकस आरटरी व्हेन ह्यापासून झालेली आहे. हिच्यापासून बच्चास खाण्यास मिळतें व बच्या वाढूं लागला ह्मणजे कार्डियल मेमरन तिसरा पडदा पातळ होत जातो व ज्या वेळेस बच्चा बाहेर येतो त्यावेळेस पहिला पडदा अमोनियल मेमरन हा फाटून जाऊन कार्ड ह्मणजे बेंबीच्या जवळील शिर ह्मणजे नाळ तुटून जाते व थोडे वेळानें सर्व शरीर बाहेर निघून येतें.

गर्भधारणाविषयीं.

आधीं घोडीस योनीचे ठिकाणीं तुपानें मर्दन करावें नंतर तिस

घोडा द्यावा आणि अनुवासन करून सात दिवस ती घोडी फिरण्यांत ठेवावी. नंतर कुडव (पावशेर), बेल फळाचें चूर्ण (२ पावशेर), माक्षिक (सोनामुखीचें भस्म) आणि दूध आढकभर इतके पदार्थ एक शेर तेलांत शिजवून त्यांत मध मिसळून तें घोड्यास पाजावें. या महातेलाचा शेरभर अंश घोडीच्या योनींत बारा बोटे जाईपर्यंत घालावा. मग अघाडा, वेखंड, बेल, शिंगरुबिज, लसूण, त्रिफळा, पिंपळी, अश्वगंधा आणि मोहऱ्या हे पदार्थ त्या तेलांत मिसळून तें घोडीस पाजावें त्या नंतर यावक व मीठ पाणी पाजावें. बेलाचें चूर्ण आणि दही व खिचडीही द्यावी पिंपळी, त्रिफळा, शिंगरुबिज, आघाडा आणि नागरमोथे ह्यांचे चूर्ग करून, तेलांत टाकावें व त्यात वेखंड, मिरे, मोहऱ्या, मिसळून तें अश्विनीच्या बस्तीच्या ठिकाणीं लावावें (मर्दन करावें) नंतर दही आणि यावक घोडीस द्यावें. या प्रकारें प्रयोग केला असतां अश्विनी गर्भिणी होते.

शीतपक्क, मेंढ आणि त्रिफळा हे द्रोणभर घेऊन कढवावेत व त्यांतील चतुर्थांश राहिल्यावर एक आढक तूप, बाघाटी, नागरमोथे, चिकणी भोई, कोहळी, जिवक, कर्षक, ज्येष्टमद, उपलसरी हे पदार्थ चूर्ग करून त्यांत टाकावेत आणि मंद विस्तवावर कांहीं वेळ ठेवावें त्याचें अनुवासन व प्राशन केलें असतां वंध्येसही संतति होते. रक्तरोहिडा, दूध, माक्षिक, कुटकी आणि वावडींग, हे एकत्र करूनत्याचें मर्दन करावें, मगत्याचा पोळी करून अश्विनीचे योनींत घालावी. नंतर अश्वाचा योग करून पाण्यांत तिचें डोकें बुडेल अशा स्थळीं तिस स्नान घालावें. असें केलें असतां घोडी गर्भिणी होईल.

गर्भिणीचें लक्षण—योनींत अश्वाचें विर्यग्रहण करतेवेळीं तृप्तता. व नेत्राचे ठिकाणीं व्याकूळपणा अशीं अश्विनीस चिन्हें दिसतात. जी अश्विनी संयोगकाळीं ताडण करील, मुकाट्यानें उभी राहून काम

विकार रहीत असल्यामुळें अश्वाचा परित्याग करील, अश्व येतांच पुच्छानें आपली योनी बळकट अच्छादन करील किंवा त्योस पाहतांच जी पळून जाईल ती अश्विनी गर्भिणी आहे असें समजावें.

जिची योनी अधोभागीं शून्य असते, जी नेहमीं तेजस्वी असते जिचा गंध उत्तम येतो, जिच्या पार्श्व भागाचेठायीं कांहीं लेप दिल्यासारखें दिसतें, ती गर्भिणी होय.

जिचे शरिरावर शोभा दिसते, जी पुष्ट असते, जी आनंदयुक्त असून मंद चालते व बसतांना श्वास टाकिते, जिच्या रोमाच्या ठिकाणीं स्वच्छता व दाट रंग, क्षमा, शांती व अश्वाविषयीं निरिच्छा असते ती घोडी गर्भिणी आहे असें समजावें. अश्विनीस गर्भ धारणानंतर पहिल्या व दुसऱ्या महिन्यांत मांसाचे ठिकाणीं शोभा प्राप्त होते, ३ रे व ४ थे महिन्यांत पक्क मांसाची वृद्धि होते, ५ वे व ६ वे महिन्यांत त्वचे वरील रोम प्रसन्न दिसतात, सातवे व आठवे महिन्यांत योनी विस्तिर्ण होते, नववे महिन्यांत पाय व त्याचे खालचे भाग वृद्धि पावतात आणि दहावे व अकरावे महिन्यांत अश्विनी प्रसूत होते.

दहा मादवान्या ह्मणजे पसू घोड्या काढविण्यास एक नर ह्मणजे वळू घोडा बस आहे. रब्बीचे हंगामीं व बरसातींत घोडी काढविली असतां शिंगरूं शक्तीवान होतें. हे महिने घोडीस हात्याण करण्याचे नसतात, सबब घोडीचे अंगांतून ह्मणजे योनींतून पाणी व रक्त जात असतें हें लक्ष्यांत ठेवावें. घोडीस गर्भ उरल्यावर तिजवर घोडा चढूं देऊं नये, चढला असतां गर्भास इजा होईल किंवा घोडी गर्भ टाकून देईल. जेव्हां घोडी गर्भ टाकिते तेव्हां पुन्हां गर्भ राहण्याकरितां तिचा कोठा औषधें देऊन साफ केला पाहिजे. घोडीस गर्भ राहिल्यावर कदाचित घोडा चढला तर जरा जल्द तिजला चालवावें परंतु तिजवर बसून चालवूं नये. तिच्या छातींतून पाणी जाऊं लागलें तर

(ह्मणजे घाम येऊं लागेल तर) छातीवर मेंदीचा पाला वाटून लावावा. पसवण्याचे वेळेस घोडीची छाती काळी पडते ती मेंदीचा पाला बांधल्यानें काळी पडणार नाहीं. घोडी पसवल्यावर तिचे शरिरांतील वार वगैरे बराबर पडली नाहीं तर तिस औषध द्यावें. क्वचित समयीं घोडी पसवली असतां दोन शिंगरें होतात, परंतु तीं वाचत नाहींत, तथापि केव्हां केव्हां वांचतात. कित्येक घोड्या पसवल्यावर शिंगरास जवळ येऊं देत नाहींत ह्याचें कारण असें कीं, लहानपणीं घोड्या काढल्या असतात किंवा प्रसुत वेळीं त्यांस वेदना फार होतात हें होय.

घोडी काढविणें ती नऊ वर्षांचा घोडा व पांच वर्षांची घोडी झाली ह्मणजे काढावी. तीन वर्षांचे आंत घोडी मुळींच काढवूं नये. तीन वर्षांचे पुढें व पांच वर्षांचे आंत घोडीस गर्भ राहिल्यास शिंगरूं अशक्त होतें.

घोडीस गर्भ राहत नाहीं त्यास औषध—भुई कोहळा, केळीच्या मुळ्या, पत्री झाडाची मुळी, बिब्याचें आंतील बीज, हीं अर्ध शेर प्रमाणें घेऊन, गाईचें दूध दोन शेर आणि साकर०००९ त्यांत मिसळून तें दोन सप्तकें द्यावें. घोडा कमी पडला असेल किंवा विर्यहीन झाला असेल तर त्यासही हें औषध द्यावें ह्मणजे त्यास पुरुषत्व येऊन घोडीशीं संग करण्यास शक्ति येते. मादवान शिंगरासाठीं भरविण्याच्या मादवानीला विण्याचे अगोदर तीन दिवस रुपच्याल मासळीचें पाणी द्यावें तें असें कीं, मासळी कपाऱ्यांत अशी शिजवावी कीं, पाणी व मासळी एक होऊन जावी. नंतर वस्त्रगाळ करून तें पाणी मादवानीला पाजावें, ह्मणजे तिचे आंतील सर्व कोठा निर्मळ होऊन, शिंगराला हाडी, मुत्रा, आंव होत नाहीं. परंतु वसंत ऋतूमध्यें घोडीस घोडा द्यावा जर तसें नसेल तर रात्रीं किंवा पहाटेस द्यावा,

असर सकाळीं व संध्याकाळीं दोन वेळा द्यावा नंतर दुसरा घोडा त्या मादवानीचे नजरेस न येईल असें करावें. तसें न केलें तर शिंगराचा रंग दुसरा होईल. जेव्हां घोडी गर्भ धरिते तेव्हां तिजवर सारा दिवस स्वारी करूं नये व तिस हिरवें गवत आणि सकाळीं व संध्याकाळीं नवे हरबरे दळून मऊ करून चारावेत. तिस दुसऱ्या घोड्यापासून जपून आणि दूर ठेवावें व महिने मोजीत असावें. पूर्णमास होण्याची इच्छा ठेऊन अकरा मासांपर्यंत जपावें. बारावा मास लागेल तेव्हां एक आठवडा पर्यंत तूप दररोज १ शेर प्रमाणें देत असावें ह्मणजे तिचीं आंतडीं रुंद होतील. हातांत धरून मादवानीला दररोज फिरवीत असावें ह्मणजे विण्याचे वेळेस सुलभ पडेल.

अश्वोत्पत्ति.

घोडी हत्याणावर (माजावर) आली ह्मणजे तिला घोडा दिल्याव-र लागलेंच तिच्या समोर चांगला घोडा उभा करतात, व तिचे आंगावरून ह्मणजे कानापासून दांडीपावेतों पाण्याची धार ओतीत आणितात तेणें करून तिच्या आंगास अगोस्ती (शाहारी) येऊन ती आंग झाडते. असें करण्याचें कारण हेंच आहे कीं, आंग झाड-ल्यानें तिच्या गर्भाषयांत जें रेत गेलें असतें तें ठरतें. नंतर ज्या ठिका-णीं मातीवर घोड्याचें शेष रेत पडलें असेल त्यांत थोडें पाणी कालवून चिखल करून तो तिचे पुठ्यावर सारवितात तेणें करून ओटा बसून घोडी योनींतून रेत बाहेर काढून टाकीत नाहीं.

घोडीस घोडा दिल्यावर वर लिहिलेली कृति करून नंतर घोडीवर बसून कोणी कोणी तिस भरधांव धांववितात व तेणें करूनही ती योनींतून रेत काढून टाकीत नाहीं. कोणी कोणी तिच्या दांडीस (शेपे-स) बोरीची फांदी लावतात. तिचे कांटे आंगास न टोंचावे ह्मणून ती

आपलें निरण आवळून धरते तेणें करून रेत बाहेर येऊं शकत नाहीं आणि गर्भ ठरतो.

घोडीस घोडा दिल्यावर दिलेला घोडा घोडीस न दाखवितां एकीकडे काढून तिला चांगला घोडा दाखवितात. याचें कारण त्या घोड्याच्या आकृती प्रमाणें अथवा रंगा प्रमाणें शिंगरूं व्हावें हें होय. चांगला घोडा न मिळाल्यास त्याची तसबीर दाखवितात. तेणेंकरून तिची च्छाया होणाऱ्या शिंगरास येते. याज करितां घोडीस घोडा देते वेळेस कुत्रे घोडी समोर येऊं देत नाहींत. कारण कुत्र्याचे छातीवर भोंवरा असतो. या साठीं घोडीनें कुत्रे पाहिले असता शिंगरास छातीवर भोंवरा होतो तो घोड्यास मोठा अयब आहे असें मानितात. त्या खोडीस ल्दूद्रावळ असें ह्मणतात. याच प्रमाणें गाढव घोडीनें पाहिलें असतां गाढवा सारखे मोठाले कान होणाऱ्या शिंगरास होतात. अशा सबबी वरून कोणतेंच जनावर घोडा देते वेळेस घोडी समोर येऊं देत नाहींत.

ज्या जातीचें शिंगरूं आपणास पाहिजे आहे त्या जातीचा घोडा जर देण्यास मिळत नाहीं तर तो घोडा खळला असतां त्याचें जें रेत जमिनीवर पडलें असेल तें घेऊन यावें आणि त्यातील माती, कचरा काढून त्यांत थोडा साळीचा कोंडा कालवून तें तापत्याचे लहान पिशवींत भरून ती पिशवी घोडीच्या गर्भाषयांत हातानें ठेऊन द्यावी आणि तो घोडा अथवा त्याचें चित्र तिला दाखवावें ह्मणजे त्या प्रमाणें शिंगरूं होतें. आतां ही पिशवी ठेवते वेळीं घोडी मात्र ऋतूवर असली पाहिजे. कदाचित् ऋतूवर नसली तर तिच्या शेजारीं एक दोन दिवस दुसरा घोडा बांधावा ह्मणजे ती ऋतूवर येते. मग ह्या प्रमाणें थैली ठेवावी.

शिंगरास हिरवा रंग खेरिज करून जो रंग आला पाहिजे त्या-

गाचें कापड पिशवीचें असावें. हा योग स्वतः अनुभवून पहाणारे बडोदें मुक्कामीं एक दोन गृहस्थ आहेत.

घोडी पसविल्यावर शुभअशुभ पहाणें.

जी घोडी रात्रौ उत्तम वेळा चौथे प्रहरीं पसवते ती धन्यास संपत्तिकारक होते. श्रावण महिन्यांत घोडी पसवली तर ती धन्याच्या आयुष्याचा व सुखाचा नाश करिते. रात्रौ पहिले प्रहरीं पसवली तर धन्याचे बंधूस वाईट, दोनप्रहर रात्रीं पसवली तर धन्याचा नाश व तिसरे प्रहरीं रात्रीं पसवली तर धन्याचे पुत्राचा नाश होतो. मूळ नक्षत्रावर किंवा वाईट वेळावर अथवा तिथीवर घोडी पसवली तर ती धन्यास दैन्य आणतें श्रावण महिन्यांत पसवलेली घोडी घरीं न ठेवतां ब्राह्मणास द्यावी. इतर महिन्यांत घोडी दिवसा पसविल्यास शिंगराचा थोडा कान चिरावा ह्मणजे त्यास दिवसा पसविल्या बद्दल बाधा होत नाहीं असें प्राचीन लोक ह्मणतात.

सूतिकोपचार.

गर्भ बाहेर निघाल्या नंतर ऋतुमाना प्रमाणें थंड किंवा उष्ण उदकानें त्यास सिंचन करावें. नंतर आईचे स्तनास लावून त्यास धरून पाजावें. गर्भ बाहेर पडत नसल्यास अथवा जरायु (पिशवा) निघत नसल्यास खालीं लिहिलेल्या औषधाचा उपयोग करावा. ज्योतिषमती, तंजवति, शंखपुष्पी, शतावरी (सावरी), भारंगी, कांगोळी आणि लांगलिका हीं औषधें समभाग करून घ्यावीं व त्यांचें मोहऱ्या सहीत चूर्ण करावें. नंतर तें अश्विनीचें शिर, कंठ आणि पुच्छ या ठिकाणीं लावावें. चांगली जळपिंपळी, बेलफळ आणि सूंठ यांचें चूर्ण करून पाण्यांत पाजावें. या उपायांनीं गर्भ लवकर पडतो. नंतर पुढें सांगितलेल्या प्रतिपादनांनीं तिचा कोठा शुद्ध करावा.

सैंधव, मद, सुंठ, मिरे व पिंपळी यांचें पानक पुर्वोन्ही पाजावें. पौष्टिक दारू, धृष्टि, गुळ आणि तेल यांचें पानक पुर्वोन्ही द्यावें. तापवलेली मद अथवा तेल, पाणी आणि तूप यांचें पानक द्यावें. या योगानें योनी आणि कोठा शुद्ध होतो. कोठ्यांत कफ आणि मळ किंवा रक्त हे मिश्रीत होऊन गर्भ निवतेवेळीं तिच्या उदरांत वायू भरतो. याकरितां अश्विनी प्रसूत झाल्यावर तिला तूप पाजावें. जव, हरळी, यावक व तुप हें तिस पथ्य द्यावें. दहावे दिवशीं अश्विनीस तिच्या शिंगरा सहीत स्नान घालावें.

घोडी पसवली ह्मणजे शिंगरूं घोडीस पिऊं देऊं नये. प्रथम एक पैसाभार लोणी, एक पैसाभार गुळ आणि सवागीची राख हरबऱ्या येवढी भाजून व बिबव्याचे तेलाचीं फुलें चार हीं सर्व मिळून शिंगरास चाटवावीं नंतर शिंगरास पाजण्याकरितां घोडीकडे सोडावें.

प्रसुतीनंतरचा उपाय—व्याल्या नंतर १ शेर तुरी शिजवून त्यांत अछेर तुप व मद अछेर घालून एक टांक बोळ घालावा आणि तें तीन दिवस मादवानीस प्रथम वेळीं द्यावें. दुसरे दिवशीं आडीच शेर गुळाची दारु पाजावी. दररोज हरबऱ्याचे ऐवजीं गहूं शिजवून द्यावेत, तीन दिवस गुजरल्यावर कांहीं दिवसांनीं हरबरे शिजवून द्यावेत. या देशांत मादवानीस सहा दिवसा नंतर धुनात, त्याचे अगोदर धुऊं नये, कारण वायूचें भय असतें. संपुट व सुंब याळा धुवावें. या सहा दिवसांत पाणी तापवून पिण्यास द्यावें. दिल्ली मध्यें हवा गरम आहे, तेथें सहा दिवसां नंतर तिचें तोंड धुतात नंतर गुळ, तुप, सुंठ व मिरे यांचा कणकेमध्यें शिरा करून ह्मणजे शिजवून आमली प्रमाणें पातळ करून पाजावा, ह्मणजे तिचा आंतील कोठा स्थीर राहील.

घोड्याला मादवानीवर सोडल्यानें घोडा कमी पडला असतो आणि मादवानीवर उडूं शकत नाहीं. त्याला पौष्टिक दिलें पाहिजे त्यास उपाय-कबस कुहिरीचें बीज पांव शेर, भुईभेट ह्मणजे भुईकोह-

ळा, लसुण पांच शेर हे तीन जिन्नस एके ठिकाणीं करून दूध व तांदूळ यांमध्यें शिजवावे व त्यांचे सात हिस्से करावे. आणि दररोज एक हिस्सा तूप व साखर यांत द्यावा असें सात दिवस करावें ह्मणजे घोड्याला पुरुषत्व इतकें येईल कीं, तो १०० मादवानी बरोबर संग करूं शकेल व हें औषध तीन दिवस रात्रीं व तीन दिवस सकाळीं साखर व तूप यांत मिसळून दिलें तर पुरुषत्व कमी झालें असल्यास अधिक होईल.

घोडी पसवल्यावर तीस तीन दिवसपर्यंत देण्याचा मसालाः— हळद आतपाव, अजवान आतपाव, कात छटाक, लसूण आतपाव, गुळ पावशेर, तेल पावशेर, बाळंतलिंबाचा पाला मुठभर हे सर्व पदार्थ बारीक करून गुळांत व तेलांत गोळ्या कराव्या. घोडीस तसदी देऊं नये. एक गोळी शिंगरूं होतांच द्यावी दुसरी दुसरे दिवशीं द्यावी आणि तिसरी गोळी तिसरे दिवशीं संध्याकाळीं द्यावी. नंतर दाणा द्यावा. दाणा हरबरे वाळलेले सुखे व घासही सुखा द्यावा. बारा दिवसपर्यंत ऊन पाणी पाजावें व सावलींत बांधावें.

ज्यावेळीं शिंगरूं पोटांतून बाहेर येईल त्यावेळीं शिंगराचें सुंब सुरीनें कापावें व पाय बांधावें ह्मणजे पाय वाकडे तिकडे होणार नाहींत. तीन चार दिवस शिंगरास निजवून ठेवावें, उभें राहूं देऊं नये, व दररोज पाषाणभेदाचें चाटण द्यावें. हें चाटण दोन महिनेपर्यंत सारखें देत जावें. जेव्हां तीन महिने होतील तेव्हां हिरडा गाईचे मुतांत भिजवून दररोज अर्धा दिरीम हिरडा व अर्धा दिरीम सेंदेलोण मिळून द्यावें व पाषाणभेद चाटणही देत असावें. जेव्हां चार महिन्यांचें होईल तेव्हां दररोज एक दिरीम हिरडा व एक दिरीम सेंदेलोण द्यावें. अशा प्रमाणानें दर महिन्याला जास्ती करीत जावें. पांच महिने झाले ह्मणजे शेळीचें दूध लावावें. गाईचें दूध शिंगरास वाईट आहे. एक वर्षाचें होईल तेव्हां एकशेर तूप व

एकशेर मूग, दोन दिरीम मिरे व थोडा हींग येणेंप्रमाणें मिळून द्यावें ह्मणजे शिंगराला मूत्रा, हडी वगैरे होत नाहीं. जें खाईल तें पचून जाईल, पोटांत क्रिमी होणार नाहीं. थंडीचे दिवशीं हळीव व दुध द्यावें ह्मणजे शरिराचें हड मोठें व लांब होऊन शिंगरू मोठें लठ्ठ होतें. तें शिंगरू दोन वर्षांचें झालें ह्मणजे त्यावर खोगीर ठेवून हळू हळू फिरवावें व त्यास वरील चाटण द्यावें. त्याचा आंगांतील कोठा साफ होण्यासाठीं त्यास हिरडे १२, मद १ शेर, पिंपळी ९ टांक एकत्र करून तीन दिवस द्यावें व नंतर तूप पाजावें हें चांगलें.

घोडीचे दुष्ट क्षिरास उपचार.

अश्विनीचें दूध दूषीत झाल्यास उपाय-जंबु कषाय आणि मध हे तीस पाजावेत. आंबा, उंबर वगैरे पांच वृक्षांच्या साली धुऊन त्यांचें चूर्ण करून रात्रभर पाण्यांत भिजत घालावें. नंतर प्रातःकाळीं वस्त्रगाळ करून साखर व मध मिसळून तीस पाजावें. जिरे, ओंवा, नागरमोथे, शृंगवेरे, मोहऱ्या, जंबू, अरुणी वावडींगें, चित्रक, देवदार, पिंपळी, हळद, पाडळी व शिंगरू बीज यांचें चूर्ण करावें आणि त्याचें कल्क सौविरेकासह रात्रीं तिला खाऊं घालावें. गुळ तेल आणि मिरे वाटून दारू पाजावी. हे उपाय केले असतां दुषीत दूध शुद्ध होतें.

शतावरी दररोज दोन मासे सकाळीं व दोन मासे संध्याकाळीं गाईचे निरसे पावशेर दुधांत पाजावी येणेंकरून घोडीस ज्यास्त दूध येईल; याप्रमाणें एक आठवडा पर्यंत करावें.

शिंगराचें पालन करून त्यास वाढ-विण्या बाबद.

स्तनपान करण्याची मुदत—काठेयावाडांत घोड्यांची औलाद ज्या इतर प्रांतांत होते तसे कांहीं प्रांतात शिगरें दोन महिन्यांची झालीं ह्मणजे त्यांस आईचें दूध पाजणें बंद करण्याची चाल आहे. ज्यास्ती दिवस दूध पाजलें असतां मादी अशक्त होते असें तेथील लोक ह्मणतात ही मोटी चूक आहे. इतर सर्व मोठीं स्तनोपजीवी जनावरें आपले पोरास दोन महिन्यांहून पुष्कळ अधिक मुदती-पर्यंत स्तनपान देतात. त्याचप्रमाणें इतर प्रांतांतील माद्याही दोन महिन्यांहून अधिक मुदतीपर्यंत आपले शिंगरांस पाजतात आणि यापासून माद्यांस नुकसानी होत नाहीं, उलटा शिंगरांस फायदा होतो. शिगरें दोन महिन्यांचीं असतात तेव्हां तीं फार लहान असतात, आणि त्यांचा नुसते बाहेरचे अन्नावर निर्वाह होत नाहीं. अधिक मुदती पर्यंत मादीनें शिंगरास पाजलें असतां तिच्यापासून नेमस्त काम घेण्याला हरकत नाहीं. त्यांजकडून नेमस्त काम घेणें बेहेत्तर आहे आणि त्या लहान लहान मजला जात असतील तेव्हां शिंगरें त्यांच्या बरोबर गेलीं तर तो व्यायाम शिंगराचे पाय घटलेले होण्याला व त्यांचे स्नायू व नसा मजबूत होण्याला फार हितावह होतो. मोठ्या कदीच्या व अधिक किंम-तीच्या माद्यांविषयीं व शिंगरांविषयीं जी तजवीज ठेवण्याविषयीं वर सांगितलें आहे तशी वहिवाट तर तट्टांविषयीं हल्लीं चालू आहे. आणि या कारणामुळें हिंदुस्थानचीं तट्टें फार राठ व मेहेनती अस-तात, आणि हिंदुस्थानचे घोडे फार ढिले असतात व त्यांचे पा-यांत खोडी असतात.

बाहेरचें अन्न—दोन महिने झाल्यावर शिंगराचें दूध तोडलें

नाहीं तरी त्यास कांहीं बाहेरचें अन्न देण्याचें तेव्हांपासून सुरू केलें पाहिजे. ज्यांस सामर्थ्य असेल ते लोक दुधांत भिजविलेली चंदी देतात. कोणी नुसती चंदी देतात किंवा नुसतें दूध देतात. कोणी मिळेल ती नुसती वैरणच देतात. काय द्यावें व किती द्यावें याविषयीं नियम ठरवितां येत नाहीं. परंतु शिंगरांस चांगलें खाऊं घातलें आणि त्याचप्रमाणें त्याजवळून योग्य व्यायाम करविला तर त्यापासून नुकसान होणार नाहीं. पसू घोड्यांस व शिंगरांस या देशांतील उत्तम वैरण ह्मटली ह्मणजे हर्याळी आहे. ही पुष्कळ ठिकाणीं शेतांत खुरपून काढण्यासारखी फार होते व पिकास नुकसान करते आणि ही हर्याळी उपयोगी आहे व राखून ठेवणें योग्य आहे अशी या देशचे लोकांची समजूत झाली तर त्यांचे पिकास व त्यांचे शिंगरासही मोठा फायदा होईल.

व्यायाम—घोड्यांची औलाद करणारे एतद्देशीय लोक शिंगरांकडून व्यायाम करवितील तर फारच करवितात नाहीं तर मुळींच करवीत नाहींत असें आढळण्यांत आलें आहे. पैकेवाले व घोड्यांचे शोकी परंतु रूढी धरून बसणारे काठेवाडांतील तालुकदार व गृहस्थ लोक आपले शिंगरांस पुष्कळ खाऊं घालतात आणि बंद करून ठेवतात. त्यांत बहुत करून त्यांस आंधारे तबेल्यांत किंवा घरांत बंद करून ठेवतात. यामुळें त्यांचीं शरीरें ढिलढमाल होतात. पाय लहान व नाजूक होतात; आणि त्यांस कामास लावलें ह्मणजे त्यांचे पाय खोडदार होतात. दक्षिण देशांतील गरीब शेतकरी लोक आपले शिंगरांस पुरतें खाऊं घालीत नाहींत. त्यांस अगदीं मोकळे सोडून देतात. यामुळें तीं जनावरें खुजट होतात, परंतु त्यांचे हातपाय मोठे मजबूत होतात. हीं जनावरें दिसण्यांत चांगलीं नसतात परंतु कामाला चांगलीं असतात. या दोन वहिवाटी दोन प्रकारच्या आहेत.

यांचें चांगलें मिश्रण झालें पाहिजे. जे आपले शिंगरांस हल्लीं चांगले खाऊं घालीत असतील त्यांणीं तसेंच करीत जावें परंतु त्यांस पुष्कळ मोकळीक द्यावी. आणि तीं जन्मल्या दिवसापासून त्यांस कामांत लावण्याचा वेळ येई तोंपर्यंत त्यांजकडून व्यायाम करवावा. जे आतां आपले शिंगरांस उपाशी मारीत असतील त्याणीं त्यांची मोकळीक कमी न करतां त्यांचे खाण्याकडे थोड-का पैका खर्च करावा.

शिकविणें—शिंगरांस बंद जागेंत वाढविलें असतां आणि त्यांजवळून व्यायाम न करविला असतां त्यांचा बहुधा मोड होतो. जें लहान शिंगरू खाऊन अगदीं बसलेलें असेल त्यास एकदम लादलें अगर त्यावर स्वारी केली तर त्याचे हातापायांस कांहीं तरी नुकसानी होणारी आहे. ज्या ठिकाणीं अशी वहिवाट आहे तेथील पुष्कळ घोडे रोगी असतात. त्याचें कारण हेंच आहे. शिंगरें मोकळीं ठेविलीं व त्यांजकडून व्यायाम करविला असतां त्यांचीं हाडें व नसा घट्ट व मजबूत होतात यास्तव एतद्देशीय लोक जितके कोंवळे वयांत बहुधा शिकवूं लागतात तितके कोंवळे वयांत असे शिंगरांस शिकवूं लागलें असतां फारसें नुकसान नाहीं. एतद्देशीय लोक शिंगरांस फारच कोंवळे वयांत बहुधा शिकवूं लागतात यांत संशय नाहीं. कायदा (लगाम) फार आवळून व पाय बांधून त्यांस शिकविण्याची रीति आहे. तिजपासून फार नुक-सान होतें, आणि पुढें चांगले होणारे पुष्कळ शिंगरांची खराबी होते. त्यांचे हातापायांस इजा होऊन ते नुकसान पावतात व आंखडतात, आणि स्वाभाविकरीत्या त्यांचें पाऊल पडावें तसें पडत नाहीं.

पसू घोड्यांस अडाणी रीतीनें पाय बांधून सोडतात तेणेंकरून पुष्कळ पसू घोड्या कायमच्या नुकसान पावतात व त्यामुळें त्यांची किंमत कमी होते.

शिंगे व शिंग्या यांची विक्री—या देशांत घोड्यांची कायमची चांगली औलाद होण्याची आशा खालीं लिहिलेले गोष्टीवर आहे ह्मणजे बाहेरून आणलेले वळू घोड्यापासून झालेल्या शिंग्या औलाद घेण्यासाठीं राखून ठेवणें व त्यांचे बाप ज्या जातीचे व ज्या बिजाचे असतील त्याच जातीचे व त्याच बिजाचे त्यांस घोडे देणें या गोष्टीवर आहे. यास्तव जे लोक घोड्यांची औलाद करीत असतील त्यांणीं आपल्या शिंग्या राखून शिंगे मात्र विकावे असें होण्याविषयीं होईल तितकें उत्तेजन त्यांस दिलें पाहिजे.

खच्ची करणें—शिंगे विकण्यांत न येतील तेव्हां त्यांस खच्ची करण्याचें त्यांचे मालकास समजाविणें ही मोठी अगत्याची गोष्ट आहे. यापासून अनेक मोठे फायदे आहेत. खच्ची केलेले शिंगे मोठाले घोडे होतात. ते गरीब व फार उपयोगी होतात, आणि त्यांचा वळूप्रमाणें उपयोग करण्याचें बंद पडतें, हा सर्वांहून मोठा फायदा आहे. या देशांत विचारपूर्वक योजनेवांचून माद्यांस नर देण्यांत येतात हें निरनिराळ्या औलादी खराब होण्याचें एक मुख्य कारण आहे यांत संशय नाहीं. खच्ची करण्याची चाल शेंकडो वर्षांपासून इंग्लंड देशांत चालू झाली आहे. ही चाल सर्व ठिकाणीं चालू झाली तर निवडक व जातवंत वळू खेरीज इतर नरांचा उपयोग होणार नाहीं. आणि या देशचे घोड्यांचे औलादींत चांगला परिणाम लवकर दिसून येईल.

मिश्र जातीचे घोड्यांचा वळूप्रमाणें उपयोग विशेषें करून होऊं देऊं नये, कारण शुद्ध जातीचे घोड्यांपासून मात्र चांगली औलाद होणारी आहे.

किशोरोपचार.

शिंगरू लहान असतांना त्याच्या आंगावरून व डोक्यावरून

हात फिरवून त्याला माणसाची संवय लागेलसें करावें. असें के-ल्यानें त्याचे मनांत भीति राहाणार नाहीं. लहानपणीं शिंगरास जुलाब होतात तेव्हां त्याला तांदुळाचें धुवण द्यावें, व एक ड्राम अफूचा अर्क दिवसांतून एकवेळ देत जावा, व त्यास उन्हांत बांधावें. शिंगरू जन्मलें ह्मणजे त्यास एक महिनापर्यंत मोकळें राहूं द्यावें, दोरी वगैरे लावूं नये. पुढें गळ्यास दोरी लावून आईज-वळ बांधावें, व गवत खाईल तर घालावें. घोडीस शिंगरू सहा महिनेपर्यंत पाजावें. पुढें तिचें दूध सोडावें व दूध सोडविल्यानंतर त्याला चांगलें खाण्यास देत असावें. शिंगरास थंडी होऊं नये व थंड काळांत त्याचे आंगांत गरमी राहील असें करावें. शिंगरू लीद करीत नाहीं व डोळे लाल झाले किंवा दाणा खात नाहीं तेव्हां त्याजला जुलाब दिला पाहिजे. शिंगरू जन्मल्या नंतर त्यास द्यावयाचीं औषधें खालीं लिहिल्याप्रमाणें:—

क्षौद्र (मध) लोणी मिश्र करून शिंगरास पाजावें. याप्र-माणें महिना झाल्यावर मग भोजन घालावें तें-गव्हाचें अन्न किंवा यवाचें अन्न दुधांत शिजवून तूप व मध घालून शिंगरास चारलें असतां प्रशस्त होय; अथवा सातू व मध आणि दूध हे मिश्रीत करून त्यास द्यावेत ह्मणजे पुष्टीकारक होईल. अशा योगानें केलें असतां शिंगरें वृद्धि पावतात आणि बळवान होतात, आणि शरी-रांतील अग्निदोष व प्रकृतिदोष शांत होतात. हे दोष बाळपणीं तसेच शरिरांत राहिले असतां घोड्यास व्याधी उत्पन्न होते.

शेण, मीठ, मूत्र आणि माती हे पदार्थ एकत्र करून त्यांचा लेप घोड्यास केला असतां मक्षिका, डास यांचा नाश होऊन शिंगरास सुखदायक होतो.

शिंगरास छटाक लोणी दररोज चारावें त्यांत पाणी नसा[illegible] याप्रमाणें एक महिना करावें. याशिवाय हरबऱ्याची नेमस[illegible]

संध्याकाळीं भिजत घालून सकाळीं कोरडी करून ती वाटावी आणि त्यांत गुळ किंवा साखर घालून ती द्यावी. गवत हिरवें दोन महिनेपर्यंत चारावें.

शिंगरास बळ व पुष्टी येण्यास औषध—हिरडे, सुंठ, पिंपळी, पिंपळमूळ, आस्कंदाचें मूळ, इंद्रावणीचें मूळ, हळद, वेखंड व वावडींग हीं सर्व औषधें समभाग घेऊन त्यांचें वस्त्रगाळ चूर्ण करून प्रति दिवशीं लोणी ९ टांक घेऊन त्यांत २ सप्तकपर्यंत देत जावें. हें औषध ४।५।६ महिन्यांचे शिंगरास देण्यास उपयोगीं आहे.

शिंगरास दूध पाजितात त्यामुळें अजीर्ण व अतिसार उत्पन्न होतो त्याजवर उपचार—आंब्याची साल, आंभळीची साल व पांगाऱ्याची साल या तिन्ही साली पाण्यांत वाटून त्यांचा पावशेर रस व दही पावशेर एकत्र करून पोटांत दोन दिवस द्यावें.

शिंगरास कोरडी ढांस लागते यामुळें तें अगदीं कृष होतें त्यास उपाय—आडुळसा व भारंगी यांच्या पाल्याचा रस पाण्यानें काढावा, आणि शिंगराच्या नाकांत नस्य घालावें. याप्रमाणें एक सप्तक करावें. अथवा पावशेर प्रमाणें सात दिवस द्यावें.

घोडा चारा खातो परंतु खातांना घशांत आडकतो यामुळें त्यास खोकला येऊन ढांस लागते त्यास उपाय—आल्याचा रस १ शेर, गाईचें दूध तापऊन थंड झालेलें एक शेर घेऊन व सुंठ ६ तोळे घेऊन वस्त्रगाळ करावी. ही पूड रस व दूध यांत कालवून नाकांत नस्य घालावें. नस्याच्या योगानें गळा मोकळा होऊन चारा चांगला गिळला जाईल.

ढांसीस दुसरें औषध—सापाची कात ३ तोळे गाईचे लोण्यांत कालवून तीन दिवस पोटांत द्यावी.

शिंगरूं एक वर्षाचें होईल तेव्हां त्याला लगाम देऊन हातांत [धरून] दररोज दोन वेळ फिरवावें. दुसऱ्या हातीं अवगी देऊन

मागें खुळखुळा वाजवावा ह्मणजे घोड्याला चालण्याची उमेद येईल. ज्या ठिकाणीं घोडा हुकूम अमान्य करील त्या ठिकाणीं अवगीनें इशारा करावा. कांहीं दिवसांनंतर मंडळावर धरावा. दोन वर्षांनंतर सामान घालून स्वारी करून हळू हळू फिरवीत असावें. घोड्याला आपल्या बरोबर सलगी करावी, ह्मणजे घोड्याचें व स्वाराचें मन एक होईल. नंतर त्यावर स्वार होऊन अथवा त्यास हातांत धरून मंडळावर फिरवावें.

तांडिगेपण.

लहानपणीं शिंगरास पुष्कळ हिंव लागतें, त्या योगानें पाय आंखडतात त्यास उपचार—प्रथम त्यास २० डाग * द्यावेत. ते येणेंप्रमाणें:—प्रत्येक पायास दोन प्रमाणें चारी पायास आठ, कानाखालीं मानेचे दोन्ही बाजूस दोन दोन, डोळ्याखालीं तोंडावर दोन्ही बाजूस दोन दोन, आणि गुदाचे दोन्ही बाजूस दोन दोन असे वीस डाग द्यावेत. नंतर लसूण, हिंग, हिरडे, टाकळी, वावडींग, बेखंड, भारंगी हीं प्रत्येक ७ टाक प्रमाणें घेऊन चूर्ण करून गुळांत कालवून १२ दिवस द्यावींत. मग चाऱ्ही पायांचे सांध्यांस तेल लावून मर्दावें, वर विटाचा शेक द्यावा व उन्हांत बांधावें. * डाग देणें हा उपच्यार दुसरें भागांत पहा.

शिंगरू तयार होण्याकरितां खुराक.

शिंगरास दोन महिने झाल्या नंतर आतपाव लोणी किंवा त्याच्यानें पचेल इतकें दररोज दोन महिने पर्यंत द्यावें. पुढें पावशेर प्रमाणें लोणी चार महिने पर्यंत द्यावें. एक किंवा दोन वर्षपर्यं

* टिप:—डाग देणें हा उपचार रोगचिकित्सा भागांत पहा.

सकाळीं एकवेळ पोटभर दूध पाजीत जावें. दूध पाजल्या नंतर पाणी बारा वाजतां पाजीत जावें. एक महिन्याचे शिंगरास एक-शेर, दोन महिन्यांच्या शिंगरास दोनशेर, याप्रमाणें दोन वर्षेपर्यंत दूध पचेल इतकें वाढवावें. हरभऱ्याची फसल आवीसुद्धां द्यावी. व हिरवें गवत मिळेपर्यंत द्यावें.

दुधाची क्षीर द्यावी. ती क्षीर करण्याची रीति—दूध चारशेर किंवा शिंगरास पचन होईल इतकें घेऊन त्यांत गव्हाचा भरडा पावशेर किंवा आतपाव टाकून शिजवावें. ही क्षीर चाळीस दिवस पर्यंत सकाळीं द्यावी.

रात्रीस दूध चारशेर आणून त्यांत पावशेर गहूं टाकून तें मिश्रण दोन तीन महिने पर्यंत सकाळीं द्यावें. जर हा खुराक पचला नाहीं तर शेपा एकशेर, अजवान एकशेर, सुंठ एकशेर, काळें मीठ पावशेर, काळी मिरची एकशेर, व राई एकशेर हीं सर्व कुटून गोळा करावा आणि तो मोठ्या घोड्यास पावशेर व लहान शिंगरास आतपाव याप्रमाणें रतीब दिल्यावर द्यावा ह्मणजे त्यास चांगलें पचन होत जाईल.

हरभरे भरडून रात्रीस भिजवून दररोज सकाळीं द्यावेत, किंवा मूग शेरभर भिजवून त्यांत गूळ शेरभर घालून चार दिवस द्यावेत. नंतर आछेर मूग घेऊन ते शिजवून त्यांत दीडशेर गूळ किंवा साखर घालून द्यावेत, याप्रमाणें रतीब चढवावा. मोठे घोड्यास दोनशेर मूग व दोनशेर गूळ याप्रमाणें द्यावे. लहान घोड्यास एक शेर मूग व एक शेर गूळ किंवा साखर पचेल इतकी द्यावी. अजवान एकशेर, सुहाने बीं एकशेर, राई एकशेर, पापडखार अर्धाशेर, लाल मिरच्या अर्धाशेर, सुंठ अर्धाशेर, मीठ काळें अर्धाशेर, काळी मिरची (मिरें) अर्धाशेर, बडीशोप अर्धाशेर या जिनसा कुटून

वजनमाळ कराव्यात आणि दाणा देण्याचे पूर्वी त्यापैकीं पावशेर द्याव्यात. हें औषध अनुभवलें आहे.

हरभरे भाजून त्यांत गूळ किंवा साखर घालून द्यावेत. प्रथम घोड्याचें पोट साफ ह्मणजे जुलाब देऊन शुद्ध करून नंतर सदरचा अगर कोणताही रतीब द्यावा.

आंब्याचा रस द्यावा, तो असा कीं, साळीचा भात एकशेर शिजवून त्यांत पन्नास आंब्याचा रस घालून नंतर एकशेर साखर किंवा गूळ त्यांत घालून दररोज द्यावा. चाळीस दिवसपर्यंत असा क्रम चालवावा ह्मणजे घोड्याचा रंग चांगला होईल. पिंपळमूळ, कुटकी, मिरें, वावडींगें, राई व बच्य हीं सर्व औषधें दोन दोन तोळे घेऊन बारीक करून मधांत मिळवून रोज छटाक प्रमाणें हा मसाला रस दिल्यानंतर द्यावा.

लहान करडाची मुंढी तुकडे करून त्यांत मूग घालून शिजवावी. त्यांत तूप पावशेर आणि गरममसाला, लाल मिरच्या व मीठ हीं थोडथोडीं घालावींत. असे प्रकारें मूग तयार झाले ह्मणजे मोठे घोड्यास दोनशेर व लहान घोड्यास एकशेर या मानानें द्यावेत.

उडदाची डाळ एकशेर व लहान करडाची मुंढी एक हे निरनिराळे शिजवून मुंढींतील हाडें काढून टाकून तें दोन्ही एकत्र करावे नंतर त्यांत मसाला मिळवून व तूप घालून ते चाळीस दिवस पर्यंत द्यावें.

दाणा दिल्यावर सुंठ, बडीशोप, मिरे व मीठ हे समसमान घेऊन कुटून तें मिश्रण चार पैसेभार बाजरीचे पिठांत द्यावें.

कंदज आछेर घेऊन बारीक कुटून तो रात्रीं चक्का दह्यांत भिजत घालावा, आणि सकाळीं एकशेर साखर घालून दुबळे घोड्यास द्यावा. याप्रमाणें चाळीस दिवसपर्यंत क्रम ठेवावा. नंतर कंदज एकशेर,

साखर एकशेर, गव्हाचा भुसा पावशेर हीं रात्रीस दुधांत भिजत घालून सकाळीं त्यांत मसाला टाकून तीं द्यावीत. तो मसाला येणेंप्रमाणें:—वावडींगें आछेर, बेदाणा आछेर, आलें पावशेर, किंकाबर पावशेर, मेथी आछेर, मिरे आछेर, पिंपळपान तीनपाव, पिंपळमूळ आतपाव, काळीं जिरें आतपाव, कुटकी आतपाव, हिंग आतपाव, काळें मीठ आतपाव, आहळीव आछेर, गुगुळ पावशेर, मिरच्या पावशेर, पांढरें मीठ खाण्याचें पावशेर, भांग पावशेर, हळद पावशेर, सागरगोटे आतपाव, सोहागी आतपाव, तेलिया आछेर, सेंदेलोण व जवखार पावशेर, हीं सर्व बारीक करून प्रत्येक दिवशीं छटाक किंवा आतपाव लहान घोड्यास द्यावीत, आणि मोठे घोड्यास पावशेर द्यावींत.

साग तरूठ एकशेर शिजवावें. शिजण्यास पाणीं ज्यास्ती घालावें. बाजरीचें पीठ शेरभर घेऊन नंतर तें त्यांत मळून सकाळीं द्यावें. शिजते वेळेस तेल पावशेर टाकावें. नंतर मसाला द्यावा तो:— राई एकशेर भाजून, खुरासणी ओंवा एकशेर भाजलेला, फुटाणे भाजलेले अगर डाळे अर्धाशेर, भांग पावशेर भाजलेली, मीठ व कापुरकचरी आछेर हीं सर्व बारीक करून दररोज छटाक देणें.

ओले हरभरे ह्मणजे फसल ह्मणतात ती ज्या दिवसांत देतात त्या दिवसांत दाणा देऊं नये. हरभऱ्याची आंब फसलीचे आंगीं असते सबब दांत आमतीळ तर गवत कधीं कधीं द्यावें. ऊन पाण्यानें धुवावा. सुंठ आतपाव, वावडींगें आतपाव, बाळचरिंदा पावशेर, ल्यायकुनिया आतपाव, अजमोदा आदपाव, अजवान आतपाव, खुरासनी ओंवा छटाक, किरमानी ओंवा छटाक, राई आतपाव, हिरडा अकबरी एक, खाण्याचें मीठ छटाक, सेंदेलोण छटाक, नवसागर पावशेर, अंबेहळद आतपाव, हे जिन्नस बारीक करून ए-

कत्र करावे आणि त्यांतून दररोज एक मुठभर रात्रीस घोड्यास द्यावेत. या प्रमाणें तीन, सात, दहा किंवा पंधरा दिवस पर्यंत करावें.

घोडा दुबळा झाला तर त्यास पुष्ट होण्याचे उपाय.

(१) गरमीचे दिवसांत दाणा खाण्यास देण्याचा प्रकारः—हरभरे भाजलेले दोन शेर दळून त्यांत गूळ किंवा साखर एक शेर घालून मळावे आणि तें चार घटका राहूं देऊन सकाळीं द्यावें, याप्रमाणें च्याळीस दिवस पर्यंत करावें. गवत विलायती द्यावें, ओलें मिळाल्यास चांगलेंच.

(२) हलवन दोन शेर, गूळ पांच शेर, तूप पांच शेर, हळद पांच शेर, लसूण आछेर, (प्रथम लसूणांत तूप घालून भाजावें) या सर्वांचें मिश्रण करून दररोज सकाळीं पावशेर पासून आछेर पर्यंत च्याळीस दिवस पावेतों द्यावें म्हणजे घोड्यास रंग चांगला येईल.

(३) हळद पांच शेर, मेथी पांच शेर (अर्धकच्ची भाजलेली), राई पांच शेर (अर्धकच्ची भाजलेली), अजवन पांच शेर, खुरासणी ओंवा, पांच शेर (हरभरे अर्धकच्चे भाजलेले) दहा शेर, हे सर्व जिन्नस एकत्र करून तें हरभऱ्याचे पिठांत मिळवावेत. नंतर त्या पैकीं आछेर रात्रीस गाईचे किंवा म्हशीचे आछेर दुधांत भिजत घालून सकाळीं द्यावेत.

(४) हलवासीबा छटाक, कोरफड पावशेर, हळद छटाक, काळें जिरें आतपाव, हे सर्व पावशेर तुपांत तळावेत नंतर त्यांत पावशेर गूळ घालून च्याळीस दिवस पर्यंत द्यावें. तें दररोज देणें तें सदरील प्रमाणें नवें करून द्यावें.

(५) दहा शेर मोहडाचीं फुलें व गूळ दहा शेर, हीं दोन्ही मिळवून एकवीस दिवस एकजिव होई पर्यंत ठेवावीं. नंतर प्रत्येक दिवशीं त्यांतून आर्धा शेर घेऊन त्यांत आर्धा शेर बाजरीचें पीठ घालावें, आणि लसूण पाकळ्या आतपाव सोलून त्यांत घालून चारावें, ह्मणजे खाणें जिरेल.

(६) राई दोन शेर आर्धीकच्ची व आर्धी भाजलेली एकत्र करावी आणि त्याचें पीठ करावें. नंतर कपेरी मीठ तीनपाव, छटाक पापडखार, उडदाचें पीठ चार दाम (एक तोळा) घेऊन तें सर्व एकत्र करून च्याळीस दिवस पर्यंत किंवा दोन महिने किंवा चार महिने पर्यंत द्यावें.

(७) अजवान दोन शेर घेऊन तो भिजे पर्यंत त्यांत नरमुत्र घालावा. त्यांतून सहा सात मासे घेऊन गव्हाचे पिठांत द्यावा. अजवान दररोज सहा सात मासे काढून पुन्हां त्यांत नरमुत्र घालावा.

(८) मठ (मटकी धान्य) दोन शेर मोठे घोड्यास, शेरभर लहान घोड्यास, या प्रमाणानें घेऊन त्यांत पावशेर तूप घालून शिजवावेत. मसाला व मिरच्या घालून च्याळीस दिवस पर्यंत द्यावेत आणि चांगलें हिरवें गवत चारावें.

(९) एक किंवा दोन शेर मठ घेऊन पाण्यांत भिजवून सकाळीं संध्याकाळीं द्यावेत. तुरीची चूण शिजवून द्यावी किंवा कच्ची चूण भरडून भिजवून द्यावी. खाण्याचें मीठ पावशेर भाजून, बडीशोप पावशेर भाजलेली, कचरी पावशेर भाजलेली, अजवान भाजलेला पावशेर खोरबच्य पावशेर, राई पावशेर, काळें मिरें छटाक हीं सर्व बारीक करून दाणा दिल्यावर द्यावीं. दुसरें, बाळहिरडे पावशेर व काळें मिरें पावशेर हे दोन्हीं मिळून द्यावेत.

(१०) मीठ खाण्याचें पावशेर भाजलेलें, काळें मीठ पावशेर, वाळहिरडे पावशेर, बडीशोप पावशेर भाजलेली, कचरी भाजलेली पावशेर, अजवान भाजलेला पावशेर, घोडबच्च पावशेर, राई पावशेर भाजलेली, काळे मिरें पावशेर अर्धे भाजलेलें व अर्धे हिरवे (कच्चे) हीं सर्व एकत्र करून कुटावीं आणि दाणा दिल्या नंतर त्या मिश्रणापैकीं आतपाव दररोज देत जावें.

(११) खाण्याचा अजवान पावशेर, काळें मीठ पावशेर, भांग छटाक, लसूण आतपाव, सैंदेलोण आतपाव, साबर मीठ आतपाव, खाण्याचें मीठ आतपाव, वावडींगें पावशेर, इंद्रजव पावशेर, काळींजिरें पावशेर हीं सर्व घेऊन बारीक करून दाणा दिल्यावर मुठभर द्यावीं.

(१२) आसकंद आर्धाशेर, सैंदेलोण आतपाव, काळे मीठ आतपाव, बच्च आर्धाशेर, सुंठ आर्धाशेर, काळीं मिरें आर्धाशेर, कुटकी आर्धाशेर, लेंडी पिंपळी पावशेर हीं सर्व बारीक करून दाण्याचे अगोदर दररोज आतपाव प्रमाणें च्याळीस दिवस द्यावीं.

(१३) अजवान एकशेर व खाण्याचें मीठ एकशेर हे दोन्ही एका (मडक्यांत) घालूत त्यांत नरमूत्र घालून जमिनींत पुरून ठेवावे. मग काढून सहामासे घेऊन दाण्यामध्यें द्यावे.

(१४) मेथी दोनशेर, राई एकशेर, अजवान आर्धाशेर, लसूण एकशेर, हळद एकशेर, खाण्याचें मीठ दोनशेर हें सर्व एकत्र करून नरमुत्रांत किंवा बकरीचे मुतांत भिजवावे. मूत्र इतका घालावा कीं, औषधाचेवर चारबोटें येईल. नंतर ती हांडी (मडकें) बंद करून तें औषध छायेंत सुकवावें, वाळल्यावर दाणा देते वेळेस मुठभर घालून चारावें म्हणजे पोटातील कृमी जातील व घोडा पुष्ट होईल. घोडा जर तोबऱ्यांत खाणार नाहीं तर त्यास हातानें चारावें.

(१५) भिंडयाची त्वच्या छटाक, चिंचेची त्वच्या (टरफल), छटाक, कुटकी छटाक, हळद छटाक, खारबच्च छटाक, वावडींगें

छटाक, लसण छटाक, मिरची छटाक, हिंग तीन तोळे, सैंदेलोण दहामासे, खाण्याचें मीठ छटाक, काळें मीठ दहामासे, सांबरी मीठ दहामासे, करंज बीं दहामासे भाजून सर्व एकत्र करून कुटून अलम-गीरी पैसाभार बाजरीचे पिठांत द्यावें व मोठे घोड्यास दोन पैसे-भार द्यावें.

(१६) हलीम व बलीम यांची साल व चिंचेचें वरील टरफल, अजमोदा, अजवान, देवदार, बोळ, पाथरी मीठ, राई हीं सर्व पावशेर प्रमाणें घेऊन कुटून गुळाचे पाण्यांत घालून सात दिवसप-र्यंत लहान घोड्यास दररोज आतपाव व मोठ्या घोड्यास पावशेर याप्रमाणें द्यावीं.

(१७) गुगुळ वजन एक पैसाभार, हळद पावशेर, पिंपळमूळ व पिंपळपान एक पैसाभार भाजून, मेथी भाजलेली चार पैसेभार, राई भाजलेली दोन पैसेभार, बांगडखार दोन पैसेभार, काळीं मिरें एक पैसाभार हीं सर्व औषधें बारीक वस्त्रगाळ करून तीन वर्षांच्या जुन्या आधशेर गुळांत मिळवावींत आणि आठ्या येवढा गोळा दररोज रात्रीस द्यावा. याप्रमाणें सात दिवसपर्यंत द्यावा, ह्मणजे घोड्याची मिजास चांगली राहील. घोड्यास दाणा पचत नसेल किंवा खावक्त नसेल तर हा मसाला द्यावा.

(१८) लाल मिरच्या आधशेर, सोहाचें बीं आधशेर, काळीं मिरें आधशेर व बादान आधशेर हे सर्व बारीक करून पाण्यांत कढवून संध्याकाळीं मुठभर द्यावे ह्मणजे घोडा दाणा फार खाईल.

(१९) काळीं मिरें पावशेर, अजवान पावशेर, सजीखार पाव-शेर, जूखार, व खोरबच्य पावशेर, हळद पावशेर, कुटकी पावशेर, सुंठ वस्त्रगाळ पावशेर, वावडींगें पावशेर, हिंग एक तोळा भाजले-ला, सोहागी नऊ मासे भाजलेली, फटकी दोन तोळे भाजलेली हे सर्व बारीक करून आतपाव दाणा देण्याचे अगोदर द्यावेत.

(२०) कसूम आछेर व गुगुळ आतपाव हे दोन्ही एकत्र करून त्यांतून दररोज सकाळीं आतपाव देत जावें.

(२१) हिरडा, बेहडा, राई, मेथी, हळद, लाल मिरच्या व खाण्याचें मीठ हे सर्व सारखे घेऊन नरमुत्रांत घालून दररोज आतपाव द्यावेत म्हणजे घोडा जलद तयार होतो.

घोड्याचे रंग चांगले होण्यास उपाय.

(१) ज्वारमुली एकशेर, हळद पावशेर, काळीं जिरें पावशेर व कोंकणी मीठ खाण्याचें पावशेर हे सर्व बारीक करून सात दिवस पर्यंत जमिनींत पुरून ठेवावेत. नंतर काढून नरमुत्रांत भिजवून सात रोज द्यावें. सदई औषध वाळूं देऊं नये. वाळूं लागल्यास नरमुत्र घालावा.

(२) गाईची चरबी एकशेर, खाण्याचें मीठ एकशेर, तूप एकशेर, कोरफड एकशेर, हळद एकशेर व फुटाणे एकशेर हे एकत्र करून एका मडक्यांत घालून सात दिवस पर्यंत जमिनींत पुरून नंतर बाहेर काढून दररोज पावशेर सकाळीं देत जावें. पुढें वाढवीत वाढवीत आछेर पर्यंत वाढवावें. याप्रमाणें दोन महिने पर्यंत द्यावें म्हणजे रंग चांगला होईल.

घोड्याच्या आंगावरील केश झडण्याविषयीं.

सर्व देशांत घोड्याच्या आंगावरील केश वर्षांतून एकवेळ झडून पडतात. थंड देशांत वर्षांतून दोन वेळ पडतात. परंतु दुसरे वेळेस शरदऋतूंत केश पडतात ते सर्व आंगावरील पडत नाहींत. पोटाखालचे व पायावरचे उन्हाळ्यांत गळल्यावांचून जे राहिले

असतात ते अगदीं राठ व लांब होऊन गळून पडतात. या समयास घोड्याचा रंग आणि तजेला कमी होतो. घोडा काळ्या रंगाचा असला तर तांबूस रंगाचा होतो आणि कुमाईत रंगाचा असल्यास पिवळा किंवा वाळूचे रंगासारखा होतो. मानेवरील केश (आयाळ) आणि दांडीवरचे केश फार वाढले ह्मणजे गळून पडतात. अती थंड देशांत घोड्याचे केश वाढले ह्मणजे कातरण्याची चाल आहे परंतु ती या देशांत नाहीं.

चाबूकस्वारांचीं लक्षणें.

अश्वांचीं लक्षणें व शिक्षा इत्यादिक जो जाणतो त्यास अश्वाध्यक्ष ह्मणावें. अश्वांच्या शिक्षेचे प्रकार जाणणारा आणि त्यांच्या रोग चिकित्से विषयीं प्रवीण असा अश्वाध्यक्ष पृथ्वीपतीस (राजास) प्रशस्त होय. क्षेत्र (देश), मास (काळ) आणि अश्वांची दशा (अवस्था) या तिहींचें ज्ञान ज्यास आहे अशा वैद्यानें हे सर्व जाणून योग्य फल सांगावें. घोडेस्वार रागीट नसावा. उताणा किंवा कुबडा बसणारा नसावा, तसाच खालीं मुख करणारा नसावा.

जयदेव कृते.

स्थूल देहाचा, मूर्ख, भितरा, उत्कंठीत, चंचळ बैठकीचा आणि अयोग्य स्थानीं चाबूक मारणारा जो स्वार त्याचा घोडा धांवत नाहीं ह्मणजे त्याच्या आज्ञेंत राहत नाहीं. ज्याची कंबर हालते व ताडन करतांना ज्याचे हात वर जातात त्या मनुष्याचें वाहन अश्व नाहीं ह्मणजे तो घोडेस्वार नव्हे. ज्याच्या मांड्या शूल रोगानें आखडल्या आहेत, जो त्रिक ह्मणजे मुख, पार्श्वभाग आणि कटि या तीन ठिकाणीं चंचळ आहे व जो नेहमीं ताडन करण्याविषयीं

उद्युक्त आहे अशा स्वाराचा घोडा त्याच्या आज्ञे प्रमाणें वेगानें धांवत नाहीं. ज्याचें आसन दृढ, अश्वाचें स्वरूप जाणणारा, जितमुष्टि ह्मणजे अधीन भरण्याविषयीं ज्याची मूठ स्वाधीन आहे, ज्यास आळस व त्रास नाहीं आणि जो स्थिर तो, या प्रमाणें सहा गुण ज्यांस आहेत ते घोडेस्वार होत. जो संक्षेपेकरून घोड्याचें मन जाणत नाहीं त्यानें घोड्यांस कितीही ताडन केलें तरी ते त्याच्या मना प्रमाणें चालत नाहींत. ज्यांणी आपल्या बुद्धींत अश्व वाहनाचें विशेष ज्ञान व उत्साह ठेविला आहे ह्मणजे अश्वावर कसें बसावें या विषयीं ज्ञान असून ज्यांच्या मनांत बसण्याची हौस आहे असे लोक सुखानें काहीं आयास न पडतां अश्वास स्वाधीन करतात.

शार्ङ्गधरे.

सत्यवादी, बळकट (दृढ आसनाचा), अश्वाचें स्वरूप जाणणारा, योग्य स्थानीं ताडन करणारा आणि उद्योगी जो आहे तोच घोडेस्वार होय. उपायांनीं घोड्याचें चित्त जाणत नसून जो अश्वास वाहन करतो त्या घोड्याचे पाठीवर बसलेल्या त्या मनुष्यास घोडाच वाहवितो. कोणी वाहक (स्वार) अश्वाची इच्छा जाणतो. कोणी बुद्धिमान त्याच्या कृति समजतो. तसेंच कोणी अश्वाचे गुण जाणतो आणि कोणी त्याचें तत्व समजतो. कोणी एखादा बुद्धिमान दोन्ही ह्मणजे गुण व तत्व किंवा इच्छा व कृति समजतो. मंद बुद्धीला दोन्हीहि समजत नाहींत. कोणी वाहक शास्त्रावांचूनही अभ्यासानें आणि स्वाभाविक गुणानें वरील गोष्टी जाणतो. ज्याला अश्वाच्या कृति माहित नाहींत अथवा अश्वाचे रोग किंवा खोडी नाहींशा करण्याचा उपाय जो जाणत नाहीं अथवा घोड्याचा वेग सहन करण्याविषयीं जो असमर्थ आणि उदासीन अशा प्रकारचा स्वार

योग्य नाहीं. अश्वाविषयींचे सर्व उपाय माहीत असून त्याचें मन जाणणारा, शुद्ध, दोष (खोडी) नाहींसे करणारा, अश्वाचे ठिकाणीं गुण उत्पन्न करण्याविषयीं तत्पर व त्याच्या कर्मा मध्यें (चाकरी मध्यें) कुशल असा स्वार हा अश्व वाहनास योग्य होय.

तथाच जयदेवकृते.

स्वारानें घोड्यावर बसून त्याच्या कानांच्या चलन वलनावर लक्ष्य देऊन अश्वाचें मन जाणावें आणि प्रथम त्यास हळू हळू चालवावें. घोड्यावर बसला असतां वांकडा, उताणा किंवा कुबडा होत नाहीं, खालीं तोंड करीत नाहीं व ताठ होत नाहीं असा जो स्वार तो घोड्यास उत्तम रीतीनें चालवितो. ज्याच्या मांड्या व पाय स्थीर आहेत आणि मान दक्षिणोत्तर होत नाहीं, पार्श्व (पाठ) आणि कंबर इतक्या ठिकाणीं जो उच्च (ताठ) आहे तो स्वार योग्य होय.

तथाच नकुल कृतेविशेषः

जो नियमानें वागणारा, हातांत चपळता आहे, व क्रोधाग्नि रहित असून सत्व गुणांत ज्याची बुद्धि स्थिर आहे, ज्याच्या आंगांत पराक्रम आहे, जो शास्त्रार्थाचें तत्व जाणतो, तसाच योग्य वेळीं तांबूल भक्षण करणारा, अशा स्वाराकडून अश्वांस शिक्षा करणें राजादिकांस प्रशस्त होय. ज्याचे पाय चंचळ असून पुष्ट आहेत त्याला घोडेस्वार ह्मणावें बाकी इतर मनुष्यें केवळ अश्वास भार देणारे होत.

अश्वशास्त्र जाणता, धैर्यवान, बलवान, उत्साही, आणि ज्याच्या सर्व अंगांत सुंदरपणा असून ज्यानें थंडी, उष्ण, आळस व निद्रा हीं जिंकिलीं आहेत, अश्वांची खाण्याची व फिरण्याची वेळ, स्वाचें बळ

(शारीरिक व मानसिक शक्ति), वेग, शरीर व रोगादिकांचे उपाय यांस जो जाणतो, घोडा श्रमी झाल्यास उपचार कोणते करावे हें जाणत असून युद्धकार्येतही जो प्रवीण आहे, दुष्ट अश्वांचें दमन करण्याविषयीं दक्ष, सर्व क्लेश सहन करणारा आणि शुचि असा स्वार प्रशस्त होय. ग्रास (तृण), काष्ट, जल हें समजण्याविषयीं, परक्याचें व्यूह अवलोकन करण्याविषयीं, आणि परचक्रांत प्रवेश करण्याविषयीं व त्यांतून निघण्याविषयीं जो कुशल तो अश्ववेत्ता ह्मणजे स्वार योग्य होय. रणभूमि, सैन्यस्थान व शस्त्रें यांचें तत्व जाणतो व हस्तलाघव ज्यास आहे, चक्र खड्ग, भाला आणि शक्ति या आयुधांस धारण करण्याविषयीं जाणणारा तोच अश्ववाहक होय असें तत्ववेत्ते लोक ह्मणतात.

तथा नकुल कृतविशेषः

ज्याचे कमलपत्रा प्रमाणें मृदु पाय आहेत, अश्वाच्या कर्णावरच ज्याची दृष्टि आहे, ज्याची कंबर कधीं चंचळ होत नाहीं, जो अश्वाचें हृदय व गति जाणतो, व यथायोग्य ताडन करतो असा जो अश्ववाहक तो राजे लोकांस मान्य होतो.

घोड्याचे गतीविषयीं.

जो घोडा गुढग्यास उजवे घालून करतालानें सोळा लोटिका वाजविण्यास जितका वेळ लागतो तितक्या वेळांत २०० शें हात जमीन चालून येतो तो उत्तम समजावा. तितक्याच वेळांत जो १९० हात चालून येतो तो मध्यम; व १८० हात चालून येतो तो कनिष्ठ समजावा.

२ रें प्रमाण—मात्रा ह्मणजे आठ लघु अक्षरें उच्चारण्याला जो वेळ लागतो त्यास ह्मणतात. अशा सोळा मात्रेंत जो घोडा १०० धनुष्यें (४ हात ह्मणजे एक धनुष्य) या मानानें लांब जमीन चालून परत येतो तो उत्तम घोडा समजावा. आठ मात्रांत १०० धनुष्यें चालून जातो परंतु पुन्हां आठ मात्रांत परत येववत नाहीं तो मध्यम समजावा. ज्याला १०० धनुष्यें चालून जाण्याला नऊ मात्रांचा काळ लागतो तो कनिष्ट समजावा. जो घोडा १०० धनुष्यें जागा सोळा मात्रांत धांवत जातो तो उत्तम; तितकी जमीन धांवत जाण्याला ज्यास वीस मात्रा लागतात तो मध्यम; आणि २४ मात्रांस तितकी जागा लागल्यास तो कनिष्ट असें समजावें.

अश्वाचे ठिकाणीं दोन प्रकारचे वेग आहेत एक नैसर्गिक आणि दुसरा भयजन्य. धारेवर घोडा योजला असतां प्रेरणे वांचून जो त्याचा अविछिन्न वेग असतो तो नैसर्गिक वेग आणि चाबूक वगैरे मारल्यानें जो वेग उत्पन्न होतो तो भयजन्य वेग होय.

अश्वाचे वेग तीन प्रकारचे आहेत उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ. उत्तमात तीन प्रकार आहेत उत्तमोत्तम, उत्तम मध्यम व उत्तमाधम. याप्रमाणेंच मध्यमांत तीन प्रकार आणि कनिष्टांतही तीन प्रकार असे एकंदर नऊ प्रकार वेगांत आहेत.

उंच पाय उचलून विभक्त पणानें टाकून लौकर व रमणीय जी अश्वाची गति ती प्रशस्त होय. उन्मत्त झालेला हत्ती, वाघ, हंस व वानर या सारखी अश्वाची गति ती स्वामीस उत्तम समजावी. जो शीघ्र चालणारा असून विलासानें पुढचे पाय उचलून मस्तकाचीं अग्रें हलवीत मुंगसासारख्या आकृतीनें चालतो त्याची ती नकुली गति (मुंगसा सारखी) प्रशस्त होय. जो आपल्या खुराग्रांनीं हृदयास स्पर्श करीत प्रफुल्लित पायांनीं जमिनीवर विस्तव असल्या प्रमाणें तीस नलदीनें स्पर्श क-

रून नखरीनें चालतो त्या गतीस तैत्तिरी गती ह्मणतात. तोंड उचलून श्वास सोडीत पायावरचे केश न हालवितां मोरा प्रमाणें विलास युक्त चालतो त्याची ती मयूरी गती होय. ह्या वर सांगितलेल्या गति उत्तम समजाव्या.

कावळ्या सारखी किंवा चक्रवाक पक्ष्या सारखी गति असून पाय सारखे पडत नाहींत शफे बाहेर पडतात आणि आडखळत असल्यामुळें बसणाऱ्यास कांहीं मौज वाटत नाहीं ती गति वाईट ह्मणून समजावी.

जो अश्व दूर पाऊल टाकून जमिनीस स्पर्श करतो इतक्यांत पुन्हां उचलतो आणि गति त्वरित असून आनंदी असा अश्व भद्रगति होय. बैल, हत्ती, सिंह आणि वाघ या प्रमाणें चालणारा अश्व उत्तम समजावा. अश्वाची गति संकीर्ण (मिश्र), वक्र, भ्रष्ट व अत्यंत ऊर्ध्व अशी गति असते ती निंद्य होय. घोड्याचे गतीचें सरासरी मान दोन मिनिटांत एक मैल जाण्याचें आहे असें शर्यतीच्या दाखल्यावरून दिसून येतें असें इंग्लिश पुस्तकांत आहे.

शिक्षणाविषयीं.

घोड्यास गति शिकविण्यास जागा कशी असावी याविषयीं.

अठरा धनुष्यें लांब असें अश्व फिरण्याचें मंडळ असावें. ती जमीन पाण्यानें मिसळेली, कठीण, खडकाळ आणि तृणकाष्ठादिकांनीं युक्त अशी जमीन रंगभूमीस वर्ज होय. समान व सपाट असून किंचित मृदु असलेली अशी जमीन रंगभूमीस (मंडळास) उत्तम समजावी. जेथें शिळे, अस्थि, कांटे, वाळू किंवा चिखल आहे

आणि उंच सखल असून ज्यांत खळगे आहेत अशा भूमीवर घोडा चालवूं नये. घोड्यांस उष्ण ऋतूंत शिकविणें प्रशस्त होय.

हेमंतादि तीन ऋतूंत अश्वावर आरोहण करावें. ग्रीष्मादि तीन ऋतूंत अश्वावर आरोहण करूं नये.

मंडळावर घोड्यास नेण्याकरितां स्वारानें वर बसावें. प्रथम हळू हळू तो अश्व एक कोशभर न्यावा. जातांना खालीं दृष्टि करून पहावें. आधीं उजवेकडे लगाम धरावा. घोडा जर उजवा पाय उचलून अगोदर टाकील किंवा डावेकडे धरलें असतां जर पुढचा पाय टाकील तर तो दृढ आसनाचा समजावा. पुनः पुनः मागें तोंड फिरवील तर तें वाईट लक्षण समजावें.

अश्व पाहून आसन बळकट करून स्वारानें त्याच्या तोंडावर व पायावर चाबुकाचा प्रहार करून कोपयुक्त करावें नंतर जमिनीवर सव्यापसव्य (उलटपालट) मंडळावर धरावा. बसल्या बरोबर एकदम अश्वास मारूं नये. ताडणापासून भय प्राप्त होतें आणि भयापासून मोह उत्पन्न होतो. यामुळें घोड्यास स्वारांनीं लगाम मात्र वर धरून चालवावें. अशा प्रकारें प्रति दिवशीं चालविण्याचा अभ्यास ठेवावा.

स्वारानें शंभर हाताच्या मंडळावर अश्वास उजवे व डावेकडून फिरवावें. मंडळ, चतुष्कोन, गोमूत्राकृति, अर्धचंद्राकार व नागपाशा सारखे (कटावर) अशा पांच प्रकारांनीं भ्रमण करवावें म्हणजे घोड्यास कष्ट पडणार नाहींत.

स्वारानें घोडा बिन दर्द असतां त्यास भय दाखवावें व तो भयभीत असतां त्यानें भय हरण करावें हें मुख्य अश्ववहनांत रहस्य आहे.

अठरा धनुष्यें लांब असें मंडळ असावें म्हणून पूर्वीं सांगितलेंच आहे त्यावर घोडा मंडळाकृति फिरवीत असतां पांच धनुष्यें लांबीपर्यंत संकोच करीत असावा. मग गोमूत्राकृति मंडळावर, नंतर अर्धचंद्राकृति मंडळावर या प्रमाणें धरावा.

लगामाविषयीं.

घोड्याचा लगाम फार लठ्ठ किंवा फार बारीक, अतिशय जाड व कठीण नसून प्रमाणानें सात बोटें लांब असा करावा.

क्षिप्ता, शिथिला, उत्तरवती, मंदा, वेहायली, विक्षिप्ता, एककरा, अर्धकंदरा, समा, कीर्णा, विभक्ताअत्यूक्षिप्तपतला, उध्दृता, व्यारूढा आणि गोकर्णिका या प्रमाणें लगामाचे चवदा प्रकार आहेत असें जयदेवानीं वर्णन केलें आहे.

पुष्पवती, गोकर्णी, रुलोरुला, तुला, वृषा, नामखंडी, पुष्पधरी, दृढमुष्टि, चंतुरतनी, द्विहस्ती, एकहस्ती आणि शुभगा या प्रकारचे बारा लगाम जयदत्तानीं सांगितले आहेत.

धारेविषयीं अति त्वरीत गति.

धारा पांच प्रकारच्या आहेत. त्या विक्रमा, पुलका, पूर्णकंठी, त्वरीता आणि नीललंबा अशा नांवांनीं प्रसिद्ध आहेत. त्यांचीं नांवें अश्वशास्त्रांत निराळींच सांगितलीं आहेत. गतिपला, चतुष्का, मध्यजवा आणि पूर्णवेगा अशीं नांवें आहेत.

नकुलकृत अश्वशास्त्रांत वरच्या गतींतील दुसऱ्या गतीस फुला, चौथीस वेगसंधी आणि पांचवीस वेगवती ह्मणतात.

जयदत्ताचे मताप्रमाणें या पंचधारा लघु. मंदा आणि दीर्घा या तीन प्रकारच्या आहेत मिळून एकंदर पंधरा होतात.

वेदीका.

अश्व धारेवर धरण्यास मैदान कसें असावें त्या वेदी (मैदान) तीन प्रकारच्या आहेत उत्तम, मध्यम आणि कनिष्ट. शंभर

धनुर्ष्ये लांब ती उत्तम, ९० धनुर्ष्ये लांब ती मध्यम, आणि ८० धनुर्ष्ये लांब ती कनिष्ट समजावी. एक धनुष्य ह्मणजे चार हात. ह्या वेदीचे नऊ प्रकार आहेत. ते नऊ प्रकार दुष्ट अश्वाच्या दमनासाठीं आणि इतरांस चाल शिकविण्यासाठीं आहेत. ते नऊ प्रकार येणेंप्रमाणेः—

१ समोन्नता (सपाट व उंच).
२ विषमा (उंच व सखल).
३ विकिर्णा (उखरवाखर).
४ शुद्धा (निर्मळ)
५ नताग्रा (पुढें उतरती).
६ तृणा (वल्लींनीं आच्छादित अशी).
७ पाषाणा (मोठे मोठे पाषाणांनीं युक्त).
८ लघुपाषाणा (लहान दगड असलेली).
९ पार्श्वोन्नता (दोन्ही बाजूस उंच).

जो सुशिक्षित अश्व सर्व विधीचे ठिकाणीं निशंक असतो तो उत्तम जाणावा.

जो घोडा धांवतांना उरांत भरीव दिसतो, तो चालणारा होय. जो पुष्ट दिसतो, तो मध्यमानक. ज्याचीं अंगें सर्व सुंदर दिसतात, तो आलीढ आणि त्याहून अन्य अश्व प्रत्यालीढ होय.

मागले व पुढले पाय जमिनीवर ठेवून पुढचे पायावर तोल देऊन ज्याचें ठाण असतें तो पुरुषाश्व होय.

घोड्यास लघुत्व (अल्पाकृति) मातृ दोषानें येतें. पितृ दोषानें वेगांत मंदता येते आणि दुर्बलता ही स्वामीच्या दोषानें येते. अश्वास स्वतः दोष कोणचाच नाहीं.

स्वारानें अश्वावर बसून किंवा न बसून त्यास वाम दक्षिणभेदानें फिरवावें. अश्वावर बसतांक्षणींच एकदम त्यास ताडन करूं नये. ताडनापासून भय आणि भयापासून मोह प्राप्त होतो. प्रातःकाळीं स्वारानें अश्वावर बसून त्वरीत गतीनें लगाम उंच धरून चालवावें. दुसरे दिवशीं मंद गतीनें चालवावें. घोडेस्वारानें अश्वाशीं राजनीतींतील चार उपाय करावे लागतात. प्रथम साम उपाय ह्मटला ह्मणजे त्यास अश्वासन देणें, दुसरा दाम त्याचा काळ संभाळणें, तिसरा दंड त्यास ताडन करणें, आणि चौथा भेद ह्मणजे त्यास आज्ञा करणें हे होत. ह्या चोहोंची योजना यथाकाळीं करावी.

जो घोडा आपल्या जिभेच्या तळीं लगाम नेतो तो इतर शेंकडों दाव्यांनीं बद्ध केला तरी जमिनीवर पाडतो. त्यानें तसें केल्यास जिव्हाग्रंथीस दोन्ही वल्गानीं (लगामाच्या दोऱ्यांनीं) घट्ट बांधून हळू हळू ग्रंथी भेदन करावें. जो घोडा वर तोंड करून लाळ सोडतो त्याचा लगाम पोकळ असावा.

अश्वाचे दक्षिण ह्मणजे उजवे लगामाचे दोरीस ग्रहण केलें असतां मागला पाय पुढें करतो. डावेकडे धरला असतां उजवा पाय पुढें करतो याप्रमाणें शिक्षा लाविली असतां स्वाधीन होतो व आसन दृढ होतें. तोंड फिरविणें हा घोड्याचा स्वभावच आहे. त्यावेळेस पायानें दाबून आसन दृढ करावें.

शिंगरास बहुत करून आरंभीं साधा लगाम लावावा. लगामानें त्याचे तोंडास इजा होऊं देऊं नये. घोडे लगामानें व मंत्रजानें स्वाधीन होतात सबब कांटे लगाम घालूं नये.

स्वारास घोड्याची नरमी, सक्ति, गरिबी, मगरूरी, भारीपणा व हलकेपणा, जोर, दम व जलदी हें समजणें जरूर आहे. घोड्यास बाजार, गल्ली व समुदाय ह्मणजे मनुष्याचे दाटीचें ठिकाण, समुद्र,

नहर, नगारखाना या ठिकाणीं व हत्ती, वाघ, उंट, चित्ता, अस्वल वगैरे भयंकर जनावरें त्यास दाखवून त्याजवर घोडा न भितां जाईल असा धिट्टपणा त्याचे आंगीं येण्याविषयीं त्यास शिकवावें. स्वारानें मजबूत बसून मांडींत आवळावें. दौडते वेळेस लगाम खेंचून पाहिजे तिकडे वळवावें, पाहिजे तेव्हां उभा करावा याप्रमाणें शिकविलें पाहिजे. घोड्यास नरमि व सक्ती दोन्ही प्रकारें वागवावें. कारणपरत्वें सक्ती करावी व कारणपरत्वें नरमीही करावी. कित्येक घोड्यांस खुशामत आवडते, कित्येकांस आवडत नाहीं. घोड्यास नेहमीं मारण्याची संवय लावूं नये. नेहमीं मारलें असतां वाईट खोड लागते. घोड्यावर बसल्यानंतर एकदम त्यास धांववूं नये. उजवे व डावेकडे फिरण्यास त्यास शिकवावें. लगाम ढिला सोडून चांगला चालेल तर बेहत्तर आहे, नाहीं तर लगाम खेंचून चालवावा. पळतां पळतां एकदम घोड्यास उभें करूंनये, दमा दमानें उभा करावा. एकदम उभा केल्यास स्वार घोड्यावरून पडतो. घोडा शक्तीवान असला तर लगाम जुमानीत नाहीं यासाठीं नबाद ह्मणून एक औषध आहे तें अर्ध पैसा भार व साखर अर्धा पैसा भार, साबूण दोन तुकडे, चार लिंबाचा रस, अफू एक खर्दे याप्रमाणें जिन्नस घोडीचे मुतांत टाकून त्यांत लगाम घालून कढवावा आणि तसा केलेला लगाम तोंडांत दिला असतां घोडा जोर करणार नाहीं.

घोड्यास चाली शिकविणें त्या दुडकी, सात्रक, तुर्की व रहिवाल ह्या शिकवाव्यात. या शिवाय घोड्यास नाचावयास शिकविणें, बोलावयास शिकविणें, बाजीवर उभा करणें, ऊंची दौड, तुलंग व लंगुरी, अशा तऱ्हेच्या चाली आहेत.

घोडेस्वारांनीं प्रथम घोड्यावर जीन ठेवणें तें आपल्या समोर ठेववावें ह्मणजे घोड्यांत कांहीं अवगुण असतील ते त्यास कळून येतील.

पुढें स्वार होऊन बाहेर हलक्याच चालीवर न्यावा, गांवा बाहेर मैदानांत गेल्यावर उलट पालट फिरवून पहावा. व कोरडाही मारून पहावा ह्मणजे घोड्याचे अंगांतील चांगले व वाईट गुण असतील ते कळून येतील. घोडा फिरवितांना त्याचें तोंड छातीकडे व मान आणि कान खडे ह्मणजे उभे असावेत. दुडकी चाल मोर चालतो त्याप्रमाणें शिकविली पाहिजे. घोडा दौडतांना त्याचें तोंड खुलें राहिलें पाहिजे. आनिन वाजत रहावी, गर्दन मोरा सारखी धरावी, दिल खुषीनें काम करील असें शिकवावें व घोड्याचें तोंड नरम ठेवावें. घोड्यास चाल शिकवणें आहे तेव्हां घोड्याचा जेरबंद ढिला ठेवावा अगर लावूं नये. घोड्यास चुचकारून त्याचें तोंड वर ठेवून लगाम ओढून घेतला पाहिजे. दोन्ही हातांनीं दोन्हीं बागा धराव्या. मागें हटून बसावें, कमरेचा धक्का देत जावा. बसणारानें आपलें शरीर दोन्हीं बाजूस रोळीत जावें ह्मणजे चाल लागेल.

दुसरी रीत—घोड्याच्या लगामाच्या दोन्ही कड्यांमध्यें काढणी लावावी आणि ती पायांचे मधून घ्यावी व घोड्याचे छाती बराबर उभे राहून मागें अवर्गा वाजवून कुदवावा व पुढें रोखून चालवावा.

सात्रक चाल शिकवणें ती अनिनीस झटका द्यावा आणि दौडतांना दिलासा द्यावा. लंगुर डावा जमवावा.

उंची दौड—ह्मणजे घोडा आपले शरीराचा भाग तोलून उडतो, आणि सर्व शरीर समेट करून बनावट करून मागील पाय हातभर उंच उडवून उडतो. हुकमी व हलक्या तजविजीनें उडविण्यास शिकवावा.

घोड्याचें शिंगरू बरेंच मोठें ह्मणजे एक वर्षाचें झाल्यावर खांबास ढिलें बांधीत जावें तें असें कीं, जेणेंकरून त्या शिंगरास खांबासभोंवती फिरतां यावें. ज्या काढणीनें खांबास बांधावयाचें

ती काढणी गळेंपट्यास बांधावी. तेथें एक भोरकडी असावी ह्मणजे त्या काढणीस पीळ पडूं लागला असतां निघून जाईल. नंतर त्या शिंगराचे मागें शिकविणारानें हातांत कोरडा घेऊन तें शिंगरूं त्या खांबा सभोंवती उजवी आणि डावी प्रदक्षिणा करील असा रीतीनें रोज हांकीत जावें. असें आठ पंधरा दिवस फिरविल्यानें त्याजला मंडळावर फिरण्याची संवय लागेल. शिंगराच्या पुढील पायांत लोंच (उचलून पाय टाकणें) असा सिकवावा जर वाटेल तर त्याचे पुढले पायांनां गुडघ्यावर लोंबते दोन खडे बांधावे तेणेंकरून नीट पाय टाकले असतां ते खडे पायांच्या नळ्यांस लागतात आणि वांकवून (उंचून) टाकलें तर नळीस लागत नाहींत.

पुढें या घोड्याचे (या रीतीनें तयार झालेल्या शिंगराचे) चवकड्याचे कड्यास काढणी बांधून ती काढणी चवकड्या जवळ हातीं धरून मंडळांत पाव कदम टेहळवून तो हें काम शिकला ह्मणजे काढणीस ढील देऊन दुडकी करावा. सारखा फिरूं लागला ह्मणजे काढणीच्या इशाऱ्यानें वाढवावा. दोरीचे इशाऱ्यावर न वाढल्यास अवगीचे अवाजानें वाढवावा, परंतु अवगी व अवगीवाला घोड्याचे नजरेस न येतां काढणीवाल्याचे मागें रहावें. घोड्यास वाहाढणें आणि घटणें समजुतींत आलें ह्मणजे त्यास मुलायम व दुडकी रसीतच (दोरींत) फिरवावा. घोड्याचीं सर्व आंगें मुलायम होऊन जेरबंदास ढील टाकून वाढता घटता सारखा फिरूं लागला ह्मणजे सात्रक करावा. मंडळांत प्रथम सात्रक करण्यांत घोड्याचे पाय मिळवून घ्यावे. पाय मिळविणें ह्मणजे मंडळाचे आंतल्या बाजूचे पाय वाढते राहावे आणि बाहेरच्या बाजूचे घटते रहावे. हा अभ्यास पुन्हां हें काम विसरणार नाहीं इतका करावा. ह्याचप्रमाणें घोड्यावर बसून काढणी बांधल्या शिवाय त्याकडून पक्का अभ्यास करवावा. मग उभे पाळींत ह्याचा जेरबंद किंचित पो-

कळ करून हलकेपणानें दुडकींत वाढवावा. याप्रमाणें सारखा फिरूं लागला ह्मणजे त्याच जेरबंदावर अनीन गांठून हलकी मुलायन दुडकी करावी. ह्यांत घोड्याची गर्दन खमदार होऊन पायांना लोंच करून हलकेपणानें सर्व जेरबंद नरम करून तोंडांतील चवकड्यास खेळवीत असून त्यानें (घोड्यानें) पैऱ्यावर अति उल्हासानें फिरत असावें.

स्वाराचे मर्जीप्रमाणें इषारा समजून घोडा काम देऊं लागला ह्मणजे त्यास उभ्या पाळीवर सात्रक करावा. पहिल्यानें वाढती सात्रक चपेटून द्यावी. तींत घोड्याचीं व स्वाराचीं सर्वआंगें शुद्ध राहून घोडा वेगानें सारखा वाढला ह्मणजे घटवून घोड्याच्या शरीराचा थाट न बिघडतां मुलायन हलकी सात्रक करावी.

मग साफ जागेवर प्रकारानें (कंपासानें) सारखें असून मोठे ळ ह्या अक्षराचे आकृती ह्मणजे इंग्रजी 8 आठाच्या आंकड्या प्रमाणें दुहेरी मंडळ करावें. त्या मंडळाची खूण घोड्यास आणि स्वारास चांगली दिसेल अशी असावी. पहिल्यानें डावे मंडळावर घोड्याचें डावें अंग वाढतें ठेवून पाव कदमापासून पल्या पावेतों क्रमानें वाढवावा आणि याचप्रमाणें क्रमानें घटवून पुन्हां पाव कदमावर आणावा. तसेंच उजवे मंडळावर त्याचे उलट ह्मणजे उजवे पाय मिळवून घ्यावे. परंतु वाढण्या घटण्यांत घोड्यास तेजी न करूं देतां स्थितीवर ठेवावा.

नंतर दुहेरी मंडळावर घोड्यास टेहळवून सात्रक करावा. घोड्यावर पाय बदलण्याचे जागीं स्वारानें आपले अंगाचा कल देऊन पाय बदलावा, न बदलल्यास जोडाचे ठिकाणीं दुडकी करून सोईनें पाय मिळवून घ्यावा. तसेंही करून न बदल्यास चपेटून तेजीनें वाढवावा ह्मणजे पाय बदलील. हें काम झाल्यावर मिठी सात्रक दुहेरी मंडळावर सुरू करावी. तींत घोड्यानें मुलायमीनें व हलकेपणानें

आपले शरीराची बनवठ करून गर्दन खमदार ठेवून थुतनी च्छातीस मिळवा राहून दांडी हरपैज्यास झळकत राहील असें करावें. या कामांत स्वारानें आसन फार मुलायम ठेवून अनिर्नीत युक्तीनें घोड्यास गांठलें पाहिजे. याचप्रमाणें मिठीसात्रक जावें परंतु जातांना उजवे पायानें आणि येतानां डावे पायानें यावें. या प्रमाणें पावकदमापासून पल्यापावेतों पाय बदलणें स्वाराचे हुकमांत असले ह्मणजे या कामांत घोडा तयार झाला असें समजावें.

घोड्यास पल्ला देणें.

सारखे जागेवर पन्नास हातांचे आंत तीन खुणा कराव्या आणि घोड्यास खुणेच्या समोर उभा करून पल्ला तेजीनें चपेटून हांकून पहिल्या खुणेवर रोखावा. कुचावर दबून उभें राहून तसाच पुन्हां हांकावा. दुसरे खुणेवर त्याचप्रमाणें करून पुनः तेथून शेवटीं ज्या ठिकाणीं रोखावा तेथून मागले पायांवर पालटून यावें ह्मणजे हें काम तयार झालें.

अढाई चाल शिकविणें.

अढाई ह्मणजे घोडा उभा राहातो तो एक भाग धरून त्याच्या दीडभाग जागा मोजून खुण करावी. आणि घोडा उभा असतो त्याच जागेहून घोड्यास नीट तेजीनें हांकून खुणेबाहेर न जातां मागले पायांवर तसाच उलटून आणावा. असे दहावीस फेरे करून घोडा दिलावर (तेजीनें न आणतां) सोहलतीनें काम देईल तर फेरांत उत्तम झाला. यांत स्वाराची पठडी उत्तम रहावी.

घोड्यास तळवाग शिकविणें.

१ घोड्याचे दोन्ही बाजूंचे चवकड्यास काढवण्या बांधून, डावे बाजूची काढणी घोड्याच्या पुढच्या पायांतून उजवे बाजूस घ्यावी.

आणि ती व उजवे बाजूची मिळून दोन्ही काढण्या आपल्या हातांत घेऊन घोड्याची अनिन ढिली करून तोंड खालीं करूं द्यावें. नंतर काढणीचा इशारा करावा ह्मणजे पाय उचलूं लागेल. यांत घोड्यास वाढूं न देतां घटल्या पैऱ्यावर चारही पाय वेगळाले उचलून किंचित चालता रहावा. आणि नथन्याचा फुरफुराट पैऱ्यास चालू राहून अति तेजीनें त्यानें आपले शरीराची बनावट करावी यास तुळंग असें ह्मणतात.

२ घोड्याचा जेरबंद थोडा तंग करून काढणी लावावी आणि तिचा हात पहिले पेक्षां उंच ठेवून घोड्यास दोरीचे इषाऱ्यावर उचलावा. घोड्यानें छाती तोलून गरदनेस ग्वत देऊन छातीस थुतनी लावावी आणि कुंच्यावर दबता राहून पुढले पाय वेगळाले स्थिरतेनें उचलून लोंच करून हलकेपणानें ठेवीत असावे व दर पैऱ्यास नीट चालता रहावा यास धम्माल ह्मणतात.

३ घोड्याचा जेरबंद थोडा तंग करून अनिन ढिली करावी. नंतर काढणी लावून ती हातांत घ्यावी आणि हात कांहींसा उंच ठेवून घोड्यास उचलावा. घोड्यानें इषाऱ्यावर गरदनेस पेंच देऊन आपले शरीराची बनावट करून मागले पायांच्या कुंच्यावर दबून तेजीनें पुढले पाय दोनही बरोबर उचलून गुडघे नथन्याबरोबर अति लोंचानें व हलकेपणानें जमिनीवर ठेवून लागलेच उचलावे. दर पैऱ्यास तेजीनें छाती तोलून सुरेख चालता रहावा. आणि दर पैऱ्यास तेजीनें उबाळून निचा येतांना सिमटून येत असावा. यास बैठकीचीं घरें ह्मणतात.

हें तळबागाचें काम झाल्यावर घोड्यावर बसून हीं सर्व कामें (मागें सांगितलेलीं) अनिनीच्या इषाऱ्यानें करावीं. या कामाच्या वेळीं बैठकीचा प्रकार असा आहे कीं, आसनांत हलकेपणा ठेवून

पोटरीचे दाबानें काम घ्यावें. आणि अनिनीचे दोन्ही हातांबरोबर स्वारानें आपले छातीचे सुमारास उंच धरून घोड्यास अनिनींत गाठून आसनांत उचलावा ह्मणजे काम चांगलें देईल.

आतां पूर्वी घोड्याचीं जीं कामें [पड्डा, अढाई इत्यादि] चांगलीं केलीं असतील तीं पुन्हां साफ करावीं. कारण पूर्वीच्या कामांत घोडा पसरलेला काम करतो आणि तळवागे नंतर सिमटून छाती तोलून फार चांगलें काम देतो. ह्या सर्व कामांपेक्षां स्वारानें मिठीसात्रकीची मेहनत फार करावी. तेणेंकरून घोडा कायम होऊन सर्व कामें देईल. मिठीसात्रकीची मर्यादा अशी आहे कीं, घोड्याचे पुढले पाय सात्रक आणि मागचे ढुडकीचे रहावे ह्मणजे हिची सिमा झाली.

पादगामचाल.

घोडा चवड चाल वाहडती चालून मानेस खमदार ठेवून पायास लोंच करील आणि चेहरा दोन्हीं बाजूंस डोलता राखील असा शिकवावा. ह्या चालीस दुगामा असेंही ह्मणतात.

रहेवालचाल.

घोड्याचा जेरबंद ढिला करून चालवावा. नंतर पुढचे पायांवर लक्ष ठेवून घोडा जो पाय उचलील त्या बाजूचे कल्यावर नरम झटका देऊन थुतनी त्या आंगाकडे यावी. याप्रमाणें दोन्ही पायांवर लक्ष ठेवून दोन्ही बाजूंच्या कल्यास झटके देऊन घोड्यास डोलूं द्यावा. नंतर जेरबंद तंग करून घोडा मागचे कुंच्यावर दबून सिना (छाती) उचलून पायांस लोंच करून मतवालेपणानें चालेल असा अनिनींत गाठून फार वाढूं न देतां तिच्या इषाऱ्याबर चालवावा.

उंचाफेर.

या फेराचे, बागधारी, लंगरू, लंगडी, आणि उंच उडणें असे

चार भेद आहेत. पहिल्यानें जेरबंद ढिला करून तोंडांतील चवकडा किंचित पोकळ ठेवून वहाडती सात्रक हकावा त्या सात्रकींत घोडयानें एकीकडचे पैत्र्यास वाढून दुसरे आंगाकडील पाय घटते ठेवून वहाडतें रहावें. असे अनिनींत झटके देऊन उंचा करावा. याप्रमाणें दोन्हीं अंगें साफ करावीं. वहाडण्यांत जशी पुढले पायांची देव्हड तशीच मागले पायांची देव्हड राहिली पाहिजे. या फिरण्यां स्वारास अनिनींत दम ठेवावा लागतो. अशा रीतीनें घोड्यास देव्हड चालीची आदत झाली ह्मणजे तो उंच्या फेरांचें काम शिकविण्यास लायक होतो.

बगधरी.

घोड्याचा जेरबंद थोडा तंग करून त्यास अनिनींत गाठून तेजीनें उचलून वाहडता घ्यावा. त्यांत घोड्यानें गरदन खमदार ठेवून पायांस लोंच करून तेजीनें साररूया घेरांत वाहडतें राहून फार उंचा न होतां मध्यम तऱ्हेवर फिरत असावें. या फेरांत स्वारानें नीट बसून आसनांत पोंचेपणें न राहतां घोड्यावर चपेट घेऊन काम घ्यावें.

लंगर.

घोड्याचा जेरबंद मानेच्या अंदाजानें तंग करून देव्हड सात्रक सुरू करावी. तींत आसनांत किंचित ढील देऊन अनिनीस मुलायम झटका देऊन उंची करावी. स्वारानें दर पैत्र्यांत उंचे होण्यांत घोड्यास अनिनींत गाठून पैत्रा घटवून एकसारखा ठेवावा. घोड्यानें आपला खबसुरत थाट ठेवून व छाती तोलून तोंड मोकळें ठेवून फार संतोषानें असावें. असे स्वारानें त्याचे शरीराकडे लक्ष देऊन काम घ्यावें. नंतर कांहीं दिवस घोड्यास सोहलत देऊन कळोल करूं लागला ह्मणजे त्यास सोडून फेर सुरू करावा. आणि अनिनींत गांठून मुलायमीनें उचलावा ह्मणजे घोडा हलकेपणानें फिरूं लागेल. या

फिरण्यांत घोड्याचीं सर्व अंगें नरम राहून दर पैऱ्यावर नखऱ्यानें चालतांना दांडी मोकळी ठेवील असें स्वारानें करावें.

लंगडी.

घोड्याचा जेरबंद तंग करून उभेपाळींत पावकदम चालवून अनिनींत गांठून घोड्यास सिमटण्याची समजूत करावी. नंतर उबाळ करून उंचा होऊं लागला ह्मणजे बैठकीचे घरांतून मुलायमीनें उंचा करून वाहाढवावा. यांत दर पैऱ्यास अनिनीच्या झटक्यानें घोड्याचे गर्दनीस लचका येऊन थुतनी छातीस लागत राहवी व पायास अति लोंच करून बगलांतून पाय निवत असावे आणि मागील कुंच्यावर दबून दर पैऱ्यास उबाळ करून अति लोंचानें पाय सुबकीनें जमिनीवर ठेवीत असावे आणि मागले पायाची देव्हढ व दांडी दर पैऱ्यास झळकत राहून फिरावा ह्या फेरांत स्वारानें आसनांत मुलायमी असून हात शुद्ध असावा आणि शरीरास ताठा न ठेवतां घोड्याचे तोलावर किंचित् झुकतें राहून घोड्यास फिरवावा.

उंचें उडणें.

घोड्यास देव्हड्यानें उंचा करून वाढता घ्यावा, तो दहा वीस घरें गेला ह्मणजे नीट झटक्यानें वाटवावा, एकसारखा उंचा जाऊं लागला ह्मणजे त्यांत स्वारानें अनिनीस मुलायमपणें गाठून घोड्यास स्थिरतेनें उतरावा. उंचे होण्यांत आसनांत आणि अनिनींत सिमटून तराऱ्याची सरत न होतां लांबटपणानें वाढून जमीन चालत असावी. व स्वारानें हुकमावर उंच्या घेरांत पलटून यावें. या कामांत स्वारानें पठडी पक्की ठेवून अनिनीचा तोल संभाळला पाहिजे. एकादा घोडा अनिनीच्या झटक्यानें उंचा न झाल्यास काहाडणींत उंचा करून नंतर बसून संभाळून घ्यावा.

अधरपट चाल.

घोड्यास बैठकीचे वरांत उंचा करून जिकडे पालटविणें असेल ती बाग ओढून पालटवून घ्यावा.

तयार झालेला घोडा बिघडल्यास सुधारणें.

घोडा फेरांत बिघाड करूं लागल्यास स्वारानें क्रोध न करतां घोड्याचें सामान तपासून पहावें. कसण्यांत त्याचे कांतड्यास चिमटा आला असेल किंवा दुसरे सामायनांत कमजास्ती असल्यास ठीक करून फिरवावा. त्यांतही न फिरला तर घोड्यास सोइलत द्यावी आणि दुसरे दिवशीं सोडून मुलायमीनें फिरवून पहावा. स्थितीवर असल्यास बरें नाहीं तर किंचित करडा करावा. त्यांत घोड्यानें रागांत येऊन तेजी केली तर दररोज अस्तमान पासून त्यावर सामान ठेवून प्रातःकाळ पावेतों स्वार बसून अथवा नुसता ठेहलवावा ह्मणजे नीट होईल.

घोड्यास कारणपरत्वें मारण्याची जागा व शिक्षा.

स्वारानें घोड्यावर बसून कोणाशीं भाषण न करतां आसन कठीण करून समय विशेषीं मारणें झाल्यास एकवारच पण मोठ्यानें मारावें, वारंवार मारूं नये

१ घोडा हिंसल्यास खांद्यावर मारावें.

२ स्खलत असल्यास कुशीच्या खालीं मारावें.

३ कांपत असल्यास पुढच्या दोन्हीं पायांच्यामध्यें मारावें.

४ आडरस्त्यानें जाईल तर जिकडे जात असेल त्या बाजूस तोंडावर मारावें.

५ वांकडा तिकडा चालूं लागल्यास मानेवर मारावें.

६ म्याला असतां छातीवर मारावें.

७ रागांत आला तर दांडीचे मुळावर मारावें.

८ धांवला असतां दोन्ही गुडघ्यावर मारावें.

९ लवकर चालत नसल्यास कंबरेवर मारावें.

हीं कारणें झालीं असतां या या ठिकाणीं न मारून अन्य ठिकाणीं मारलें तर घोडा बिघडून पुनः सुधारण्यास कठीण पडेल.

लाथऱ्या घोड्यास शिक्षा.

घोडा लाथ मारीत असल्यास त्यास पक्क्या भिंतीपुढें मागले पायानें उभें करावें आणि मागें एका मनुष्यानें सावधगिरी ठेवून घोड्यास इषारत करावी, ह्मणजे तो घोडा त्या मनुष्यास ज्या लाथा मारील त्या भिंतीवर लागून घोड्याचे पायास लागेल, असें झाल्यावर त्या जनावरास वाटेल कीं, लाथा मारण्यानें पायांस इजा होते सबब लाथा मारण्याची संवय आपण टाकून द्यावी. असें त्यास वाटलें ह्मणजे तो लाथ मारण्याची संवय टाकून देईल.

पाण्यांत बसणाऱ्या घोड्यास शिक्षा.

कित्येक घोडे पाणी पहातांच अथवा पाणी पितांना पाण्यांत बसतात, त्यांस गळ्यांत किंवा छातीस कळीचा चुना फडक्यांत घालून बांधावा आणि पाण्यापाशीं न्यावा. घोडा पाण्यांत बसतांच तो चुना पाण्यानें ऊन होऊन घोड्याचें थोडें चामडें जळून कांहीं दिवस इजा

होईल ती बरी करावी. नंतर या शिक्षेनें पुढें तो घोडा पाण्यांत बसण्याची संवय टाकील.

गुडघ्यानें उठणाऱ्या घोड्यास शिक्षा.

घोडा पुढच्या पायांचे गुडघे टेकून उठणें, ही खोड मोठी वाईट आहे असें शालिहोत्रांत सांगितलें आहे. व येणें करून घोड्यास बसल्यावर लवकर उठतां येत नाहीं. सबब ज्या घोड्यास ही खोड असेल त्याच्या गुढघ्यावर फडक्यांत घालून वाळूचे खडे बांधावे ह्मणजे तो गुढघ्यानें उठूं लागला असतां ते खडे गुढघ्यास रुपतात. या शिक्षे करून ती खोड ह्मणजे गुढघ्यानें उठणें घोडा सोडतो.

बोंबलणाऱ्या घोड्यास शिक्षा.

ओंठावर ओंठ आपटण्याची खोड एखाद्या घोड्यास असत्ये तसि बोंबलतो असें ह्मणतात. ही खोड शालिहोत्रांत फार वाईट सांगितली आहे. ओंठ वाजविते वेळीं लोखंडाचा गज तापवून त्याचा अथवा लांकडाचे कोलीतीचा चटका द्यावा. ह्या शिक्षेनें घोडा बोंबलण्याची खोड क्वचित टाकतो.

घोडा चऱ्हाटें खातो त्यास.

घोड्यानें चऱ्हाटें खाऊं नयेत ह्मणून चऱ्हाटास त्याची लीद लावावी ह्मणजे चऱ्हाटें चावीत नाहीं.

घोडा माती खातो त्यास.

दाण्यामध्यें थोडें मीठ घालीत जावें ह्मणजे माती खात नाहीं.

जेरबंदास ओढून तोडतो त्यास.

जो घोडा जेरबंदास ओढ लावून ताणतो त्याच्या मोहह्याच्या मध्यें नाकावर रुपेल अशा रीतीनें कवडी अथवा खडा घालावा ह्मणजे जेरबंद ताणीत नाहीं.

ताडनप्रकार.

उत्तम अश्वास चाबूक फार मृदूपणानें मारावा. मध्यमास मध्यम आणि अधमास अति कठीण प्रहार करावा.

दंड करतेवेळेस तीक्ष्ण अश्वास मृदु असा एक प्रहार करावा. मध्यमास २ प्रहार आणि अधमास तीन कडक प्रहार करावे.

दंड केव्हां करावा ह्याविषयीं.

अश्व चालण्याचे वेळीं बसेल, निद्रा घेईल, किंवा दुसरें कांहीं दुर्वर्तन करील, अश्विनीस उत्कंठेनें पाहील, अडखळेल, गर्वयुक्त गर्जना करील, भिईल, मार्ग सोडून जाईल, शिक्षेचा त्याग करील अथवा मनांत भ्रम पावेल, तर त्या त्या वेळेस अश्वास ताडन करावें. भ्रमिष्ट झाला असतां अन्य चित्त आणि गति भ्रष्ट होईल अशावेळीं ताडन करावें.

केव्हां ताडन कोठें करावें याविषयीं.

घोडा हिंसत असतां त्याचे स्कंद व बाहू यावर त्यास प्रहार करावा असें उपवेशे ग्रंथांत सांगितलें आहे. कुशीवर प्रहार करावा असें नकूल ग्रंथांत व मस्तकावर प्रहार करावा असें जयदत्त ग्रंथांत सांगितलें आहे. घोडा बसेल किंवा झोंप घेईल तर तोंडावर, अडखळतांना जंघनावर कमरेच्या खालीं, भ्यालेला असल्यास कंठ प्रदेशावर प्रहार करावा असें उपवेशे ग्रंथांत, पोटावर असें नकूल ग्रंथांत, व पाठी मागें प्रहार करावा असें जयदत्त ग्रंथांत सांगितलें आहे.

हिंसतांना स्कंद, बाहू, कुशी आणि मस्तक यांवर ताडन करावें.

चालतांना निद्रा घेत असतां कटीवर ताडन करावें.

चालतांना दुर्वर्तन केल्यास मुखावर ताडन करावें.

घोडीस उत्कंठेनें पाहील तर स्कंध व बाहू यांवर प्रहार करावा.

अडखळल्यास जंघनावर कंबरेच्या खालीं ताडन करावें.

भिईल तर कंठ प्रदेशावर, पोटावर अथवा पाठीमागें ताडन करावें.

मार्ग सोडून जात असल्यास तोंड, कंठ व पुच्छ या ठि-
काणीं प्रहार करावा.

मनांत भ्रम पावेल तर पोट व अधरोष्ठ यांवर ताडन करावें.

शिक्षा टाकील तर अधरोष्टावर प्रहार करावा.

कष्टानें चालेल किंवा पडेल तर पाहिजे त्या ठिकाणीं ताडन करावें.

गतिभ्रंश झाला असतां मानेवर ताडन करावें.

त्रासयुक्त झाल्यास कानाच्या मध्यें ताडन करावें.

चंचळ झाल्यास गुढघ्यावर ताडन करावें.

रागावला असल्यास उरावर ताडन करावें.

ह्या प्रमाणें अश्वास ताडन करावें. भलतेच वेळेस व भलतेच ठिकाणीं ताडन केलें असता अश्व कोपयुक्त होतो आणि त्याचे मनांत पुष्कळ दोष उत्पन्न होतात ते दोष तो यावज्जीव बाळगतो.

अश्वास दंडानें वश करावें. चाबूक घेतल्या वांचून अश्वावर बसूं नये

अकाळीं दंड, लगामाची धरसोड आणि पाणी पाजणें यांपैकीं कोणताही प्रकार केल्यास घोड्याची गति कमी होते. सर्व लक्षणांनीं युक्त, निर्दोष, बलवान व सुशील असा अश्व कधींच धांवत नाहीं.

तीक्ष्ण अश्व एक चाबूक मारिला असतां धांवतात. भद्र अश्वास

दोन चाबूक मारले असतां ते धांवतात आणि मंद अश्व तीन चाबूक मारले असतां धांवतात. तीक्ष्ण, मद्र व मंद अश्वांचें धांवणें हाच वेग आहे.

घोड्यास मुळींच चालविलें नाहीं तर ते सर्व कर्मामध्यें शक्त असूनही नाश पावतात. फार चालविलें तर तोंडाची ऐट सोडितात व अवयवांचे ठायीं शिथिल पडतात.

घोडा खरेदी घेण्याविषयींचीं चिन्हें.

घोडा घ्यावयास गिऱ्हाईक जाईल तेव्हां त्यानें त्याचीं त्यावेळचीं लक्षणें पहावीं. उपजला दिवस समजला नसला तर प्रश्नावरून जाणावें. उत्तम चिन्हाची परिक्षा गिऱ्हाईकाची व घोड्याची समदृष्टि झाली ह्मणजे उल्हासानें त्यानें गर्जना करणें व हिंसणें हीं असून तो घोडा धन्यास लाभकारक होय. गिऱ्हाईकास पाहून उजवा हात पुढें करून हुंगेल व ठाणावर उड्या मारील तर तो घोडा घेणारास संपदा देईल असें समजावें.

गिऱ्हाईकास पाहून लीद करी तरी सिद्धी सांगे. वाईट प्रश्नाची परिक्षा पाहून घोडा घेऊं नये. गिऱ्हाईकाची समदृष्टि झाली असतां पाय झाडला तर वर्जावा. गिऱ्हाईकाची समदृष्टि झाली असतां मुत्र करील तर धन्यास मृत्यु. मान झाडील तर घेऊं नये. गिऱ्हाईकास पाहिला तर मान झाडील किंवा जांभयी किंवा आंगमोड देईल तर दुर्लक्षणी. डावा पाय पुढें ठेवील तर व मुखांतून लाळ सांडील तर घेऊं नये तो वाईट करील. चिन्हें चांगलीं झालीं तर घ्यावा.

घोडा विकत घ्यावयास गेलें असतां जर आनंदानें शब्द करून विष्टा करील तर तो उत्तम समजावा.

घोडा विकत घ्यावयास गेलें असतां आणि घोड्यापुढें उभें राहिलें असतां जर तो डावा हात (पुढचा पाय) लांब करून तोंडांत चावत असलेला चारा खालीं टाकील तर तो वाईट ह्मणून समजावा. घोडा विकत घेतेवेळीं जर तो मुटेल तर वाईट समजावें. अंग कांपवील किंवा मूत्र करील अगर आपलें आंग लांब करून सुंभ फिरवील तर तो घोडा वाईट ह्मणून समजावा.

दिवसास घरीं घोडी पसवली तर घर व तें शिंगरू व ती जागा विकत घेणारास व धन्यासही वाईट. तसेंच वाईट दिवशीं ह्मणजे सक्रांत वगैरे दिवशीं घोडी पसवली असल्यास तें शिंगरू घेऊं नये. हें ओळखण्याची खूण अशी आहे कीं, त्या शिंगराचा मालक त्याचा थोडा कान कांपीत असतो कारण कान कांपला ह्मणजे ती खोड अम्मळ कमी होते. घोडा विकत घेतेवेळेस बसलेला असेल तर तो घेऊं नये.

घोड्यावर बसलें असतां जर घोडा दोन्ही पाय वर करील तर ती खोड वाईट असून तसा घोडा घेऊं नये.

घोडा वाट चालत असतां दचकेल किंवा दोन्ही पायांचे नेवर एकमेकांशीं लागतील तर ती खोड वाईट आहे.

घोडा एक रंगी असून त्यावर पांढरे ठिपके उत्पन्न झाल्यास वाईट. घोड्यावर बसावयास गेलें असतां जर घोडा लाथ मारील तर तो वाईट. जर घोड्यास पोट दुखणें चार पांच दिवसांत होईल आणि औषधानें गुण न येईल तर ती खोड वाईट आहे.

घोडा खरेदी घेण्यास जाऊन घोड्यास उजवे हातानें धरून घोड्याचें तोंड पश्चिमेकडे करून पाहावें. जर घोडा त्यावेळेस आपली शेंपटी उजवेकडे करील आणि उजवा पाय आपटील तर तो घोडा उत्तम समजावा. जर त्यावेळेस डावेकडे शेंपटी

करील व डावा पाय आपटील तर तो वाईट समजावा. घोडा घेतेवेळे-स जर तो वर पाहील तर उत्तम समजावा. पागेंत आणते वेळेस घोडा वर पाहून शब्द करील तर उत्तम लक्षण समजावें.

घोडा विकत घ्यावयास गेलें असतां जर तो एक वर्षाचा किंवा दोन वर्षांचा अगर तीन वर्षांचा असल्यास पुढें केवढा मोठा होईल, उंच किती होईल, सशक्त होईल किंवा अशक्त होईल हें पाहून विकत घ्यावा.

घोडा कोणते कामाकरितां घेणें आहे हें प्रथम पाहिलें पाहिजे. बसावयाकरितां, गाडीस जुंपण्याकरितां, शर्यती करितां किंवा शिकारी करितां यांतून ज्या कामास पाहिजे त्या कामास कसे प्रकारचा घोडा पाहिजे हें समजणें जरूर आहे.

बसावया करितां पाहिजे तर तो घोडा घोड्यावर बसणाऱ्याची स्वारी वाहूं शकेल कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे. बसणाराची स्वारी त्याजला सहन होईल अशी शक्ति त्या घोड्यांत पाहिजे. घोडा देखणा असावा. रंग मालकाचे आवडीचा असावा. डोकें लहान, डोळे मोठे ढळढळीत, तोंड लहान, नाकपुड्या मोठ्या, मान थोडी बांकदार, खांदा पाठीकडे तिरकस व मांसल असावा. खांद्याला टोंक नसावें. शरिराचा बांधा वाटोळा व मांसल असावा. कमर खोल असावी. पाय व खूर नीट ताठ असावेत. मागचा भाग खोलगट ह्मणजे त्याचे कुले उंच असावेत. चारी पाय चांगले पिळदार असावेत. पाहिजे तिकडे उजवीकडे किंवा डावीकडे सहज फिरणारा असावा. चालण्यांत वरचे बसणारास आनंद वाटावयास योग्य असा असावा. दुडकी चाल निर्भयपणानें व मोकळे मनानें चालणारा व सात्रक चाल सावकाश लगाम ओढल्या वांचून जाणारा असा असावा. खोगीर सरूं नये ह्मणजे खांद्यापुढें येऊं नये. एका आवरांत सात किंवा

आठ मैल दुडकी चाल चालेल तर बस आहे. मान ढिली आणि कमजोर नसावी. घोड्याचा खांदा नीट असेल तर गुडघ्यांत किंवा आईट स्टाक यामध्यें गरम राहून पडण्यास कारण होतो. घोडा ढिले-पायाचा, चिरडखोर, गरम स्वभावाचा व चमकणारा नसावा. ज्या घोड्यास फार मज्जा असेल तोंही पसंत नाहीं. जर्दा (बदामी) रंगाचा घोडा फार करून असा असतो. पायांच्या नळ्या बारीक असाव्या लठ्ठ असूं नयेत. खेचर जनावराच्या नळ्या ज्याप्रमाणें असतात तशा असाव्यात. घोडा डोकें वर करणारा नसावा. घोड्याचे पायाचे नळीवर गुळूम ह्मणजे मांस वाढलेलें नसावें.

गाडीकरितां घोडा पाहिजे तेव्हां बसण्या करितां असणारे घोड्यास ज्याप्रकारचे गुण पाहिजेत ह्मणून सदरीं सांगतले आहेत तसे तर गुण त्याच्यांत असलेच पाहिजेत परतु खांदा थोडा नीट असला तर चालेल. त्याची उंची साठ बासष्ट इंच असावी. पाय बळकट व स्वभाव धीट असावा. गाडी लहान मोठी असेल त्या मानानें ती वाहण्यास तो समर्थ आहे किंवा नाहीं हें पहावें. त्याची मान इंद्रधनुष्या प्रमाणें कमानदार असावी.

शर्यती करितां घ्यावयाचे घोड्यांचे आंगीं बसावयाकरितां घोड्याचे अंगीं जे गुण पाहिजेत त्या प्रमाणेंच असावेत.

शिकारी करितां घोड्याचें डोकें लहान, मान सडपातळ, खांदा तिरकस, पाठ व कमर बळकट व शरीराचा आकार खोलगट असावा. पाठीचा कणाही खोल पाहिजे. तांडाचा वास चांगला असावा. मांडी उतरती असावी. खूर रुंद व नीट उभे असावेत. पाय नीट उभे असावेत. रोखून चालणारा नसावा. शिकारीचे घोड्याकडून हरणाची शिकार आठवड्यात एक दिवस व कोल्ह्याची पंध्रवड्यात तीन वेळ याप्रमाणें त्याजकडून काम घ्यावें जास्त घेऊं नये. साठ बासष्ट इंच पर्यंत घोडा उंच असावा. घोड्याची मान व पाय अशक्त नसावेत.

साधारण सर्व घोड्यांची मान अशक्त व पुढील पाय वांकडे, डोळे रोगी व पाय सुजीर व लंगडणारे व बेंबीचा रोग व सुंभांत रोग असे अवगुण असणारे घोडे विकत घेऊं नयेत.

घोडा घेतेसमयीं अवयव परीक्षा करणें.

प्रथम घोड्याचें तोंड पाहून दांतांवरून तो तरणा आहे किंवा म्हातारा आहे हें पहावें. नंतर त्याची शेंडी धरून दोन्ही डोळे पहावे. डोळे मोठे तेजदार असावेत व त्यांस कांहीं विकार नसावा. कान फार लहान व फार मोठे नसावेत. ओंठ बारीक असून शोभिवंत असावेत. शीर मोठे व मान छातीपासून जाड व कानाकडे बारीक कमानदार असून चोहोंकडे फिरती असावी. खुब्बा व सुंभाचा तळवा एक दोरींत नीट असावा. खुब्बा तिरकस व लांब असावा. खांदा व खांद्याची नळी मोठी असावी. गुडघा रुंद व मोठा असावा. गुडघ्याच्या मागील बाजूचें हाड मोठें असावें. गुडघ्याची खालची नळी लांब असावी. सुंभाच्या मागलें हाड मोठें असावें. सुंभ फार लहान व फार मोठा नसावा. तो तरतरीत नीट किंवा बैठा नसावा. बरगड्या लांब व जाड असाव्यात. खांदा उंच असावा. कंबर फार लहान व फार उंच नसावी. फसल व कुल्हे यांच्या आंतले टोकांच्या मधील जागा थोडी असावी. कमरेचें हाड लांब व रुंद असावें. पुट्ठा उतरता नसावा. गुदद्वार उघडें नसावें. मांडीचे वरचें व खालचें हाड मोठें असावें. मागील पायांच्या गुडघ्याचा सांधा मोठा असावा. गुडघ्याचें हाड मोठें असावें. मागील मांडीचे खालचे हाडावरील चपटें हाड व खुब्याचे आंतील टोंक दोरीसूत असावें. याप्रमाणें साधारण रितीनें घोड्याची परिक्षा करून घोडा खरेदी करावा.

शर्यतीचे घोड्याची परीक्षा.

शर्यतीचे घोड्याचा खांदा उंच असावा व त्याची उंची पाठीचे कण्याचे मणक्यावर अवलंबून असून लांबीही कण्याचे मांसळतेवर अवलंबून असते. कण्याचे भागावरून त्याची शक्ति पुढील भागाचे अवयवांचें साधन आहे. खांदा मांसल असून. पाय आंखूड असावेत. सुंभाचा जोड मध्यम असावा. बांधा आंखूड असून बरगड्या अगदीं जवळ जवळ असाव्यात व त्यांची लांबी पंधरा इंचापेक्षां कमी नसावी व सोळा इंचापेक्षां जास्त नसावी. काळीज व फुप्फुस हीं पैस राहण्या पुरती छाती मोठी असून खोलगट असावी. घोड्याचे अंगीं शक्ति वाढण्याची अवधी पांच वर्षांपासून आठ वर्षांपर्यंत असते ह्मणून आठ वर्षांचे आंत घोड्यास शर्यतीचे कामीं लावूं नये.

गाडीचे घोड्याची परीक्षा.

गाडीस घोडा लावणें तो पांच वर्षांचे आंत नसावा. त्याचे डोळे व तोंड सुबक असावें. स्वभाव सौम्य असावा. स्वारी करण्याचे घोड्याचा स्वभावही सौम्य असावा. त्याचा आकार चारी आंगांनें सारखा असावा, ह्मणजे शिकारीचे घोड्या इतकी त्याची उंची नसावी. तो चांगल्या औलादीचा असावा. पंधरा हात*व एक इंच उंच असावा. चांगल्या औलादीचा घोडा चलाख असतो पण त्यास ओझें फार सोसत नाहीं. कम औलादीचा घोडा पंधरा हात उंच असला तरी चपळ नसतो व ओझें फार सहन करतो.

---

* टिप—एक हात = ४ इंच.

घोडा विकत घेतेवेळची विशेष अवयव परिक्षा.

एक बाह्य व एक अभ्यंतर असे परिक्षेचे दोन प्रकार आहेत.

१ **बाह्य परिक्षा.**—घोड्याचे डोळ्यावरून त्याची धारणाशक्ति व बळ समजतें. त्याचे वहानावरून त्याची रीत, डोळे, कान, त्वचा, कृत्य व उत्सुकता ह्यांचें ज्ञान होतें. त्याचे परिपाठावरून स्वभाव, उत्साह आणि सुरक्षितपणा हे समजतात. वाईट औलादीच्या घोड्याचे **डोकें** मोठें असतें. **भिवया** भांखुड, डोळे ल्हान, **पापण्या** चिपचिपीत व जाड असतात. जर घोडा असा असेल तर त्याचे मस्तकांतील मेंदु ल्हान असतो ह्मणून त्याला उत्साह कमी असतो. चांगल्या औलादीच्या घोड्याचें डोकें ल्हान व कोनेदार असून दोन्ही भिवयांमधील भाग जितका रुंद असेल तितका चांगला आहे. त्यापासून त्याची चपळता व धूर्तता समजते. त्याचे **ओंठ** जाड असावेत. डोक्यापासून मुसकटापर्यंत त्याचा **चेहरा** चिंचोळा असावा. **तोंड** ओंठापर्यंत सकुमार व पातळ असावें. **नाकपुड्या** मोठ्या, पातळ, रुंद व उघड्या असाव्यात ह्मणजे तेणेंकरून त्याचा चेहरा सुंदर दिसतो व श्वासोश्वास चांगला घेतां येतो. नाकपुड्या मोठ्या असल्या ह्मणजे तो घोडा जलद धांवणारा आहे असें समजावें. मंद स्वभावाचे घोड्याच्या नाकपुड्या कधीं कधीं मोठ्या असतात. परंतु जलद धांवणारे घोड्याच्या नाकपुड्या कधींच कमी असत नाहींत. डोळ्याचा वर्तूळ मोठा व चकचकीत असावा. पापणीचा पडदा पातळ असावा. डोळे मोठे, टवटवीत, तेजस्वी व चंचल असून पापण्याचीं कांतडीं पातळ असावीत. जर डोळा ल्हान आहे तर आणि उघडझाप करतो आणि खोलगट आहे तर त्या घोड्याचे डोळ्यांत चिकट पदार्थ फार असतो व तेणें करून डोळा सुजण्याचा संभव आहे. कार्निया ह्मणजे डोळ्यांतील पातळ

पदार्थ ज्यापासून घोड्यास दिसतें तो ल्हान असून त्याचे अंगीं पांढरेपणा जास्त असल्यास तो हरामी घोडा आहे असें समजावें, व तो दिसण्यांतही बेढब दिसतो. कान आणीदार व रुंद असले ह्मणजे त्या घोड्यांत चांगली धमक असून त्याचा स्वभाव कसा आहे तो समजतो. अशा कानाचा घोडा खोडकर व खेळकर क्वचित असतो. परंतु तो कान पाडतो तेव्हां त्याचे मनांत कांहीं खोडी करणें ह्मणजे चावणें किंवा लाथ मारणें आहे असें समजावें. घोडा व्यायाम किंवा मसल करतो तेव्हां एक कान मागें व एक कान पुढें करतो व चोहोंकडे नजर फेंकतो ही खूण त्याचे शक्तीची व आंगांतील धमकेची आहे. स्वारीचे घोड्याची मान लांब, पातळ व मस्तकाकडे बाकदार असून ती खांद्याकडे आणि छातीकडे जाड असावी. फार मांसल नसावी. छातींत व खांद्यांत घट्ट असावी. घोड्याचे मानेच्या लांबीवर त्याच्या दंडाची लांबी आणि शक्ति अवलंबून असते ह्मणून त्याचा खरा हात उचलून घेण्याची शक्ति दाखविते. त्याचे स्नायु बळकट असावेत ह्मणजे चालतांना पाऊल मागें पुढें करण्यास त्याचे तंगडींत जोर असतो त्यामुळें तो ठेचळत नाहीं. घोडा भरधांव धांवतो तेव्हां त्याचे स्नायु जोरांत असतात व तोंड पुढें करतो तेव्हां मर्यादे बाहेर लगामाची अनि ओढून धरली तरी त्यास समजत नाहीं व तो खिंकाळतो. घोड्याची मान लांब असल्यास डौलदार गाडीस तो अगत्याचा आहे. मान आंखूड असल्यामुळें त्याच्या लगामाच्या दोऱ्या वर केल्या तरी त्याचे मानेस बाक येत नाहीं. स्वारीचे घोड्याहून ओझें वाहणाऱ्या घोड्याची मान जाड असावी. स्कंददेश अयाळीचे अखेर असतो तो उंच कण्याचा असून बोन्डस आहे. मानेचे शेवटचे व पाठीचे पहिले कण्याचे मणक्यांत त्याची गति आहे. घोडा जेव्हां दुडकी चाल चालतो तेव्हां त्याचा पुढील भाग उंच होतो त्याला लिव्हर ह्मणतात. लिव्हरच्या बाहूची जशी लांबी असेल त्याप्रमाणानें घोडा वजन सोसतो.

बसवंड उंच असेल तर स्वस्थपणां व सुरक्षिततेविषयीं चांगला, परंतु शर्यतीचे कामास अवश्यक नाहीं. घोड्याचा स्कंददेश (बसवंड) ठेंगणा असल्यास त्याजवर खोगीर नेमल्या ठिकाणीं चांगलें बसत नाहीं ह्मणून सवदागर लोक खांद्याचा कमीपणा दिसूं नये ह्मणून घोड्याचें डोकें उंच करून दाखवितात. घोड्याचा खांदा चांगला वाईट असेल त्याप्रमाणें त्याचें चालणें चांगलें वाईट असतें. चांगलें चालणें हें त्याचे बळावर आहे. खांदे खोल असावेत व ते स्कंद जोडाच्या थोडे खालपासून मागें व पुढें तिरकस असावेत. लांब व तिरकस खांदा असला ह्मणजे घोड्याचें पाऊल लवचिकपणानें मोकळें पडतें व पुढील पायाची गति जलद असते. घोड्याच्या दोहींकडील खांद्यांचीं हाडें कोनदार असावींत. तुटक्या कड्याचा व तरतरीत खांदा होणें हें खुब्याच्या (बसवंडाच्या) तरतरीतपणावर आहे. खांदा लहान व तरतरीत असला तर त्याचे पाठीवरील ओझें पुढील पायावर पडतें, तेणेंकरून बसणारास हिसका बसतो व त्याचे पायास कदाचित इजा होते. जर दंडाची नळी लांब आहे तर त्याचे पाठीवर ओझें असलें तरी पाऊल पुढें टाकण्यास अडचण पडत नाहीं तथापि तो अडखळतो. चालतांना पाठीवरील ओझें ठिकाणावर राहत नाहीं पुढें घसरतें. हा घोडा बसण्यास बरा वाटत नाहीं. वर सांगितलेल्या प्रकारची नळी ओझें वाहणारे घोड्यास फायदेशीर आहे तें कसें तर त्याचें तें ओझें गळचिपीवर पडतें व त्याचें खोगीर बरोबर बसतें व काम करण्यास गति पुष्कळ मिळते. ओझ्याचे घोड्याची गति जलद असणें हें त्याचे गळचिपीवर जसा भार असेल तशावर अवलंबून असते. स्वारीचे घोड्याचा ऊर टोंकाकडे फार रुंद नसावा. तो रुंद असल्यास दुडक्या चालीस कुशल नसतो. ओझें वाहणाऱ्या घोड्याचा ऊर रुंद असलेला चांगला. पुढील पायाच्या नळ्या नीट तरतरीत रुंद आणि छातीकडे अलग उतरत्या असाव्यात. जर जवळजवळ आहेत तर तो

घोडा पायास पाय लागून दुखवण्याचा संभव आहे. पाय जवळजवळ होण्याचें कारण सुंभाचे खालचा भाग जें मनगट (पॅस्टर्न) तें अशक्त असतें किंवा दंडाचा जोड (एलबोजाइन्ट) वाईट असतो. ओझें वाहणारे घोड्याच्या तंगड्या क्वचित अलग असतात. स्वारीचे घोड्याच्या तंगड्या फार रुंद असतील तर त्यांचें चालणें घोळाचें असतें. घोड्याच्या तंगड्या दंडाचा जोड (एलबोजाइन्ट) पासून फेटलाग (सुंभ) यापर्यंत नीट खालीं दोरीसूत असल्या पाहिजेत. पायाचा आंगठा खांद्याचे टोंकाचे दोरीसूत असावा. जर तो दोरीसूत नसेल तर त्याचें चालणें जरी सुरक्षित असलें तरी मानगडीचें असतें. जर फार मागें असेल तर तो घोडा पडण्याचा संभव आहे. बाहू मोठे, रुंद, मांसल, लांब आणि गुडघ्याकडे चिंचोळे असावेत. बाहू शक्तिवान असणें हें त्यांचे रुंदपणावर आहे. चालण्याची गति त्यांचे लांबीवर आहे. जर बाहू लांब आहेत तर शॉन्क (मांडीचे खालचें हाड) आंखूड असतें. असा घोडा असला ह्मणजे शक्तिवान व जलद चालणारा असतो. जर नाचणारा व फांदणारा घोडा पाहिजे असल्यास त्याचे बाहू आंखूड व शॉन्क लांब असावें. गुडघे मोठे, सपाट व पुढें मागें असावेत. जर गुडघे तंगड्या बरोबर सारखे ह्मणजे दोरीसूत असले तर त्यांस काफनिड असें ह्मणतात. पॅस्टर्न (मनगट) हे खुराच्या व सुंभाच्या मध्यें असतें. मनगट लांब असलें ह्मणजे लवचीक असतें व दिसण्यांत चांगलें दिसतें. सात्रक चाल चालण्यास चांगलें, पण जितके लांब तितके कमजोर असतें व त्यामुळें लचक भरण्याचा संभव असतो. कदाचित त्यापासून पायाचे मागील नळीसही दुखापत होईल. मनगट तरतरीत उभें असतें तें दिसण्यांत चांगलें दिसत नाहीं ह्मणून घोड्यास व वरील स्वारास त्यापासून आनंद होत नाहीं. घोड्यास उपद्रव होतो ह्मणून मनगट तिरकस व लांब असेल तर चालीस चांगलें.

ओझ्याच्या घोड्याचें मनगट नीट असेल तर चांगलें. पाय (घोट्यापासून खुरापर्यंत) जमिनी बरोबर सपाट व स्थिर राहावेत व समोरा समोर दिसावेत. पाय वाटोळे, नरम, काळ्या रंगाचे असले तर चांगले परंतु त्यांजवर कांहीं डाग नसावा. टांच रुंद व तळवा मोठा असून अन्डाकृति असावा. पुतळी मोठी असून मजबूत असावी आणि दिवालीचा ह्मणजे नखीचा कांठ वेगळा दिसावा. ज्याचे खूर निरोगी आहेत ते आंगठ्यापासून चाळीस पंचेचाळीस डिग्री उंच असतात. पांढरे रंगाचे खूर नरम असतात. पायाची भिंत वर्तुळाकार असावी. त्याचा मागचा भाग पुढच्या प्रमाणें उतरता असावा. खूर उंचीस कमी असून बाजूकडे तिरकस असतील तर ते अशक्त असतात. दिवालीचें शिंग (नखीचे वरचा भाग) इतकें नरम असतें कीं, त्यास नालाचा खिळा सोसत नाहीं. टांच कमी, तळवा चपटा व दिवालीचे कांठ लहान आहेत अशा पायाचा घोडा काम करण्यास उपयोगी नाहीं. दिवालीचे शिंगास नाल बांधते वेळेस ते टोंचण्याचा संभव आहे तेणेंकरून घोडा लंगडा होईल. जर ते फार तरतरीत आहेत तर तळवा जाड व अन्डाकृति असतो. जर दिवाल उंच व टांचेकडे खोल असेल तर त्याचा परिणाम फार वाईट आहे. हा नाल करतांना कळत नाहीं. तरी तसले पायास गाम्रिनेस, सॅान्डक्रॅाक व कंट्रॅाकशन वगैरे रोग होण्याचा संभव आहे. घोड्याची किंमत त्याचे छातीवर आहे. छाति चांगली नसेल तर लंग्ज यास जागा थोडी असते. सबब छाती रुंद असावी. छातीचा सांचा त्याचे गळचिपीचे घेरावर अवलंबून असतो. छाती रुंद नसल्यास घोड्याची पचन शक्ति चांगली नसते आणि दम चांगला घेववत नाहीं. थोडें पाणी जास्त झालें किंवा सात्रक जास्त चालला तर लागलेच जुलाब होऊं लागतात. वाटोळे छातीचा घोडा सुस्त, बळकट व नीट स्थितीनें राहतो. तो जास्त लठ्ठ होतो पण सोशिक

असतो. जर छाती खोल असेल तर तो सोशिकपणास व भरधांव चालण्यास दमत नाहीं. कुशी चपट्या नसून खोल व वाटोळ्या असाव्यात. त्या चपट्या असल्यास पोट लोंबतें दिसतें. परंतु चपट्या कुशीचा घोडा थंड कामास उपयोगी आहे. पाठ नीट व लांब असावी. लांबीचें प्रमाण त्यास कामास लावण्यावर आहे. सर्व कामा विषयीं घोड्याचें शरीर आंखूड असावें. आंखूड शरीराचा घोडा ओझें जास्त घेईल व कमी थकेल परंतु मंद चालेल. लांब पाठीचे घोड्यास जास्त ओझें सहन होत नाहीं व शक्ति कमी असते, परंतु चालीस जलद असतो. स्वारीचे घोड्याची पाठ खोल असल्यास तो अशक्त असतो. कंबर फार रुंद व फार मांसल नसून नीट असावी. घोड्याच्या पाठीचा व कमरेचा जेथें मिलाफ झाला आहे तेथें ह्मणजे कण्यांत कित्येक घोड्यांस खोड असते. जेथें कणा अकर्शण झालेला असतो त्या ठिकाणावर वरच्या आंगें बांक असेल तर ती वाईट खोड आहे. कारण घोड्याचें पाऊल सारखे पडत नाहीं व त्यामुळें वर बसणारास सुख होत नाहीं. ह्या घोड्याचे मागील पाय आंत येतात. घोड्याचा मागील भाग तपासण्याची फार सावधगिरी ठेवावी. कारण त्याचे हाडगताचे सांधे तपासल्या पासून त्याची शक्ति व गति समजते. त्याच्या मांसलतेवर, खोलीवर व रुंदीवर शक्तीचें ज्ञान होतें. ह्यांचबोन (मांडीचें हाड) रुंद नसेल तर शेपटीची मांडणूक खोलगट ह्मणजे गाडीचे घोड्याची सांगितली त्या प्रमाणें असते. जर मांडींत खोली व रुंदी नसेल तर त्याचे चालण्यांत मंदपणा आणि अप्रशस्थता असते. मांडी पसरट व रुंद असेल तर तो घोडा चांगल्या औलादीचा व त्या पासून बसणारास कधीं इजा होणार नाहीं ह्मणून समजावें. मागील पायाचे गुडघ्याचा जोड (हाक जाइन्ट) हा पातळ हाडाचा, रुंद व चपटा असावा. जितकें काळीज लांब असेल त्या मानावर त्याची रुंदी अवलंबून असते. हाक जाइन्टचे मागला भाग (असकें-

कसिन) ह्याच्या शिरा बळकट असाव्यात ह्मणजे तंगड्या चांगल्या वळतात. जर गुडघ्याचा सांधा आंखूड व नरतरीत नीट असेल तर त्याचें पाऊल कमी पडेल, तें जर लांब आहे तर चांगलें वळून जलद पडेल. घोड्याचे मागील पाय त्याचे मागें उभे राहून पहावेत. त्याच्या मांड्या रुंद, सरळ व उतरत्या असाव्यात, त्यांचा कल गुडघ्यावर किंवा मनगटावर आंत बाहेर नसावा, ह्मणजे सर्व शरिरावर सारखें वजन राहतें. रावलेल्या घोड्याचे मागले पाय जेव्हां तो उभा राहील तेव्हां समोरासमोर असतात. स्टायफल जाइन्टची दोरी जेथें पडते त्याच्या मागें तीन चार इंचाचे प्रमाणानें समोरासमोर उभे राहवें. जर या पेक्षां मागें असतील तर त्यास मागले पायाचा ह्मणतात. त्याचे मागील पायाचे वळणावर त्याची गति असते. उवणांत कमी किंवा जास्त होणें हें त्या घोड्याच्या मागील गुडघ्याचे (हॉक जाइन्टचे) लांबीवर आहे.

बरेच लोकांचा असा समज आहे कीं, घोड्यांचे विशेष रंगावर त्यांच्या बऱ्या वाईट गुणांचा संबंध असतो. तो असा कीं, त्यांचा अंगस्वभाव व चंचळपणा कामाला योजणेविषयींचा त्यांचे कातड्याचे रंगावरून समजतो. चांगले औलादीचे घोड्याचे जातींत कांहीं रंगाचे घोडे नसतात. परंतु साधारण औलादीचे घोड्यांत पुष्कळ तऱ्हेचे रंग असतात असें पुष्कळ वेळां आढळतें. परंतु तेही चांगल्या औलादीचे असावेत असें वाटतें कारण त्यांच्या तऱ्हेतऱ्हेच्या रंगावर त्यांची किंमत वाढते. असे रंग असणें हें त्यांचे मागील पिढीवरून समजलें पाहिजे. घोड्यास कांहीं रोग किंवा चंचळपणा असणें हें त्याच्या आईबापाच्या प्रकृतीवर अवलंबून असतें; जसे त्याचे आईबाप यांचे गुण असतील त्याप्रमाणें त्याचे गुण होतात ह्मणूनच रंगही तसाच होईल. पुष्कळ वेळां असें समजण्यांत आलें आहे कीं, पांढऱ्या रंगाच्या तंगड्याचे घोड्यांस पायाचे रोग (क्रॅक आणि ग्रिस) हे

त्यांचे आईबापास होते ह्मणून त्यांस झाले. नेहमीं पांढऱ्या टांचेचे घोड्यास हे रोग होतात असें पहातों तरी माझें मत्त असें आहे कीं, पांढरे रंगाचा व रोगाचा कांहीं संबंध नाहीं तर पांढरे रंगाच्या तंगड्या अशक्त नसतात तर पांढरा रंगच कमजोर आहे असें समजावें. पांढऱ्या रंगाचे तंगड्यांस कसलाही डाग सहज पडतो. तो डाग स्वच्छ करण्याकरितां घोडेवाला त्याचे पाय वारंवार धुतो परंतु तो कोरडे न करितां आपेआप सुकण्यास त्या तंगड्या तशाच ठेवतो असें वारंवार केल्यानें ओलसरपणा पासून सर्दी उत्पन्न होते व पायांतील चिकटपणा निघत नाहीं त्या योगानें ती जागा नरम व लवचिक होते. पुढें सूज येऊन त्याचे खूर फुटतात हा त्याचा परिणाम होतो. जरी धुवून कोरडे केले तरी पांढरे खुरांचा परिणाम असाच, कारण वारंवार ओले पाय करण्यानें खुरांचें शिंग कडक किंवा फुटिर होतें.

करडे रंगांत चार भेद आहेत ते असे. पांढरा करडा (सबजा), तांबूस करडा (उंबरा), अबलक करडा व गोमाशे करडा. इतक्या रंगांचे घोडे चांगले असल्यामुळें त्यांस किंमत जास्त आहे. परंतु त्यांचे केंश गळून पडण्याचे ऋतूंत वरील स्वाराचे कपडे खराब होताव. अबलक करडा हा लोकांना फार आवडतो. काळसर करडा हा पुष्कळ आवडतो. कारण त्याचा रंग पुष्कळ दिवस राहतो व हा रंग लोकांस फारच आवडत असल्यामुळें त्या रंगाची इतर रंगापेक्षां फार सुधारणूक झाली आहे. अशा रंगाचे चांगले औलादीकडून घोड्या काढवितात.

चित्रविचित्र रंगाचा घोडा हलक्या फैटन गाडीस जरी जोडीचे एक रंगी असले तरी फार करून लावीत नाहींत. चेसनट तांबडा (बोर) रंगाचे घोड्यांत तीन जातीचे रंग आहेत ते कुमाईत, फिका अगर सावळा, आणि तेलिया किंवा तांबडा काळसर हे होत. फिक्या

रंगाचे घोड्यास पांढऱ्या रंगाचे केश असतात. त्याचा सर्व चेहरा व पाय पांढऱ्या रंगाचे असतात. त्याचा देखावा प्रकाशित दिसतो. त्यावरून तो कमकुवतीचा दिसतो. तांबडा काळसर (तेलीया बोर) ह्या रंगाचा घोडा निरोगी आणि सोशिक असतो, परंतु जलद व शांत स्वभावाचा असतो. त्याचे खूर इतर रंगांचे घोड्यापेक्षां पाळथे व आंखडलेले असतात.

बे (कुमाइत) ह्या रंगाचे अनेक प्रकार आहेत ते असे ब्राइट बे, यलो बे, ब्रोन बे, डार्क बे, डॅक्लेड बे (अवलक कुमाइत) हा रंग निवडक आहे. तसाच गैरा कुमाइत (ब्राइट बे) हाही निवडकच आहे. ह्याची अयाळ व शेंपूट हीं काळ्या रंगाचीं असल्यास ह्यास चांगला समजतात. काळा कुमाइत (डार्क बे) ह्या रंगाचे घोड्याची अयाळ व शेंपूट जाडे व तंगड्या काळ्या असतील तर तो घोडा अधिक चांगला समजावा. यलो बे अथवा ब्रोण (पिंवळा किंवा तपकीरी कुमाइत) ह्या रंगाचे घोड्याची औलाद आलीकडे बरीच प्रगट झाली आहे.

बदामी रंगाचा घोडा तऱ्हेवाईक लक्ष देण्यासारखा जरी दिसत नाहीं तरी चांगल्या औलादीचे चांगले असतात त्यांचा थाट कुमाइता प्रमाणें नसतो परंतु ते बळकट असतात व उपयोगीही आहेत.

डार्कब्रोन (काळा कुमाईत) हा रंग असून त्याचें मुसकट काळें आहे तर त्या घोडयाचे चांगलेपणाची ही एक खूण आहे असें समजतात.

ब्लॅक (काळे रंगाचा) घोडा कावराबावरा असतो. रोगी, खोडकर आणि डोळ्यामध्यें वाईट इतके गुण ह्याचे अंगांत इतर घोड्यांपेक्षां जास्त असतात. काळे घोड्याचे डोळ्यांतील बाहुली त्याला सुंदरपणा देते. त्याचें तोंड किंवा पार्श्वभाग हा जर ब्रोन (तपकीरी) रंगाचा आहे तर चांगला.

अभ्यंतर परीक्षा.—कितीही चांगला परीक्षवान निष्णात् असला तरी एकदम चांगली परीक्षा करितां येणार नाहीं. घोड्याची परीक्षा फार बारकाईनें केली पाहिजे. व ती कांहीं दिवस त्याचे सहवासावर केली पाहिजे. परंतु अशा करारावर घोडा विकत मिळणें कठीण ह्या साठीं जितकी चांगली परीक्षा होऊं शकेल तितकी मन लावून करावी आणि मग पसंती प्रमाणें घोडा विकत घ्यावा. कित्येक घोड्यांस पाणी पाजल्यावर किंवा दाणा खाल्यावर किंवा दोन तीन दिवसांनीं किंवा त्याचें ठाण बदलल्यानें ढास लागते. थोड्या ढाशीचे घोड्यास खाण्याचा चांगला बंदोबस्त ठेवल्यास अगर जुलाब दिल्यास त्याची ढास दहा पंधरा दिवस पर्यंत बंद राहते परंतु मग फिरून पहिल्यासारखी उत्पन्न होते. ह्या साठीं घोड्यास सहवासून पाहिल्या शिवाय खरेदी करूं नये. जो घोडा विकत घ्यावयाचा तो ज्या ठिकाणीं बांधतात तेथें मोठ्या सकाळीं जाऊन ठाण्यावर पहावा ह्मणजे त्याचे पाय सुजीर आहेत कीं काय व ताठपणा आहे कीं नाहीं हें समजेल. कोणताही घोडा तपासणें तो त्याजकडून काम घेण्यापूर्वीं ह्मणजे विसावा घेत असतांना तपासावा. जर घोड्याचे पायांत लंग असेल तर तो लंग काम करून आणल्यावर लागलाच तो अयब समजूतींत येणार नाहीं. जर घोड्याचे पाय सुजीर असले तर त्यास थोडा दुडकीवर चालवून व त्याचे पाय स्वच्छ करून सवदागर लोक त्याची ती अयब दृष्टोत्पतीस आणूं देत नाहींत. सकाळच्या प्रहरीं तबेल्यांत तपासणें ही वेळ घोड्याचे अयब दृष्टोत्पतीस येण्याची आहे. घोड्यास दम्याचा अजार किंवा खोकल्याचा अजार किंवा (क्रिबबिटिंग) चावण्याची खोड व श्वासोश्वास कसे घेतो वगैरे दुर्गुण उघडकीस येण्यास मोठे सकाळची वेळ चांगली असते. याकरितां जेव्हां कांहीं गोंगाट किंवा धामधूम नसेल तेव्हां तेथें घोड्यास तपासावें. अशा जागेंत व अशा वेळीं जर

न तपासतां गडबडीचे ठिकाणीं तपासला तर घोड्याचे पायांत थोडका लंगडेपणा असेल तो दिसून येणार नाहीं.

घोडा प्रथम सहाजिक रीतीनें उभा करावा. तेव्हां तो आपले शरीराचा तोल दोन्ही पायांवर सारखा ठवेतो. जर पायांत कांहीं व्यंग असेल तर एक पाय पुढें मागें ठेवील व वारंवार पाय बदलील ह्मणजे एक पाय उचलून धरील व एक जमिनीवर ठेवील व मागले पाय पोटाकडे आणील ते अशा करितां कीं, पुढील पायांवर वजन कमी पडावें. अशा प्रकारें ज्याचीं चिन्हें दिसण्यांत येतील त्याचे खुरामध्यें कांहीं रोग असल्यास ते बिना नालकाढल्या खेरीज समजणार नाहींत. नाल असतांना पाय चांगले दिसतात. परंतु तेच पाय नाल काढून पाहिल्यावर दिवालीचे शिंगाचा रोग कळून येतो. घोड्याची प्रकृति निरोगी आहे कीं नाहीं हें त्याचे श्वासोश्वासावर पाहावें. त्याच्या कुशीचें उडणें कमजास्ती किंवा सारखें आहे हें पहावें. निरोगी घोड्याच्या कुशी एका मिनिटांत चार पासून आठ वेळां उडतात. एकंदर एका दिवसांत एका मिनिटांत सहा वेळ कुशी उडतात आणि झोंपेच्या वेळेस एका मिनिटांत चार पेक्षां क्वचित जास्त उडतात. ह्या नियमाविरुद्ध जास्त उडूं लागल्या तर त्या घोड्यास ताप येणार आहे किंवा त्याचे लंग्ज (फुप्फुस) बिघडले आहेत ह्मणून समजावें. जर घोड्याच्या भकाल्या तापाच्या योगानें उडत आहेत तर त्यास पुढें सांगितलेलीं चिन्हें झालीं पाहिजेत. त्याच्या नाड्या जलद चालतील, तोंड गरम होईल, सुस्तपणा येईल आणि त्याचे रंगांत फिकेपणा येईल. जो निरोगी असतो त्याचे नाकपुड्याचा रंग टवटवीत असतो. अशक्त प्रकृतीचीं किंवा तापाचीं हीं चिन्हें दिसत नसतील आणि त्याच्या भकाल्या नियमापेक्षां जास्त उडत असतील व हवा मध्यम आणि तबेला फार गरम नाहीं तरी त्याच्या भकाल्या जास्त उडतात तर त्या घोड्यास थिकवुन्ड-

चा अजार आहे असें समजावें. श्वासोश्वास जलद घेतो व सोडतो हें फार धांवण्याचें किंवा जास्त श्रमाचें काम पडल्यास होतें. परंतु नियमीत कामांत असते वेळीं जर त्याच्या भकाल्या आकस्मात जास्त उडतील व श्वासोश्वास जलदीनें व श्रमानें सोडील तर त्यास ब्रोकन वुइन्डचा (धापा टाकण्याचा) अजार आहे असें समजावें आणि अशा अजारांत खोकल्याचाही अजार असतो तो समजणें कठीण आहे. खोकल्याचा अजार होण्याचा असला ह्मणजे घोड्याचा गळा कोरडा राहतो. कारणपरत्वें चांगले व ब्रोकन वुइन्डचे घोड्यास कधींहि खोकला नसतो. खोकला समजणें हें त्याचे (वुइन्ड लॉरिंग्ज पाइप) श्वासाचे नळीचे कठीणपणावर आहे. कठीण-पणा नसतांनाही ब्रोकन वुइन्डचा अजार होण्याचें चिन्ह तो अजार कुशी (भकाल्या) अनियमितपणानें उडाल्या ह्मणजे समजावें.

घोड्याच्या कुशीचे, डोक्याचे व शेंपटीचे केंस घोळले असतां अगर घोड्यानें इतक्या ठिकाणीं स्वतः घासले आहेत असें दिसेल तर त्या घोड्यास खरूज होण्याची भीती आहे. ज्या घो-ड्याची त्वचा खरबरित आहे त्यास खरूज होतेच. अंधेर आहे अशा तबेल्यांत घोडा बांधला असतां तेथून तो उजेडांत आणते वेळेस कान चंचल करील, भ्यायलासें दाखवील, पाय उंच करील, व मागें हटेल तर जरी त्याचे डोळे चांगले दिसतात तरी त्याचे डोळ्यांत कांहीं अजार आहे असा संशय घेतला पाहिजे.

घोडा तबेल्या बाहेर आणून पहाते वेळेस तो आपले पाय स्थिर ठेवून मागले पायाचे मागील नळीवर ह्मणजे मागील गुडघ्याचे खा-लचे नळीवर व मनगटावर सारखें वजन ठेवून उभा राहिला पाहिजे. जर ते समयीं घोडा आपला पुढला भाग हालवील किंवा कांपवील तर त्याचे पायांत इजा आहे असें समजावें. अशा घोड्यास (आगी)

ह्मणून एक प्रकारचा अजार होतो. त्या अजाराचें चिन्ह दुसरें आणखी एक असें आहे कीं, तो आपला गुडघा बाहेर करतो व गुडघ्याचे मार्गे दाबला असतां वळवून आंत घेतो. आपले शरीराचा तोल आंगळ्यावर ठेवतो खुरावर ठेवीत नाहीं हेंही एक त्या रोगाचें चिन्ह आहे. घोडा लहान वयाचा असून बसायास शिकण्यापूर्वीं त्याचे गुडघ्याचा आकार वाईट असेल तर तो घोडा अशीं चिन्हें करतो. परंतु त्या शिवाय आणखी एक चिन्ह ह्मणजे त्याचे अवयव (इंद्रियें) कांपरीं असतील तर खचित त्यास पायाचा अजार होईल सबब तो घेऊं नये. पुढील पायाचे दोन खुरांपैकीं एक खुर फार तरतरीत आहे तर तो पाय रोगी आहे असें समजावें. घोडा त्या पायावर आपला तोल ठेवीत नाहीं. ज्या घोड्याचा असा तऱ्हेवाईक अंगस्वभाव आहे त्याचे पायास रोग होऊं लागला आहेच असें समजावें. अशी आदत उभी राहाण्याची फार दिवसांपासून आहे तर त्याचे पाय (खुर) कांहीं भिन्न आकाराचे असतात. त्याच्या खांद्याचे व बाहूचे स्नायु आंखडलेले ह्मणजे कमी आकाराचे असतात. घोड्याच्या पुढील तंगड्या बरोबर स्थितींत असाव्या. मनगट अशक्त नसावें व त्याचे वरचा भाग (ह्मणजे सुंभ) मोठा नसावा. खुर सारखे आकाराचे व त्याचें उभें रहाणें सारखे समोरासमोर असावें ह्मणजे चांगलें. घोड्याच्या स्वस्थ प्रकृतीची परीक्षा त्याचे श्वासोश्वासाचे स्थितीवर व डोळ्याचे तेजीवर व पापणीचे पातळ पड्यावरचे रंगावर आणि नाकपुड्याचे पातळपणावर आणि रंगावर आहे. हे रंग पांढरे, तांबडे व फिक्कट असतात. जर फार लालभडक रंग आहे तर त्याचें शरीर व प्रकृति प्रफुल्लीत असते. जर फिक्का पांढरवटपणावर असेल तर त्याची प्रकृति अशक्त किंवा तो कमजोर आहे समजावें.

घोड्याच्या दोन्ही नाकपुड्या एका मागून एक दाबून पहाव्या, आणि त्यापासून श्वासोश्वास होण्यास कांहीं अडथळा आहे कीं काय

हें पहावें. त्याच्या नाकाचें टोंक बारिक नसावें. नाकपुड्यांतून श्वास जातां येतां शेंबूड निघेल तर त्यास थोडा खोकला व थोडी थंडी झाली आहे असें समजावें. नाडी जलद चालते. त्या बरोबर डोळ्यासही ईजा होते. त्याच्या खालचे जबड्याच्या शाखा तिव्र होऊन तेथील मासाचे गोळे मोठे होतात. त्या जरी नरम व चलन वळण होणाऱ्या आहेत तरी त्यास शेंबा (पडसें) ह्या पेक्षां ज्यास्त अजाराचें चिन्ह नाहीं. कोणत्याही अजाराची परीक्षा करतांना त्याचे वयाचीहि परीक्षा करावी.

तरूण घोड्याचें डोकें तपासते समयीं त्याच्या कपाळाच्या शिरा उष्ण, सुजलेल्या व नरम लागतील आणि नाकपुड्याचे पडदे तांबडे झालेले दिसतील व दोन्ही नाकांतून शेंबूड वहात असेल तर त्यास ताप व खोकला आहे असें समजावें. त्या शिवाय त्यास (स्ट्रॅंगल) चा अजार होईल असें अनुमान केलें पाहिजे. जर ताप व खोकला नसेल आणि फक्त डावे नाकपुडींतून शेंबूड वहातो आहे तो शेंबूड चकचकीत व चिकट असेल आणि जबड्याचे हाडाला मासाचा गोळा चिकटून राहिला असेल तर त्यास ग्लॅन्डर हा रोग होईल. नाकपुड्याचे पातळ पडदे व पांढरे फिक्कट रंगाचे दिसतील आणि त्याजवर उष्णतेंचे फोड असतील तर त्यास ग्लॅन्डर रोग खास आहे असें समजावें. डोळ्यांतून जें नाकाच्या नळींतून नाकांत पाणी येतें, त्या नळीचें द्वार तपासण्यास हयगय करूं नये. त्याचें चेहऱ्यावर किंवा डोक्यावर कांहीं चीर पडलेली नाहीं हें पहावें; जर असेल तर त्यास भयंकर रोग होईल असें समजावें. शेंडीची जागा पूर्ण कठीण स्थिर असावी व मानेला चिकटून असावी. जर पोकळ व ढिली असेल तर तो चांगल्या स्थितींत नाहीं. त्याचें कातडें नरम व तुळतुळीत असतें. त्याचे स्नायूस स्पर्श केला असतां ते कठीण लागतात. ह्यातान्या घोड्याचें डोकें लहान होतें व चांगलें दिसतें. त्याचें रुप तेजस्वी दिसतें.

मान चांगली असते. वसवंड आंखूड असते. पाठ खोल असते. ओं-ठांवर सुरकुत्या असून पातळ असतात. खालचा ओंठ लोंबूं लागतो. तरूण घोड्याचा बांधा वाटोळा, घट्ट, तोंड टवटवीत, असतें वयातीत घोड्याचे नाकाचे हाडामध्यें केव्हां केव्हां खांडी पडलेल्या असतात. घोड्याचे छेदक दांत लागून व घट्ट असतील तर तो घोडा तरूण समजावा, व जस जसा तो वाढतो तसतसे त्याचे दांत लांब होतात व हिरड्या सुटूं लागतात.*प्रथम घोड्याचे डोळे पहावे ते चांगले असल्यास दुसरीं चिन्हें पाहून त्यांत कांहीं खोड न निघेल तर मग चालवून पहावा. साधारण चाल चालविल्यावर मग दुडकीवर चालवावा.दुडकी चालवतांना त्यास चाबूक मारूं नये, ह्मणजे त्याचे चालींत जे दोष असतील ते दिसून येतील. त्याचे चालण्याकडे ह्मणजे तो पाऊल कसें काय टाकतो याजकडे चांगलें लक्ष्य द्यावें व त्याच्यांत लंगडेपणा नाहीं याची खातरी करून घ्यावी. जर घोड्याचा पुढचा एक पाय अधू असेल तर तो आपलें डोकें चालतांना खालीं वर करतो. पूर्वी लंगडा घोडा असेल तर तो चांगल्या पायावर चालते वेळेस त्याचें डोकें खालतीं होतें. जेव्हां लंगडे पायावर ओझें पडतें तेव्हां डोकें वर करतो. त्याचा पाय लंगडा असल्यानें त्या पायाची गति मंद असते. दोन्ही पाय मृदु असतील तेव्हां त्याचे गतीची परीक्षा करणें कठीण आहे. परंतु त्याचें पाऊल तोकडें पडतें हें खचित आहे.

घोडा दुडकीवर चालतांना त्याची चाल जर चांगली असेल तर त्याचें पाऊल पुढें मागें चांगलें पडतें. दंड व गुडघा यापासून त्याची गति निघाली पाहिजे. मागले पाय धोटच्याखालीं बरोबर आले पाहिजेत. त्यानें आपळे आंगठे जमिनीपासून नीट उठवले पाहिजेत; ह्याविरुद्ध जर दिसेल तर तो घोडा खोडकर आहे असें समजावें.

---

*टीप—या संबंधीं विशेष माहिती दंत परीक्षेचे भागांत पहावी.

दुडकीमध्यें पुढील पायांनीं हलका जावा व मागील पाय उत्साहानें टाकावे, शरीराचा तोल पुढें असावा. घरसोड करून चालेल तर तो घोडा नीट नाहीं, त्यास जरी शिकवलें तरी तो चांगला होणारा नाहीं. चांगलाही घोडा केव्हां केव्हां अडखळतो. त्याचें कारण चाबूक व ममरेज ह्यांची भीति होय. परंतु ही खोड त्यास फार दिवसांची असावी. अशा वेळीं तो चांगलें नीट चालतो कीं नाहीं हें पहावें. गाडीच्या घोड्याचें डोकें व शेंपूट घड्याळाचे पेंड्यूलम सारखें हालेल तर तो चांगल्या औलादीचा समजावा.

घोड्याची दुसरी परीक्षा—घोड्यावर बसून त्यास कठीण किंवा दगडी रस्त्यावरून चालवून पहावा. जर थोडा लंगडेपणा असेल तर तो त्यावेळेस कळून येईल. चांगला घोडा सरळ लाइनींत चालतो, गुडघा नीट वळवतो, स्थिरतेनें पाऊल सारखें न भितां टाकतो व डोकें हालवीत नाहीं त्याचे मागले पाय त्यानें चांगले रीतीनें उचलावे. व त्याची मुरड चांगली त्याच्या पोटा खालीं यावी. टेकडी चढतांना त्याचे पुढील पाय सारखे जातील व त्याचे मागील पायही त्याचप्रमाणें चालले पाहिजेत. सुंभाचा आंगठा फरकटूं नये. सात्रक चालतांना पाय उचलून जलदीनें चालावा आणि उसळून मांडी चांगली वळावी ह्मणजे मागील पायांचे तंगड्यांचा झोंक मागें राहूं नये तर तो घोडा चांगला चालेल. घोडा अशा रीतीनें चालला असतांना परीक्षकानें तो जेव्हां सात्रक चालींत त्याचे जवळ येतो तेव्हां त्याणें त्याचे श्वासोश्वासाची परिक्षा करावी. थिकूवुइन्ड अजाराचा घोडा श्वासोश्वास फार कष्टानें सोडतो आणि लवकर कासावीस होतो, भकाऱ्या जलद चालतात व फार उडतात आणि किंचित् ध्वनि निघतो. मेहनतीनें भकाऱ्या जशा उडतात तशा ह्या उडत नाहींत. नेहमीं ठाणावर रहाणारा, व ज्यास व्यायाम फार नाहीं, आणि शरीरानें फार लठ्ठ, त्या घोड्यास भरल्या पोटानें काम करतेवेळेस थिक-

फुफ्फुसांतील चिन्हें दिसतात. असेंही पहाण्यांत आलें आहे कीं, जो घोडा पुष्कळ खाऊन लठ्ठ झाला आहे त्या घोड्याचे श्वास मैल दोन मैल गेल्यावांचून किंवा पसिना (घाम) आल्यावांचून बरोबर वहात नसतात. ते जरी दुसऱ्या घोड्यांपेक्षां काम जास्त करण्यास लायक असतात तरी ह्या हरकतीमुळें तितकी मेहनत त्यांस होत नाहीं.

ज्या घोड्यास थिकवुइन्ड शिवाय (विझर) घरघर आणखी आहे, आणि दमेकरी मनुष्याप्रमाणें त्याचा आवाज धाईच्या वेळीं जसा निघतो तसा असेल तर तो वाईट आहे.

अशा विझर घोड्याचा स्वस्थ असतांनाही केव्हां केव्हां अवाज निघतो. घरघरीमध्यें आणखी एक प्रकार आहे त्यास पायर अथवा व्हिस्टलर ह्मणतात, ह्मणजे त्याचा अवाज पोंवा किंवा शीळ वाजवणें ह्यासारखा निघतो. ही खोड ह्मणजे हा अवाज विझरपेक्षां कांहीं बारीक व कर्कश आहे. हा मेहनत केल्यावरच दृष्टीस येतो. तो कांहीं वेळपर्यंत असतो. चढणीला जेव्हां सात्रक चालीनें घोडा जातो तेव्हां ही खोड असल्यास लागलीच कळून येते. व्हिस्टलरचा घोडा लवकर दमतो अगर हैराण होतो. ह्याकरितां व्हिस्टलरचा रोग असलेला घोडा कधीं विकत घेऊं नये.

रोअरिंग ह्मणजे एक तऱ्हेची घरघर आहे. जेव्हां घोडा काम करीत असतो तेव्हां ही खोड दिसण्यांत येते, स्वस्थपणांत येत नाहीं. मेहनतीचे वेळेस त्याचे श्वास जलद चालतात व अवाज वाढतो, हें जशी त्याची मेहनत असेल याप्रमाणें होतें. दुडकी चालण्यांतही असा शब्द निघतो.

सवदागर लोक ह्या खोडी दृष्टोत्पत्तीस न याव्या ह्मणून घोडा पहिल्यानेंच दवडतात व परत येतेवेळेस हलके सात्रकीनें आणतात ह्मणजे त्या वेळेस त्याचे श्वासोश्वास कमी होतात. हा रोग फुप्फुसयास

सूज असल्यानें किंवा श्वासोश्वासाचे स्थितींत फेरबदल झाल्यानें होतो. केव्हां केव्हां काम घेतल्यावर किंवा स्वस्थपणांत आठवड्यांतून एखादे वेळेस हा दिसण्यांत येतो. यास्तव घोडयास तपासणारांनीं त्यास नखद सात्रकोवर चालवून पहावा. धापेचा घोडा तपासण्याची साधारण रीत ह्मणजे ज्या घोडयास खोकल्याचा अजार असतो व त्यांत ज्या घोडयास खोकल्याबरोबर ठसका असून कुंथणें व रेकणें असेल त्या घोड्यास तो अजार निश्चयानें आहे असें जाणावें. परंतु जर खोकला दृष्टीस पडत नाहीं आणि संशय असेल तर कसबी मनुष्याकडून त्याची तपासणी करावी. कारण साधारण अयत्न असतात ते थोडके वेळांत कळून येत नाहींत.

घोडयाचे चालींत जर आपल्यास कांहीं संशय येण्यासारखीं चिन्हें असतील तर त्याचे सर्व शरीराचे भाग बारीक रीतीनें तपासावे. घोडयाचे कपाळावर किंवा गुढघ्यावर कांहीं भाजल्याचा किंवा क्षताचा डाग दिसेल तर त्या घोड्यास मेग्रिम (मिरगी) किंवा (स्टॅगर) वेड लागणें हा अजार पूर्वी झाला होता असें समजावें. मान खरारा करून पहावी. गळ्याच्या शिरा बरोबर आहेत कीं नाहींत हें पहावें. खरारा करून किंवा चोळून पहावें ह्मणजे मानेच्या खालचे भागावर पुर्ता जोर पडून शिरा टवटवीत दिसतील व त्यावरून त्याची खरी स्थिती कळेल. चांगल्या शिरा असल्या ह्मणजे त्या हाताला लागतात व फुगीर दिसतात. जर त्या शिरांपैकीं एकादी कमी दिसेल तर त्यास पूर्वी स्टॅगर अगर अपोप्ल्याकटीक हा आजार झाला होता असें समजावें.

खांद्याचा जोड व बसवंड खोगीरापासून दुखावलें कीं काय हें पहावें जर दुखावलें असेल तर त्या ठिकाणीं सूज व गर्मी राहते. पाठीला जर थोडी सूज असेल तर तो घोडा बरेच दिवस बसण्याचे उपयोगीं पडणार नाहीं. उडी मारून त्याजवर बसते वेळीं तो

उपायी (दोन पायांवर) उभा राहील. त्यांवर कांहीं गांठ वगैरे झाली आहे कीं काय हें पहावें, जर त्याजवर भाजलेलें किंवा डाग दिलेलें चिन्ह असेल तर पूर्वीं तेथें दुखापत होती असें समजावें, व पायांत लंगडण्याची दर्द आहे असें नव्याण्णव वाटेनें आढळेल. टांचेस डागाची व वाटोळी निशाणी असेल तर खुरास कांहीं रोग झाला होता ह्मणून समजावें.

ऊर व छाती नीट तपासावी. त्याजवर ब्लीस्टरानें किंवा डागानें किंवा पोतानें भाजल्याचें चिन्ह असेल तर त्या घोड्यास छातीचा किंवा फुप्फुसाचा सुजीरपणा हे दर्द पूर्वीं होते ह्मणून समजावें. पूर्वा-पार संबंधानें त्या घोड्यास भरसात्रक चांगला चालवून पहावा ह्मणजे त्यास नेहमींची ही खोड आहे कीं काय हें कळून येईल. अरुंद छातीचे घोड्यास तर अगत्य असें तपासलेंच पाहिजे.

गुडघा नीट तपासावा. प्रथम तो ज्या आकारांत असणार त्या आकारांत आहे कीं नाहीं हें पहावें. नंतर गुडघ्या वरचें कातडें निघालेलें होतें कीं काय हें पहावें. कातडें निघालेली खूण असल्यास अथवा डाग दिल्याची खूण असल्यास तो घोडा चालतांना ठेंचाळतो असें अनुमान करावें.

गुडघ्यांत अयब असण्याचीं पुष्कळ कारणें आहेत. पायाखालीं दगड वगैरे आला असतां तो अडथळा निवारण करण्याकरितां वांक-डे तिकडे पाऊल टाकल्यानें किंवा उडी मारल्यानें गुडघ्यास दुखापत होते, अगर फार मेहनतीनें किंवा विशेष थकल्यानेंही दुखापत होते. गुडघ्यांतला अयब अलीकडचा आहे व त्याजवर विशेष डागाची वगैरे कांहीं निशाणी नाहीं असें जरी असेल तरी त्याचे दुसरे अ-वयव चांगले बारीक रीतीनें तपासावे. त्यास चालवून पहातांना त्याच्या तंगड्या, खूर, नालबंदीचे खिळे जवळ जवळ आहेत कीं काय व नाल फार घट्ट आहेत कीं काय हें पहावें. पायांत जो

घेरडा नरम आहे त्याचा आंगठा फार लांब उघडा राहिला तर तो आडखळतो. नरम पायास कंट्रकशन, प्रामीलेमनेस, कार्न्स हे रोग असतात. डोळ्याचे वरचे भागावर मस्तकाचे ठिकाणीं डाग असेल तर तो डाग द्व्यअर्थी नसतो परंतु संशय घेण्यास कारणभूत आहे. घोड्यास साधारण होणाऱ्या रोगांपैकीं कोणत्या रोगावर हा डाग दिला आहे ह्याचा निवाडा होत नसेल तर मिरगी किंवा स्टॅगर रोग झाला होता ह्मणून समजावें.

जर घोड्याचे गुढघ्यावर डाग लहान व वसवंड तरतरीत व खांदा आणि मनगट मांसल याप्रमाणें असेल तर त्या गुढघ्यांत काय खरें हें तपासणें फार कठीण आहे. असें आढळून येतें कीं, जखम झालेले ठिकाणावर इतके केंस येतात की तेथें जखम होती असें समजत नाहीं यास्तव बारीक रीतीनें पहाण्यांत जर डागाचें चिन्ह कळून येईल तर त्या ठिकाणीं झिल्हई दिसते व केंस तिरकस येतात त्यावरून किंवा गुढघा वळवून पाहिल्यावर काय गुप्त व्यंग आहे तें कळेल.

सॅक्रम ह्मणजे नळींचें हाड तपासण्याचें कारण बेरहडीचे रोगाविषयीं आहे. यास्तव त्या ठिकाणीं भाजल्याची किंवा ब्लिस्टर लावल्याची खूण आहे कीं काय हें पहावें. पायाच्या नळीचें लवचीक हाड मोठें झालें आहे अथवा त्यांत लचक आहे कीं नाहीं हें तपासावें. नुसते डोळ्यावरून घोडा चांगला आहे असें समजूं नये. ज्या घोड्याचे पायावर केंस फार आहेत त्या घोड्याच्या तंगड्या विशेषेंकरून तपासाव्या. घोड्याचे हात ह्मणजे तंगड्या गुढघ्या पासून खालीं चांगल्या सरळ आल्या पाहिजेत व त्या तंगड्याचें पुढील व मागील हाड ज्यास (सॅक्रम) ह्मणतात तीं दोन्हीं हाडें चांगले आकारांत असावीं, कमजास्त नसावीं, हें सॅक्रम चपटें असावें. संधी बंधनाच्या शिरा अगदीं वेगळाल्या असाव्या व त्या हातास कठीण

लागाऱ्या व त्यांची रचना ताठ असावी. नळीच्या मागील हाड जर मऊ लागेल आणि लवचीक शिरांचें वेस्टण सुजलें असेल व एके ठिकाणीं हाडासहीत गोळा झाला असेल तर तें फार वाईट आहे. असें असल्यास हाडांचीं बंधनें तुटलीं आहेत असें अनुमान करावें. जर अस्तिबंधनें चिकटलेलीं किंवा सिथील असतील तर तीं सुजलेलीं असून त्यांत लचक राहते. जर नुकतीच दुखापत झालेली आहे तर पायास सूज, गरमी व लंगडेपणा जास्त असतो. उपचार केल्यास कांहीं कमी होतो परंतु त्या लवचीक शिरा जाड रहातात आणि सुजीर असतात. घोडा दिसण्यांत चांगला दिसतो व बांधा नीट, चालण्यांत कांहीं अयब नाहीं असें असेल तरी तो कामास लावला असतां लंगडा होतो. ह्यास्तव हें पक्कें लक्षांत ठेवावें कीं, बेरहडीचे रोगाविषयीं खरेदी घेणारानें खरेदी देणाराकडून जिम्माच घेतली पाहिजे. बेरहडी मोठीच असेल तर पायाचे तंगडीचा मागला भाग नीट नसतो. जर लहान आहे तर तें हातावरूनच कळतें. ह्या बेरहडीस औषध (बिनिवोडाईड आफ मर्क्यूरी आइन्मेन्ट) एक ड्राम द्यावें. व दोन तोळे डुकराचें तेलही एका ठिकाणीं मिळवून बेरहडीवरचे केंस काढून त्यावर तें तेल चोळावें. इतकें चोळावें कीं त्यांतून पाणी निघूं लागेल, नंतर चोळणें बंद करावें. दिवसांतून एक दोन वेळ तेल लावल्यावर ऊन पाण्यानें फोमेनटेशन करून शेकावें. लहान मोठे मिटॅकॅरपलचे हाडाशीं संबंध असणाऱ्या ज्या तंतुमय शिरा ह्या धक्यानें किंवा लचकेनें दुखावल्या असतां सूज उत्पन्न होऊन घोडा लंगडूं लागतो. जेव्हां त्या शिरा सुजीर असतात, व त्यावर गांठी वाढूं लागतात, व हाडावरील आणि शिरावरील पडदे कठीण होतात, तेव्हां घोडा लंगडतो. गांठी बसून सूज कमी झाली व हाडें जिकडची तिकडे निट बसलीं ह्मणजे लंगडेपणा राहतो. याप्रमाणें बेरहडी-

ची उत्पत्ति आहे. ती पुन्हा उत्पन्न झाली तरी याच प्रकारानें होते. बेरहडी फार मोठी असेल व चालण्यास अडचण करीत असेल तर त्यास मार लागण्याचा संभव आहे. सबब असा घोडा घेऊं नये. जर गुडघ्यापाशीं बेरहडी आहे किंवा बंधनापाशीं आहे व त्यापासून चालण्यास अडथळा होतो किंवा साफ चालतां येत नाहीं तर अशा प्रकारचा घोडा घेऊं नये. साधारण असल्यास ती त्याच्या शोभेस वाईट आहे. ज्या बेरहडी समजुतींत येत नाहींत त्या फार वाईट व त्यांपासून लंगडेपणा घोड्यास प्राप्त होतो.

घोड्याचे कोणतेही शरिराच्या भागावर डाग दिल्याची अथवा ब्लिस्टर मारल्याची निशाणी आढळेल तर विकत घेणारानीं त्याची फार खबरदारी ठेवावी. कोणत्या कारणाकरितां व कोणत्या उपायावर डाग दिला आहे हें शोधण्याचा इलाज करावा. जर ब्लिस्टर लावलें असेल तर त्या ठिकाणचे केंसांचा रंग पालटतो व केंस अंखूड अंखूड राहतात. अशा जागा लवकर समजण्यांत येतात. त्यांचा चकचकीतपणा कमी असतो व केंस राठ राहतात. फेटलागजाइन्ट गुढघ्याचे खालीं (मुट्ठा) ही पाय वळण्याची जागा आहे. त्याचा बांधा जर घोटाळ्याचा असेल तर तेथें कांहीं तरी दर्द आहे असें समजावें व अशा घोड्यास बारकाईनें तपासावा.

दोन्ही पायाचे मुट्ठे सारखे आहेत किंवा नाहींत तें पहावें. जर सारखे नसतील तर त्यापैकीं एकांत लचक आहे असें समजावें किंवा त्याचे लिगमेन्ट (हाडांचें बंधन) तुटलें आहे असें अनुमान करावें, व त्यामुळें तो भाग नेहमीं कमकुवत राहतो.

जर नुकतीच दुखापत झालेली आहे, तर ती जागा ऊन लागेल व दाबलें असतां दुखेल व त्या ठिकाणीं उपचार केल्याची खुणही दिसेल. जरी घोड्याचे पायांत लंगडेपणा नसेल तरी तो पाय

अधु आहे असें समजावें. जर फेटलाग (घुट्टा). व पॅस्टर्न (मनगट) ह्या ठिकाणीं सूज किंवा बधिरपणा असेल तर त्या घोड्याचा पाय भंग पावणारा आहे असें समजावें व त्याचे खुरांत दर्द असल्याचें चिन्ह दिसून येईल. जरी त्याचा आकार चांगला दिसतो आहे तरी तो पुष्कळ चालल्यावर व वाईट नाल केल्यावर त्याच्यांत काय व्यंग आहे तें समजून येईल.

घोड्यास जर फार दिवसाची कांहीं खोड आहे तर त्याचे नाल दुसऱ्या तऱ्हेचे ह्मणजे जाड व दिवालीचे बाहेरचे बाजूपेक्षां आंतील अंगास अरुंद असतात. त्या नालाच्या मेखा सुंभाचे बरचे बाजूला व आंगठ्याच्या वर्तुळाकडे ठोंकलेल्या असतात अथवा कानशीनें नाल घासलेले असतात, व खुर नालाचे पुढें वाढलेला ठेवतात.

ज्या घोड्याची छाति अरुंद असते तो घोडा आपले पाय जवळ ठेवून उभा राहातो, त्यापेक्षांही आणखी जवळ पाय ठेवणारा घोडा दिसेल तर त्याचे पाय भंग पावणारे आहेत असें समजावें. त्या घोड्याचे नाल बाहेरच्यापेक्षां आंतल्या बाजूला पातळ असतात.

जो चतुर मनुष्य आहे तो हे सर्व अयब झांकण्याकरितां नाल तऱ्हेवाईक बांधून त्याची छपावणी करतो. आंतील आंगास नाल अरुंद व सुंभाचे बाजूचे दिवालीकडे कमी जाड ठेवून कानसतो. जरी असें केलें नाहीं तरी त्याची नखी पॉलीस (साफ) करतो.

सुंभाच्या दोन बाजवा आहेत, त्यांपैकीं आंतील आंगास नाल बाहेरच्या आंगापेक्षां उतरते करतात व त्याचा आंगठा वरती दाखवितात. तंगडीमध्यें ओझ्याचा मार सोसण्याचा जो अशक्तपणा आहे तो अशा योगानें दिसून येत नाहीं, परंतु पायांतील इजा नाहींशी होत नाहीं. लहानपणीं शिंगरास लवकर कामास लावतात ह्यामुळें त्यास ही इजा होते.

जर सुंभाचें वळण कांहीं पुढें आहे तर खचीत त्या पायास कांहीं दुखापत झाली होती असें जाणावें.

सुंभाचे जोडाचे ठिकाणीं खालचे वरचे केंस चांगले तपासून पहावें कारण त्या ठिकाणीं भाजल्याची खूण वगैरे असते. सुंभाचे मर्मस्थानीं टोंचून जर बधिरपणा झाला असेल तर तोही दिसून येईल व त्या ठिकाणीं गांठ व सुजिरपणा असावा असें दिसून येईल.

पॅस्टर्न (मनगट) ह्या ठिकाणीं चक्रवाळ रोग होण्याची जागा आहे ह्मणून त्या ठिकाणीं सूज आहे किंवा हाडें तुटलीं आहेत हें पहावें. पायाचीं तंतुमय हाडें आहेत तीं तळव्याखालीं वाढतात. पाया संबंधी पहाणें फारच आहे, परंतु साधारण इतकें पहावें कीं, त्याचे पायांत रोगानें किंवा उपजत बांधा वाईट नसावा. लहान खुराचे घोडे कांहीं उपयोगी नाहींत, व तसेंच फार मोठे खुराचे चांगले नाहींत. पायाचे खुराची दिवाल वाटोळी, गुळगुळीत, सारखी व काळे रंगानीं चकचकीत अशी असावी. पुढील बाजू पूर्ण असावी व त्याचा तिरकसपणा सारखा असावा व पंजरापासून मोकळी असावी आणि तिस स्पर्श केला असता ती थंड लागावी. त्याचा त्रिकोन नालापासून पंचेचाळीस डिग्री उंच असावा जर कमी असेल तर तो तळवा रुंद असतो किंवा अन्डाकृति असतो. जर जास्त असेल तर घोड्याचा खूर आकर्षित असतो.

खुराचे बाहेरील बाजू जर सारखी नीट नाहीं तर त्या खुरास (सेली) असें ह्मणतात, पण सेली खूर चांगला नाहीं. खुरास उंचपणा किंवा फुगिरपणा किंवा आंगठीसारख्या त्याच्या सभोंवती खुणा असतील तर त्या घोड्यास तापाचा अजार झाला होता असें समजावें व त्याच्या शिंगामध्यें कांहीं इजा राहिली आहे असें समजावें, ह्मणजे बारिक मज्जा, तंतु व शिंग ह्यांचेमध्यें पाणी सांचतें व त्यांचा संबंध पाय आणि खूर ह्यांशीं लागून असतो. खळगा किंवा पोकळी खुराचे

मवळ असेल तर तो पाय वेगळा होईल असें खास जाणावें. जरी चांगल्या आकाराचा खूर आहे तरी पातळ व अशक्त नसावा. पातळ असेल तर त्यास खुरासंबंधी कांहीं तरी रोग असतो.

चांगल्या घोड्याचे औलादीमध्यें मस्तक हलकें, मान उंच, खांदा भुजाकडे उतरता, अशा प्रकारचा घोडा जमिनीवर पाऊल सारखें ठेवतो, आणि टांचेकडील बांक नीट राहतो. पुतळी कठीण व सुखी व आकर्षण झालेली, व लहान खूर आणि टांचा तरतरित असल्या ह्मणजे खेंचराचे खुरांची व त्याची साम्यता दिसते. जेव्हां खूर आकर्षित असतात तेव्हां कांहीं तरी त्या खुरांत रोग आहे असें समजलेंच पाहिजे. खुराचे आंतील भाग नीट तपासला पाहिजे. कारण त्या ठिकाणीं सॅन्डक्रॅक ह्मणून रोग असतो. टांचेवर चिरा नसाव्या, गरम व मऊही नसाव्या. पुतळी नीट असावी व सशक्त असावी, व दुर्गंधीरहित असावी. तळवा उंच टांचेचा, अशक्त अथवा फार जाड नसावा.

स्टायफल (मांडीचें हाड) ह्यांत बहुतकरून कांहीं रोग नसतो, परंतु त्यावर ब्लिस्टरची किंवा डागाची खूण नसावी, खूण असल्यास तेथील हाड पूर्वी दुखावलें होतें असें समजावें.

मागील पायाचा गुडघा तपासते वेळेस घोड्याचे मागें उभे राहून तपासावें. दोन्ही गुडघे सारखे असावे कमजास्त नसावे, व तपासतांना हातास तेथें उष्णता किंवा मृदुपणा लागूं नये. जर घोड्याचे मागील गुडघा तरतरित, अरुंद व नीट आहे किंवा त्याचे बंधनाचीं नरम हाडें जाड आहेत तर त्या गुडघ्यांत दर्द आहे. घोड्याचे मागील गुडघ्याखालीं तीन चार इंचाचे अंतरावर सूज किंवा त्याची बाजू मोठी नसावी असल्यास घोड्यास लंगडण्यापैकीं कांहीं इजा आहे. त्याचप्रमाणें हॉकजाइन्ट (मागील गुडघ्याचा सांधा) ह्याच्यावर व क्रेकअर) ह्याच्यामध्यें गुडघा आणि पाय पुढें वाढून आला

असल्यास त्या घोड्यापासून फार काम घेतलें असावें असें अनुमान होतें.

मागील घुडघे एकमेकांकडे वळल्यासारखे दिसतील तर पूर्वी गुडघ्यांस कांहीं इजा होती असें समजावें. तसेंच गुडघ्याचें हाड मागल्या अंगास फार वळलें असेल, तर सदहूप्रमाणेंच समजावें.

मागील पायाचा गुडघा अगदीं तरतरीत नीट व अरुंद असल्यास मांडीचे व गुडघ्याचे सांधीमध्यें इजा होती असें समजावें.

खडकाळ जमिनीवर निजल्यानें किंवा धक्का पोहोंचल्यानें अथवा दुसऱ्या घोड्याचे लाथेचा मार बसल्यानें मागील पायाच्या गुडघ्यास इजा होते.

पायांत कर्ब असणें ह्मणजे मागील पायाचे गुडघ्याखालीं पांच चार इंचांचे अंतरावर, तंगडीवर सूज असली ह्मणजे त्यास कर्बीहाक् असें ह्मणतात, आणि त्यापासून लंगडण्याचा संभव असतो. परंतु सूज केव्हां केव्हां नाहींशी होते तेव्हां घोडा लंगडत नाहीं. परंतु असेंच निरंतर राहील असें खात्रीनें सांगतां येत नाहीं.

थारोफिन् ह्मणजे गुडघ्याच्या सांध्याचे वर शीर मोठी झालेली असते. असें होणें विशेष घोड्यापासून काम घेतलें असावें असें वुइंड् गाल्स्प्रमाणें ही खोड दिसून येते.

बाग् अथवा ब्लड स्पानिन् ह्मजे मागील पायाचे गुडघ्यांतील पुढले भागांत ह्मणजे आंतले अंगानें शीर मोठी होऊन सूज असते.

घोड्याचे मागील पायांचे आंगठे नालाचे बाहेर वाढून आले असतील तर लंगडण्याची कांहीं इजा असते असें समजावें.

भाग दुसरा.

घोडयांचे रोगाविषयीं चिकित्सा, निदान आणि औषधोपचार यांचें वर्णन.

प्रथमारंभीं वात, पित्त आणि कफ प्रकृति कशी जाणावी हें सांगून औषध देण्याचें प्रमाण, काढे, घृत व तैल करण्याचा प्रकार व स्नेह परीक्षा ह्मणजे आहरांत पिंड व तद्रुपी तैल देणें व पाजणें, घृत, दुग्ध व मद्य ह्यांचें पान देणें व त्याची क्रिया, नश्य (नाकांत औषध घालणें), अंगाचा घाम काढणें, अनुवासन ह्मणजे तूप, तैल इत्यादिकांची पिचकारी मारणें, रक्त काढणें, डाग देणें, धातु परीक्षा व कर्मेंद्रियें वगैरेचे ठिकाणीं होणारे रोगांची परीक्षा व सामान्य औषधें ह्यांचें वर्णन केलें आहे. ह्यापुढें विशेष रोग होण्याचीं कारणें व ते रोग कसे समजावे ह्यांचें संक्षिप्त वर्णन देऊन त्यावर अनेक प्रकारचीं औषधें देण्याचा विधी व ज्या ठिकाणीं रोग झाला असेल त्या ठिकाणचें शारीर ज्ञान होण्याकरितां त्याचे चित्रासहित वर्णन वगैरे प्रकार ह्या भागांत वर्णन केलेले आहेत.

अथप्रकृतिपरीक्षा.

ज्याचा रंग धुरकट व जो शरीरानें कृश, रुक्ष, सरळ व वेगवान व उर्ध्व वायु व ज्याचे मुखांत दोन्ही जिव्हा तो अश्व वातप्रकृती होय.

ज्या घोड्याचे अंगाची त्वचा तीक्ष्ण, व जो शितल पदार्थास इच्छिणारा, फार खाणारा व पीतवर्ण तो अश्व पित्तप्रकृती होय.

यापासून होणारे सर्व रोगांवर प्रशस्त होय. हें पंचतिकात्मक घृत, द्वंद्व, संनिपात यांवरही लागू पडतें.

अथ पित्तादि चिकित्सा जयदत्त कृते.

पित्त उत्पन्न करणारे पदार्थ सेवन केल्यापासून पित्तज्वर उत्पन्न होतो. पित्तज्वरानें अश्वाचे शरीरास घाम येतो, उष्मा होतो व डोळे लाल होतात. असें जाहल्यास बोरीच्या पानाचें लेपन त्यास करावें. ओल्या ताडाच्या पंख्यानीं वारा घालावा. शर्करा व सुरसा मिसळून दूध पाजावें.

शफा, दूर्वा, दर्भ, दूध व पांढरीं कमळें यांचा लेप या अश्वास प्रशस्त होय. दर्भ, काशा, ऊंस यांच्या मुळ्यांचा कल्क व लाख, मंजिष्टा, साखर या पदार्थांनीं त्यास क्षीरबस्ति करावा. खाण्यास तूप आणि यवान्न प्रशस्त होय. पाणी थंड द्यावें व हरळीचें गवत घालावें.

क्रोधानें, अतिश्रमानें, किंवा कडू, आंबट व खारट अशा खाण्यानें व ग्रीष्म ऋतूंत वायु सेवन केल्यानें पित्तज्वर उत्पन्न होतो.

घोड्यास वात, पित्त, व कफ झाल्यास पिंपळी व निर्गुंडीचा पाला व त्यांत सैंधव, भारंगमूळ, यांचें चूर्ण ऊन पाण्यांत घालून नाकांत घालावें ह्मणजे कफ व पित्त नाहींसें होतें.

दुसरा उपाय—कोंवळा लिंब आणून त्याचे रसांत शंख उगाळून वसंतकाळीं नाकांत घालावें ह्मणजे पित्त शमन होतें. पांढरा उंची चंदन पाण्यांत उगाळून नाकांत घालावा. द्राक्षांचा रस त्याचे अष्टमांश तवकीर मिळवून नाकांत घातला असतां पित्त नाहींसें होतें. मध, साखर व दूध समभाग घेऊन व पटोल चूर्ण त्यांत मिळवून शरद्काळीं नाकांत घालावें ह्मणजे पित्त दूर होतें. वेखंड, काळीं मिरें, कोष्ट, सुंठ, शृंगीबल, थंडपाण्यांत वाटून नाकांत घालावे. गुळवेल, आघाटीचें

फूल व थोडी हरताळ थंडपाण्यांत वाटून नाकांत घालावें. हें औषध शरिरक्षतूंत द्यावें व शांत ठिकाणीं बांधावा ह्मणजे घोडा पुष्ट होईल. शिरसाचें तेल व गौमुत्र एकत्र कढवून नाकांत घालावें ह्मणजे घोडा निर्धातु असल्यास पुष्ट होतो.

तिसरा उपाय—गौमूत्र व मीठ दिल्यास सर्व रोग जातात. माशाचें तेल व लसूण, पिंपळमूळ, ब्राह्मी, नाग केशर यांचें चूर्ण करून सकाळीं द्यावें ह्मणजे मुखरोग व नेत्ररोग जातात.

चौथा उपाय—वेखंड, सुंठ, पिंपळी, सैंधव व काळींमिरें पाण्यांत वाटून नाकांत घालावें ह्मणजे कफवात जातो. केशर, तूप, मध, साखर, नावद पाण्यांत मिश्र करून नाकांत घालावें ह्मणजे पित्त व सन्नि-पात जातो. कांच्य चूर्ण करून त्यांत हिरडा समभाग मिळवून थंडपाण्यांत वाटून नाकांत घालावें ह्मणजे पादग्रंथी जातात.

औषध देण्याचें प्रमाण.

जय दत्तकृते शालीहोत्रे.

श्रेष्ट, मध्यम व कनिष्ट अभ्यास देश काल व शक्ति पाहून उपयोग करण्याकरितां द्रव्याचें परिमाण सांगतों:—

गुंजा ८	=	१ मासा.	४ पळें	=	१ कुडव.		
१६ मासे	=	१ कर्ष.	४ कुडव	=	१ प्रस्थ	=	२ पौंड.
४ कर्ष	=	१ पळ.	४ प्रस्थ	=	१ आढक.		

४ आढक = १ द्रोण.

शुष्क द्रव्याचें परिमाण आर्द्रद्रव्यापेक्षां द्विगुण समजावें. उत्तम अभ्यास चार आढक यव पीठ न करितां तुष मात्र काढून एक दि-वसांत द्यावें. मध्यम अभ्यास चतुर्थांश कमी आणि कनिष्ट अभ्यास त्या-पेक्षां चतुर्थांश कमी द्यावें. पाद मात्र देणें झाल्यास १ आढक द्यावें.

चणे, उडीद व व्रीही (साळी) यवाचे निम्मे, देश पाहून द्यावे. घृत १प्रस्थ द्यावे. लवण (मीठ) १ कुडव द्यावें. मधु १कुडव द्यावें. परंतु तें तेलाशीं देणें झाल्यास तितकें देऊं नये. उडीद हे मुगा प्रमाणें द्यावे. पाना करतां तूप देणें झाल्यास १ प्रस्थ द्यावें. तेल अर्ध प्रस्थ द्यावें. गूळ ८ पलें द्यावा. प्रतिपानांत दारू १ प्रस्थ द्यावी. चूर्ण, लवण, पिष्ठ व घृत ४ पलें द्यावें. निरूहबस्ती १० पलें कल्क घालावा. अश्वाचा दोष नाहींसा होई पर्यंत अभ्यंग करावा. कषायाचें प्रतिपान दोन प्रस्थ द्यावें. प्रतिपानापेक्षां मंड दुप्पट द्यावा. उसाचा रस अर्धा आढकभर द्यावा. तंदुलाचें पान १ प्रस्थ व यवागू (पेज) दुप्पट द्यावी. जेवण झाल्यावर अनुपानास १ प्रस्थ दारू द्यावी. तांदूळ देणें ते पेज व मंड यांच्या कल्काशीं द्यावेत. सक्तु १ प्रस्थ द्यावे. गूळ ८ पलें,पाणी १ आढक व गुळाचें पाणीं उसाच्या रसाचे प्रमाणानें द्यावें. प्रतिपानांत सांगितलेला पदार्थ दारूशीं एक पल द्यावा. नस्यास जें तेल सांगितलें तें कुडव भर द्यावें. भेदनाविषयीं नस्य देणें झाल्यास तीक्ष्ण पदार्थ पाऊण कुडव द्यावा. कानांत घालणें झाल्यास प्रक्षेपाचे मानानें घालावें. लहान शिंगरास देणें असल्यास अर्ध कुडव द्यावें. औषधाचें पल देणें असून त्यांत हिंग घालणें असल्यास एक माष प्रमाणानें घालावा. आश्वाला नस्य देणें असल्यास एक कर्ष, व धूप अथवा चूर्ण देणें असल्यास तीन कर्ष द्यावें. कषायाविषयीं विशेष निर्देश जेथें केला नाहीं तेथें एक चतुर्थांश शेष राखून द्यावयाचा असें जाणावें. जीं द्रव्यें अमुक रीतीनें घालावीं असें सांगितलें नाहीं तेथें पलभर घालावीं. जर त्याला रक्तपान देणें असेल तर आढक प्रमाणानें द्यावें.

साधारण उदकचारि प्राण्यांच्या मांसामध्यें गुण वीस आहेत. अनूप (पाणथळ) प्रदेशांतील प्राण्यांमध्यें ८०, व दाट झाडीच्या प्राण्यांत १०० गुण सांगितले आहेत. भोजनामध्यें वगैरे घोड्यास

मांस देणें असल्यास त्या त्या मानानें दिलें पाहिजे; त्यांत शिशुमा, रोद्र, कुभीर, गोधा, सरुक, कर्कट (हे सर्व जळजंतू आहेत) त्याचप्रमाणें शंख, कच्छप इत्यादि अनूप देशस्थ राहणारे प्राणी होत.

गवय, गंडप, हस्ती, शूकर (डुकर), रेडा, सरूप इत्यादि जनावरांस अनूपवासी ह्मणतात. हरीण, छाग, सिंह, तरक्षु, सरेण, नीळांड, बैल, एडका वगैरे जांगळ होत. यांत सत्या हा फार लहान धरिला असून अविका हें जनावर मोठें होय. जांबळी, वेत, ताड, केळ, वेळू, इत्यादिकांनीं युक्त असा खोल प्रदेश असल्यास त्याला अनूप असें ह्मणावें. कसेरुक, शशी, पीलु, करीर, खादीर, बकुल वगैरे वृक्षांनीं युक्त व ज्यामध्यें नद्या,सरोवरें, डोह आहेत असा देश जांगळ होय. उभय साधारण देशांतील पशु पक्ष्यांच्या मांसाचा प्रभाव मध्यम होय. जळजंतूचें मांस गुरू, स्निग्ध, वायूचा नाश व श्लेष्मा, शुक्र उत्पन्न करणारें आहे. अनूपांचें देखील वारिजांच्या मांसा प्रमाणेंच असून कांहीं लघु आहे. जांगळ पशूच्या मांसाचे गुण असे आहेत कीं, ते त्रिदोष श्यामक असून जठराग्नीला मांद्य आणणारे आहेत. कल्कापेक्षां स्नेह चारपट, स्नेहा पेक्षां क्राथ (काढा) चारपट असें प्रमाण आहे. स्नेह करण्याचें प्रमाण साधारण प्रसिद्धच आहे परंतु कल्क तयार जाहल्याची खूण इतकीच कीं, हातानें त्याची गोळी होऊं शकते व तो अग्नींत टाकला असतां शब्द होत नाहीं. व्रण, नस्य किंवा बस्ती यांचा प्रयोग कर्त्तव्य असतां यापेक्षां पाक थोडा मृदु करावा. औषध देणें तें मध्यमोत्तम हीन असा प्रकार पाहून द्यावें, व त्यांत वयाचेंही उणाधिक्य पहावें. वर्ष झालें असतां एक चतुर्थांश व दोन झालीं असतां दोन चतुर्थांश असें औषधाचें प्रमाण ठेवावें. गुण आल्यावर कमी कमी करीत जावें. शरीर स्थूल असल्यास मध्यम व उत्तम हे प्रकार न योजतां केवळ कनिष्ट प्रकारच योजावा. काढा, पान, अथवा लेप वगैरे देणें झाल्यास त्यांत पाणी

हें सर्व साधारण सांगितलें आहे व जेथें लवण येईल तेथें सैंधव असें जाणावें.

अथ पिंडः

कुटकी, टाकळी, भ्रामरी, तुळसी, नागरमोथे, यांचा पिंड (लाडू) करून अश्वास दिला असतां अमृता प्रमाणें सुखप्रद होतो. विलायची, शतघ्नी, मुरुक (मोरवेल), कांग, शतावरी, मध, साखर, यांचा पिंड दिला असतां अश्वास पित्त शामक होय.

नागरमोथे, गडूची, सुरसा, विशाला (कडुवृंदावन), रिंगणी व तूप यांचा पिंड दिला असतां वायुनाशक होय.

माक्षीक, सैंधव, नागरमोथे, गोमूत्र, हिरडे हे समभाग करून यांचा पिंड दिला असतां अग्नि प्रदीपन कर्ता होय.

काकोली, केतकी, क्षुद्रा, ज्येष्टमध, व तूप यांचा पिंड दिला असतां अश्वास पुष्टता येते.

मांस, व उडीद, यांचा तूपासहित पिंड दिला असतां बलवृद्धि होते. घोडा वृद्ध व कृश असल्यास त्यास दहीं व मध खाऊं घालावें म्हणजे तो सहा सात वर्षांचे अश्वाप्रमाणें सशक्त होतो.

मेथिका, धातकी (धावटी), काली, उपलसरी, बीजपूरक यांचा पिंड तेजाची वृद्धि करणारा होय. कुटकी, मद्य, धावटी व क्षौद्र (मध) यांचा पिंड दिला असतां वीर्य वृद्धि होते. त्रिफला, कटुका, नागरमोथे, वावडिंग, निंब, चित्रक यांचा पिंड आळस, मेह व शूळ यांचा नाशक होय. पिंपळी, पिंपळमूळ, कटुक, लवंगा व ताजी हरळी यांचा पिंड प्लीहाचा (पांथरीचा) नाश करतो.

नागचापा, श्रीफल, तालफल व माक्षीक व गोकर्णी यांचा पिंड दिला असतां अश्वास उत्तम गति प्राप्त होते.

घोडा कधीं कधीं आटखळतो, धांवतो व कांपतो त्यास औषध— हिरडा, गुळवेल, वेखंड, क्षौद्र, कापूर, गूळ व मद्य यांचा पिंड द्यावा ह्मणजे वरील दोष नाऊन त्यास वेग प्राप्त होतो.

दारू, मिरें, लसूण, नागकेशर व त्याचे दुप्पट मेंढ्याचें मांस यांचा पिंड दिल्यानें श्रम नाश होतो.

जंबीर (निंबू), कांगोणीचें पान किंवा साल व त्यांतील रज यांचा पिंड दिला असतां रक्त नाशक होय.

तमाल, कमळ, क्षौद्र, अघाडा व टेंभुरणी यांचा पिंड दुधाशीं दिला असतां वायु नाशक होय.

आरनालाचें चूर्ण व पथ्या नेपाळिकेचें फल यांचा पिंड करून त्यांत करंज, कापूर, वेखंड आणि सर्ज यांचें चूर्ण मिसळून दह्यांत द्यावें ह्मणजे व्रण व त्या पासून झालेले कृमि यांचा नाश होतो. सुधाकर, कापूर आणि कूपोदक यांचा पिंड उदरांतील कृमीचा नाश करतो. उन्हाळ्यांत दाहानें पीडित झालेल्या अश्वास आरनालयुक्त निंबे व मज्जामु यांचा पिंड दिला असतां सुखकारक होय.

वृष्टि व वायु यानीं पीडित झालेल्या अश्वास तेल, लसूण व मांस यांचा पिंड दिल्यास पुष्टता व सुख प्राप्त होतें.

ज्या अश्वाचें अंग कांपत असेल त्यास महाघृत, कापूर, साखर व दूध यांचा पिंड दिला असतां सुखावह होय.

धात्री, व बीजपूरक (मातुलिंग) यांचा पिंड ल्टदयांतील गुल्माचा नाश करतो. सहदेवी, वचा, कुष्ठ, वारुणी आणि कडू वृंदावन यांचा पिंड मद्याशीं दिला असतां वात गुल्माचा नाश करतो.

उंबराचें फळ, मांस, कापूर व ह्मशीचे दुधाचें दहीं यांचा पिंड शैत्यानें पिडित अशा अश्वास सुखावह होय. व्याहडा, वावाटी, सार्जिका

व मीठ यांचा पिंड कास (खोकला) हारक होय. ताक, कापूर, सैंधव आणि चिकणी यांचा पिंड अश्वास बस्तिरोध झाला असतां द्यावा. सौवर्चल,हळद,पिपळी व वृंदावन यांचा पिंड मूत्र कृच्छावर प्रशस्त होय.

जंबीर, हिंगूळ, क्षौद्र, खांत व वाळा यांचा पिंड रक्त मूत्रावर प्रशस्त होय. हिरडे, ज्येष्टमध, श्यामा, देवदार व वाळुक यांचा पिंड रक्तातिसारावर प्रशस्त होय. पडवळ, धायटी, नागर मोथे, ज्येष्टमध व गिरिकर्णिका यांचा पिंड अश्वास रक्त अधिक झालें असतां द्यावा म्हणजे रक्ताचें शोषण होतें. साधी व गाठी हळद,गंधक व मोहऱ्याचें तेल यांचा पिंड दिला असतां कंडू व कुष्ट यांचा नाश होतो. हा पिंड किंचित भाजून द्यावा. अतसीपत्र, निंबू आणि वडाच्या कळ्या यांचा पिंड अतिसारावर प्रशस्त होय. घोडा नेत्र रोगानें जेव्हां अत्यंत पीडित होतो तेव्हां त्यास ताक व एरंडाचीं पानें यांचा पिंड द्यावा पत्रक, सिंदुवार, चित्रमृग व धोतरा यांचा पिंड मधाशीं दिला असतां मांस वृद्धि करतो. सैंधव, चुल्लिकाक्षार, वावडिंगें व मध यांचा पिंड शस्त्रानें पीडित झालेल्या अश्वास प्रशस्त होय.

काढ्या विषयीं.

घोड्यास काढा पाजला असतां रोग जाऊन तो सुखी होतो. याकरितां वनस्पतींचीं औषधें सांगतों. भृंगिराज, इंद्रायणी, पहाड, पुनर्नवा, बिल्व, पुष्करमुळ, लोध्र,सैंधव, व तगर हीं एक एक पळ प्रमाणें घेऊन चौपट पाणी घालून त्यांचा काढा अष्टमांश उरवून घोड्यास द्यावा म्हणजे अग्नि प्रदिप्त होतो व अरोग्य होऊन त्याची कांती चढते.

वात रोगावर काढा—नागरमोथा, मध, पत्रज, नागकेशर, सैंधव, एकेक पळ प्रमाणें घेऊन अष्टमांश काढा करून द्यावा म्हणजे वातरोग जाऊन अश्व अरोग्य होतो.

पित्तरोगावर काढा–जेष्ठीमध, लोध्र, पांढरा शिरस, सावरी, वाळा, यांचा वरच्याप्रमाणेंच काढा करून तीन भाग उरवावा व त्यांत साखर घालून एकविस दिवस नेमानें द्यावा ह्मणजे वातपित्त नाहींसें होतें.

सन्निपाताचें लक्षण व त्यावर उपाय—घाम येणें, सर्व आंगास कंप सुटणें, जांभया येणें, जिभेस फोड येणें, क्षणोक्षणीं मस्तक झाडणें, नेत्र रक्तवर्ण होणें, व नाकांतून रक्त पाझरणें याप्रमाणें सन्निपाताचीं लक्षणें आहेत. त्यास उपाय–सुंठ, हिरडा, पहाड, शोपा, ब्राह्मी व मुस्ता हीं सर्व समसमान घेऊन अष्टमांश काढा करून एकवेळ सकाळीं सात दिवस द्यावा ह्मणजे सन्निपात दूर होतो.

घोड्यास खोकला व श्वास होतो त्यास उपाय–अश्वगंध, वाळा, ब्राह्मी, पुष्कर, भारंगी, रास्ना, देवदार, बेल, ओवा व दशमुळें यांचा काढा अष्टमांश करून द्यावा ह्मणजे कास, श्वास, ज्वर व वायू नाश पावतात. हा काढा दिल्यावर अश्वास सावलीचे ठिकाणीं बांधावें.

घोड्यास ताप येतो त्याजवर औषध–चंदन, निलोत्पल, पांढरा वाळा, रक्तचंदन व समभाग लिंबाची साल, धणे, डोरली, रिंगणीं समसमान घेऊन चौपट पाणी घालून अष्टमांश उरल्यावर सकाळीं देत जावें ह्मणजे तेणेंकरून पित्त, ज्वर व श्वास हे नाश पावतात.

कास, श्वास, हिक्का यांस उपाय–जेष्टमध, भल्लात, पक्का एक शेर बेहडा व त्रिफळा एक पल प्रमाणें घेऊन अष्टमांश काढा करून द्यावा ह्मणजे अग्नि प्रदिप्त होतो व त्यास अरोग्यता येते.

मुत्ररोध होतो त्यास उपाय–कुमारी, शाल्मली, पहाड, मंजिष्टा, इंद्रवारुणी व कावळी एकेक पल घेऊन चतुर्थांश काढा उरवून चौदा दिवस द्यावा. त्यापासून मुत्ररोग व अग्निमांद्य हे सर्व नाश पावतात.

दुसरा उपाय–ओंवा, जेष्टमध, आवळकठी व संचळ यांचें चूर्ण करून अष्टमांश काढा करून दिला असतां कोठा शुद्ध होऊन अश्व पुष्ट होतो.

जहर वातास औषध–हळद, लिंबाचीं पानें, कडळमूळ, इंद्रावन, अश्वगंध, वेखंड व जिरे एकेक पळ प्रमाणें घेऊन अष्टमांश काढा करून द्यावा ह्मणजे जहररोग जातो.

घोड्यास अतिसार होतो त्यास उपाय–धायटीपुष्प, धणे, जिरे, सुंठ, कुडा हीं सर्व तोळा तोळा घेऊन एकत्र चूर्ण करावें व अष्टमांश काढा करून द्यावा ह्मणजे अतिसार जातो.

दुसरा उपाय–धणे, बेल, धायटीपुष्प, सुंठ, वाळा व नागरमोथा यांचा अष्टमांश काढा करून द्यावा ह्मणजे अतिसार जातो.

कृमिरोगास उपाय–शोषा, गुळवेल, तालीसपत्र, विडंग व निर्गुंडी हीं एकत्र करून घोड्यास काढा करून द्यावा ह्मणजे कृमिरोग जातो.

दुसरा उपाय–वायवर्ण, जेष्टमध, कुटकी व महाळुंगबी यांचा अष्टमांश काढा करून द्यावा ह्मणजे त्यापासून कृमिरोग व अतिसार नाहींसे होतात.

घोड्यास ताप येतो त्यास उपाय–महाळुंगाचीबीं, पांढराचंदन, शिरस, उश्रपुष्प, करमूळ, ब्राह्मी, रिंगणी, पुनर्नवा व सुंठ हीं सर्व समसमान घेऊन अष्टमांश काढा करून द्यावा ह्मणजे ताप नाहींसा होतो.

घृत करण्याचा प्रकार.

निंब, करंज, याची वसा, सत्पर्ण व पटोल यांचा काढा किंवा कल्क करून त्यांत घृत मिसळावें ह्मणजे तें पंचतिक्त घृत होतें.

करंज, वाळा, मध, श्यामा, चंदन, कमळ, त्रायमाणा, कचोरा व

अश्वगंध यांचें चूर्ण करून तीन चार किंवा पांच अंश तुपांत मंदअग्नी-वर त्रिफला रसासहित शिजवून अश्वास द्यावें म्हणजे बल व तेज यांची वृद्धि होते. याच प्रमाणें करंज तेलही अश्वाचे अनेक दोष-हारक आहे.

घोड्यास तूप दिल्यानें बळ वाढतें, रोग जातात व कांती वर्ण होतो. शिलाजीत, इंद्रावण, कमलबिज, लाक्षा, नागकेशर, पुष्कर व लिंब हीं सर्व पावशेर प्रमाणें घेऊन त्यांत मध व तूप दोम शेर प्रमाणें घालून एकत्र करून लोखंडाच्या भांड्यांत मंदाग्नीवर कढवावें. तयार झाल्यावर चार तोळे प्रमाणानें द्यावें म्हणजे वात जातो. तेज, वृद्धी, क्षुधा, अग्निप्रदिप्तता, पुष्टता व बलत्व हे तूप पाजल्यानें प्राप्त होतात.

दुसरा उपाय—धायटी, नागकेशर, कोष्ट, कुसूंभयेळा, डाळींब, लोध्र, सैंधव, एकेक पल (२तोळे)प्रमाणें सर्व घेऊन त्यांत दोन शेर तूप घालून कढवावें. सारखा रस झाल्यावर घोड्यास द्यावा म्हणजे त्याचे सर्व रोग जाऊन त्यास तेज येतें व तो पुष्ट होतो.

तिसरा उपाय—आरनाल, वेखंड, कोष्ट, पिंगळा हीं समभाग घेऊन काढा करावा व त्यांत तितकेंच तूप मिळवून द्यावा म्हणजे पित्त नाश होतो.

चौथा उपाय—कोष्ट दोन पळें, व त्यांत शिरस पत्राचा रस एक प्रस्थ मिळवून तुपांत तयार करून द्यावें. कांजीक, वेखंड व कोष्ट सम-भाग दोनप्रस्थ तुपांत तयार करून सात दिवस अभ्यंग व पान करावें. सर्व पित्त नाश पावतें. हीं दोन्हीं तुपें उत्तम असून अश्वास अरोग्य-कारक आहेत.

कंडू आंगास झाला असतां त्यास उपाय—आंबेहळद व साधी हळद आणि गंधक समसमान व थोडे मनशील घेऊन त्यांचें चूर्ण करून काढा करावा व त्यांत तूप (त्रीगुण) तिनभाग काढा

कढत असतांना मिळवावें, तयार झाल्यावर सकाळीं नाकांत घालावें, आणि अभ्यंग व पान सात दिवस करवावें ह्मणजे अश्वाची कांती दिव्य होते.

दुसरा उपाय—लिंबाचीं पानें, माक्षीक, नख, गुग्गुळ, बावची व मेण हे समसमान घेऊन त्यांत तूप व चौपट गोमूत्र घालून मंदाग्नीवर काढा करावा. त्याचें अभ्यंग व पान करवावें ह्मणजे कंडू जाऊन दिव्य कांती होते.

तिसरा उपाय—लाक्षारस चौपट व त्यांत तूप एक भाग घालून मंजीष्टा, तगर, जटामांशी, कोष्ट, चंदन, देवदार, कुटकी, शोपा व हळद सर्व एकेक पळ घेऊन त्यांत साखर आणि शिलारस घालून मंदाग्नीनें सिद्ध करावें. मग त्या तुपानें अभ्यंग व पान करावावें व नाकांतही घालावें ह्मणजे घोड्याचे आंगांतला ज्वर, कफ, पित्त व रक्त दोष जातात.

चौथा उपाय—पटोळी, मुस्ता, रक्तचंदन, कर्दळीचा कांदा, माक्षीक, गुळवेल व कचोरा हीं सर्व समभाग व साखर आठपट आणि तूप चौपट घेऊन ते एकंदर मंदाग्नीवर सिद्ध करून दररोज घोड्यास द्यावें ह्मणजे दहा, ज्वर, क्षिणधातु वगैरे सर्व रोग बरे होतात.

पांचवा उपाय—मुस्ता, हळद, मंजिष्टा, तगर, कर्दळीचा कांदा, चंदन, देवदार, नागकेशर, बेल जटामांशी एकेक पळ घेऊन त्यांत तूप घालून त्यांचा काढा घोड्यास द्यावा. सर्व प्रकारचे ज्वर, रक्तपित्त व शरीर कटीभंग दूर होतात.

साहवा उपाय—बळ, अतिबळ, लाख, अश्वगंध, पिंपळी, पिंपळमूळ, चोख, वेखंड, हिरडा, गजपिंपळी, चवक, पुनर्नवा, हळद, जिरे, कोरांटीमूळ, एरंड, तगर, शतावरी, समभाग घेऊन निर्गुंडी, करवीर, प्रसारणी, मदनचंदनाचा कांदा, पुत्रजी, शेवगा, ओंवा एकेक पळ

प्रमाणें चौपट पाणी व तितकेंच तूप त्यांत घालून सर्व मंदाग्नीनें कढवून शिजवावें. तयार झाल्यावर एक पळ प्रमाणें द्यावें ह्मणजे वात व कंठी कफ हरतो; शिरग्रह, वक्षस्थळीं दुखावलेला स्कंद, आळस, जाड्यता, पायरोग यांवर ह्या तुपानें अभ्यंग व पान व नस्य केलें असतां सर्व रोग जातात.

बोड्यास कफ होतो त्यास उपाय–पिंपळी, वेखंड, कुष्ट, सैंधव, संचळ, डांगर हीं सर्व आडुळशाचे रसांत घालून सात दिवस द्यावीं ह्मणजे कफ जातो.

कृमिरोग झाल्यास त्यास उपाय–विडंग, त्रिफळा, त्रिकूट, ओंवा, वड, लिंबाची साल, अजमोदा व वेखंड कुटून बारिक चूर्ण करावें. त्यांचा काढा करून चौपट तूप घालून द्यावा ह्मणजे कृमिरोग जातात.

मूढ वातावें औषध–रुईचा चीक आठ तोळे, निवडुंगाचा चीक बारा भाग (तोळे), हिरडा, कविठ आठ तोळे, गुळवेल समान यांचा कल्क करून तुपाचे मानानें मंदाग्नीवर एक प्रस्थ सिद्ध करून क्रमानें सात दिवस द्यावा ह्मणजे मूढवायु नाश पावतो.

जिभेस व गळ्यास फोड येतात त्यावर उपाय–मुळ्याचें बी, नवे शिरस, हळद, लिंब, जिरें, हिरडा, अतिविष, राई, तगर, मिरें, वेखंड, कुष्ट हीं सर्व समसमान घेऊन बारिक चूर्ण करावें आणि तें मधाबरोबर द्यावें ह्मणजे जिभेचे व गळ्याचे फोड जातात.

सर्पाचे विषावर औषध–पिंपळी, मिरें, सुंठ, चित्रक, गजपिंपळी, वेखंड, अतिविष हीं समसमान घेऊन बारिक चूर्ण करावें व दररोज पांच तोळे तुपाबरोबर द्यावें ह्मणजे विष दूर होतें.

स्तंभवायुवर–कोष्ट, हाळद, अतिविष, मिरी, वेखंड, समान एकत्र करून तुपाबरोबर रोज एक पळ द्यावें ह्मणजे स्तंभवात जातो.

दुसरें औषध—कंकोळ, मिरी, नागकेशर हीं औषधें समसमान घेऊन भाजून तुपा बरोबर द्यावी ह्मणजे स्तंभवात जातो.

आन्ड मोठें होतात त्यावर—रास्ना, अतिविष, पिंपळी, पिंपळमूळ, अजमोदा, वावडींगे, इंद्रजव, पित्तपापडा, लसूण, शेवगामूळ, भल्लात, सुंठ व हिंग हीं समभाग कुटून वस्त्रगाळ चूर्ण करावें व तुपाबरोबर एकवेळ एक मंडळ द्यावें ह्मणजे आन्डवृद्धी दूर होते.

तेल करण्याचा प्रकार.

मधु, उशीर (वाळा), षष्टीक, रक्तचंदन, कमळ, श्रीपुष्प, धायटी, लोध्र, मंजिष्टा आणि चंदन हे पदार्थ समभाग घेऊन त्यांचा कल्क करून त्यांत गाईचें दुध घालून शिजवावें. हें मधु पित्तरोगाचा नाश करणारें होय. हें मधु, तूप, तेल व वसा (मज्या) एकत्र करून दशमूलांच्या कषायांत अश्वास पाजावें.

तृवृताख्य पाण्यांत घालून मंद अग्नीवर तप्त करून अश्वास दिलें असतां वात हारक होय.

उपलसरी व अश्वगंधा १०० पलें व दशमूल १०० पलें एकत्र कढवून माषपर्णी (मुसाकानी) १ पल व मुद्गपर्णीचें दुध पल १ चा सैंधव दोन पलें, चित्रक, पिंपलीमूळ, प्रसारिणी, जवखार, दोन्हीगंध (पांढरा व रक्तचंदन) द्विजक, पलत आणि अष्टवर्ग हीं प्रत्येक दोन पलें आणून त्यांचा कल्क करावा. नंतर वर सांगितलेल्या कषांत दहीं, दुध, तूप व उदक यांसहित कढवावें ह्मणजे हें तेल अश्वाच्या सर्व वातरोगास उत्तम औषध होय.

दशमूलाचा कल्क वरचा कषाय, आम्लकांजी व लवण यांनीं मिश्रित असें तेल शिजवून अश्वास दिलें असतां प्रशस्त होय. तूप व तेल समभाग घेऊन त्यांत त्रिवृत पाणी करण्याचीं औषधें एकत्र

करून मेषाची मज्जा घालून तें तेल तयार करावें; मग तें फार पक्व न होऊं देतां उतरून अश्वास पाजावें व अभ्यंगाप्रमाणें बस्तीचे ठिकाणीं मर्दन करावें व सर्व अंगास लावावें ह्मणजे वातरोगावर प्रशस्त होय.

वातहारक तेलें.

नारायण तेल—हें अश्वरक्षणास फार उपयोगी आहे. बिल्व, टाकळी, टेटू, रास्नामुळ, शतावरी, शेवगा, वेखंड, चांदवेळी, कंकोळ, चंदन, जटामांसी, कांग, सुंठ, चित्रक, एरंड, निर्गुडी, राळ, व चवक, हीं समभाग घेऊन चूर्ण करावें. त्यांत चौपट पाणी घालावें व तिळाचें तेल तितकेंच आणि समान शतावरीचा रस, त्याजबरोबर दूध द्विगुण घालून मंदाग्नीवर पात्रांत तयार करून घोड्यास नस्य द्यावें व आंग मर्दन करावें. मलिनकोष्ठ, वातव्याधि, जडगति, कंठभ्रंश हे रोग नरतुरंग किंवा गज यांस झाले असल्यास बरे होतात.

पोटीं खडा होतो त्यास तेल—शेवग्याचे मूळावरची त्वचा, निर्गुडीचीं पानें, गाजर, ओंवा, पांढरे जिरे, वेखंड, सुंठ, पंचक्षार, वावडिंगें व पळसबीज हीं सर्व एकत्र समभाग करून ऊन पाण्यांत प्रातःकाळीं द्यावीं. पोटींचा खडा नाहींसा होऊन मळाचा झाडा होऊं लागतो.

स्तंभवातास तेल—शोपा, गेळें, कोष्ट, सैंधव, निंब, वाळा, मध, कुंभारू, देवदार, सुंठ, पुष्कर, चित्रक, कर्दळीचा कांदा, अतिविष, कचोरा, कंद, विडंग, भाल, रेणुका, पिंपळी, दंती, रास्ना, आजमोदा, आणि बेलमूळ हीं सर्व समान घेऊन त्या सर्वांचे चौपट पाणी व तेल घेऊन त्याचे चौपट दूध घालून मंदाग्नीवर तांब्याचे भांड्यांत एकत्र करून कढवावें. तयार झाल्यावर तें तेल घोड्याचे अंगास मर्दन करावें.

अंगास फार कंड सुटते त्यास तेल–शंखचूर्ण, शेंदूर, हरताळ, मनशीळ, हिराकस, जवखार, कोष्ट, व गंधक, हे सर्व शिरसाचे तेलांत खलून तीन दिवस लेप करावा ह्मणजे घोड्याची कंडू नाहींशी होते.

विषगर्भ तेल–धत्तूर, रुई, निवडुंग, रिठा, ऐरण, चित्रक, शेपा, निवळी, वेल, पाडळी, शतावरी, एरंड, शेवगामूळ.व टाकळीबीज, हीं सर्व समान घेऊन कुटून काढा करून अथवा कल्कही घोड्यास द्यावा.

जडत्वावर तेल–देवदारु, कोष्ट, हळद, वेखंड, हिरडा, कुटकी, चाफा, तगर, चंदन, ओंवा मिरीं, कचोरा, अतिविष, मोथा, आणि पुष्करमूळ हीं, समान घेऊन बारीक चूर्ण करून त्यांत तिळाचें तेल घालून कल्क करावा व तो मंद अग्नीवर सिध्द करून, घोड्यास नानारोग होतात त्यास मर्दन करावा; ह्मणजे जडत्व, भ्रंश, वगैरे सर्व रोगांचा नाश होतो.

लाक्षादितेल–रास्ना, एरंड, गोखरू, कुडा, रिंगणी, व चिकणा, हे सर्व एक पळ प्रमाणें घेऊन आणि त्या समान तेल व दूध चौपट घेऊन शतावरीच्या रसात मंदपणें कढवावें. हें तेल सर्व रोगांवर लावलें असतां घोडा निरोगी होऊन पुष्ट होतो.

शतावरी तेल—कोरांटीमूळ, गुळवेळ, रक्तचंदन, वाळा, लिंब, रास्ना, रिंगणीमूळ, चिकण, धणे, मंजिष्ठ, कर्दळीचा कांदा, व पद्मकाष्ट हे समभाग घेऊन त्यांत चौपट पाणी घालून चतुर्थांश काढा उरवावा व त्यांत काढ्याइतकेंच लाक्षातेल घालून साखर वीस पळें घालावी व तें मंदाग्नीवर सिद्ध करून घोड्यास द्यावें. त्यायोगें संतापज्वर, कृमि, कोष्ठ, हृद्रोग, वात, पित्त, श्लेष्मा व सन्निपात हीं दूर होतात व तें नाकांत घातलें असतां वीर्यवृद्धि होते.

अश्वगंध तेल—अश्वगंध, काळा वाळा, तगर, मुस्ता, पांढरा वाळा, तमालपत्र, काळा कुडा, चंदन, पांढरा व रक्त पद्माक्ष, जेष्ठमध,

व पद्मकाष्ठ, यांचें समभाग चूर्ण करून त्याचा काढा करावा व त्यांत *एक प्रस्थ तिळाचें तेल, व चौपट दूध व वीस पळें साखर घालून मंदाग्नीवर कढवून, मग तें तेल घोड्याचे अंगास मर्दन करावें. ह्मणजे ज्वर व कृमिरोग नाहींसे होतात.

पत्रजादितेल—तमालपत्र चार पळेंपर्यंत, तगर, कोष्ठ, चित्रक, जायपत्री, लवंगा, वाळा व जायफळें हीं सर्व समभाग चूर्ण करून त्यांत एक प्रस्थ तेल, चौपट दूध व आठ पळें साखर घालून तें तांब्याचे भांड्यांत कढवावें व त्याचें मर्दन करावें ह्मणजे पित्त, कफ, व ज्वर नाहींसे होतात.

टीप—तेल व तूप किती द्यावें व किती घालावें हें ह्याच भागाचे ६ वे पानावर सांगितलें आहे तें पहावें.

मनुष्यरोगांवर अन्य वैद्यक ग्रंथीं सांगितलेलीं तेलें अश्वचिकित्सेवरही लागू पडतात.

स्नेहपरीक्षा.

स्नेह (तेल) दोन प्रकारचें आहे. एक पिंड व दुसरें पिण्याचें. पिंडरूपी तैल हीं खाण्यांत द्यावीं व पेय तें पाजावें. शरदृतूंत तुपाचा प्रयोग मुख्य होय. हेमंत आणि शिशिर या ऋतूंत तेलाचा प्रयोग मुख्य होय. हीं तेलें पांच पलापासून दररोज क्रमानें तीन तीन पळेंप्रमाणें पूर्ण एक शेर होईपर्यंत वाढवावीं. अश्वाचें जें पान असेल त्याचे अर्ध तास प्रभातकाळीं किंवा वायूचे वेळेस पाजल्यावर पिंड द्यावा. बाकीचें मग पाजावें.

एक वर्ष उमरीचे अश्वास एक शेरपर्यंत तूप द्यावें, पुढें अश्वाचे शक्तिमानाप्रमाणें ज्यास्त द्यावें. परंतु आढक (४ शेर) पर्यंतच अश्वास तूप पढविलें असतां प्रशस्त आहे, त्यापेक्षां अधिक प्रयोग करूं नये. अश्वास नेहमीं तूप ३, ५, ७, १०, किंवा १२ दिवस त्याच्या

शक्तीप्रमाणें द्यावें. तृण व हरळी हीं त्यास द्यावीं. पाणी गरम द्यावें.

या प्रयोगापासून सर्व शरीराचे ठायीं स्निग्धता व बळकटपणा प्राप्त होतो व त्यापासून उमेद वाढते. व्रण व पायांतील कंप नाहींसा होतो. फार वेळ पुरीषस्राव होत नाहीं. याकरितां जो घोडा तेजस्वी नसेल त्यास हें पान द्यावें, ह्मणजे त्याची रूक्षता जाऊन स्निग्धता येते. अति स्निग्ध असेल त्यास दिलें असतां पुष्टतादि अनेक गुण होतात. याप्रमाणें पूर्व दिवशीं पान देऊन दुसरे दिवशीं दारू व मीठ घालून पाहटेस द्यावें. खाण्यास पातळ (यवागू) पेज द्यावी. चंदीस आंबट ताकांत मर्दिलेले मूग द्यावे. अशा क्रमानें तीन किंवा पांच दिवस केलें असतां वाळलें गवत खाणारे रूक्ष अश्वास जठराग्नीचें दीपन होतें. पाणी मात्र थोडें पाजीत जावें.

वर्षाकाळीं दुधांत तेल पाजावें. शरदृतूंत व हेमंतांत दारूशीं, शिशिरऋतूंत मिठाशीं, वसंतांत त्रिफळेशीं व ग्रीष्मऋतूंत दुप्पट पाणी घालून पाजावें. पानांत अपक्व तेल देऊं नये. रोगाचे तारतम्यानें द्यावें. अश्वास कच्चें तेल दिलें असतां गुदद्वारांवाटे पाझरून येतें; यासाठीं अग्नीवर पाचित करून मग द्यावें.

ज्याचा कोठ्यांतील अग्नि मंद आहे व जो देहानें फार स्थूळ आहे त्यास व फार कृश अशा अश्वास आणि ज्यास व्यायाम अतिशय आहे त्यास देऊं नये.

नस्य देण्याचा प्रकार.

ज्या अश्वास मुखाच्या ऊर्ध्व भागीं किंवा अधोभागीं दोष झाला असेल त्यास नस्य देण्याचा प्रकार खालीं लिहिल्या प्रमाणें:—

डाव्या अंगठ्यानें त्याची एक नाकपुडी दाबून दुसऱ्या नाकपुडींत बारीक नळीनें व मोठ्या जलदीनें नस्य घालावें; असें कीं, त्यापासून अश्वास भय वाटूं नये. नाहींपेक्षां त्याच्या नाडींत (शिरांत) बोठी

दुस्साध्य होते. तीक्ष्णनस्य जाणत्यानें विचारपूर्वक द्यावें. चंदन, वाळा, पाणी व शर्करा यांचें नस्य अश्वाच्या शिरांतील दोषांस नाहींसें करितें. नस्य दिल्यावर शरत्कालाप्रमाणें त्यास उपचार करावे. वातापासून दोष असल्यास स्निग्ध, व उष्ण नस्य द्यावें आणि पित्तदोषावर स्वादिष्ट व शीतळ असें नस्य द्यावें.

अश्वास घाम काढण्याचा उपाय.

वसु, गोखरू, एरंड, धान्य व आम्ल हे पदार्थ कढवून घोड्यास लेपन केलें असतां सर्व वायुदोषहरण करणारा आंगचा घाम येतो. कांजीचें व धान्याचें पुट रूक्ष अश्वास द्यावें. वात व कफ यांपासून जो रूक्ष असेल त्यास तेलानें चोंपडून तुपानें लेपन करावें. जो वात व पित्त या दोषानें युक्त असेल त्यास घाम उत्पन्न करावा. ज्यास पित्त आहे व जो शांत, भुकेला किंवा तान्हेला अश्व आहे त्यास घाम काढू नये; त्याच प्रमाणें गर्भिणी घोडीस घाम काढूंनये.

अनुवासन.

अनुवासन ह्मणजे तूप, तेल इत्यादिक स्नेह पदार्थांची पिचकारी बस्तींत मारतात त्यास ह्मणतात.

अनुवासनाचा व स्थापनाचा प्रकारः—काष्ठ, पत्र, लोखंड, शृंग, वेळू किंवा देवनळ यांपैकीं कोणतीही युक्त १२ बोटें लांब व सहा ६ बोटें विशाल (रुंद) अशी नळी करावी. तिला बोराच्या आठुळीप्रमाणें एक छिद्र ठेवावें. मुळापासून शेवटापर्यंत ती नळी मृदु व स्निग्ध असावी. चार बोटें नळी सोडून पुढक बांधण्याकरितां दोन कड्या कराव्या. त्या नळीनें वैद्यानें सर्व रोगाचे शांतीकरितां अश्वास यथायोग्य तीन, पांच किंवा सात दिवस अनुवासन करावें.

बस्तीचा प्रयोग करण्यापूर्वी घोड्यास स्निग्ध व रसयुक्त असें भोजन घालावें.

निरूहबस्ती.

काढे, दूध, व तेल मिश्र करून ज्या पिचकाऱ्या मारतात त्याला हरूबस्ती ह्मणतात.

अश्वास आहार न देतां अपराण्हकाळीं त्रिवार निरूहबस्ती करावी. प्रथम पुट किंचित् तीक्ष्ण, दुसरें आणि तिसरें तीक्ष्ण याप्रमाणें ३ पुटें द्यावीं. मग अश्व कांहीं वेळ स्थिर करून तें निरूहण गेल्यावर त्यास दुधाचें पुट द्यावें. नंतर काहीं अवकाशानें त्यास स्नाव करावा. इतकें झाल्यावर त्यास पायसाचें भोजन घालावें. व स्नेहानुवासन वेळ बदलून द्यावें. किंचित् हरळी द्यावी. अशा रीतीनें तीन दिवस अनुवासन केलें असतां सर्व रोग शांत होतात.

पाडळ, दंती, शतावरी, उपळसरी, त्रिवृता, श्यामा, बला, पुनर्नवा, गडूची, गोखरू, निंब, त्रिकटु, एरंड, अडुळसा, पेय, कुलित्थ, असगंध आणि शिग्रुप हीं सर्व अथवा मिळतील तितकीं औषधें आणून त्यांचीं मूळें पाण्यांत घालून कढवावीं. तें पाणी वस्त्रानें गाळून निरूह बस्ती करावी. कषायरस, गोमूत्र व कांजी यांत त्रिफला, मध, रास्ना, मदन, पांढऱ्या मोहोऱ्या, विलायची, त्रिकटु, कुष्ट, शतपुष्पी, हरेणुक, साधी व गाठी हळद, मंजिष्ठा, व पंचक्षार हीं जीं मिळतील तीं औषधें घालून कल्कांत द्यावीं हा निरूह कफ किंवा वात ज्यास्त झाल्यास द्यावा. कषायातील कल्क नीट पाहून त्याचा निरूह करावा व तो फार कमी व दाट नसावा. तसेंच दूध किंवा ऊंसाचा रस यांत तूप व दारू मिसळून साखर व मध यांशीं द्यावा. घोड्याच्या गुदांत ती नळी चार बेळ घालावी. घोडा २ वर्षांचा असतां २ अंगुलें, तीन वर्षांचा असतां २ अंगुलें, ३ वर्षांहून अधिक असल्यास ४ अंगुलें

व १ वर्षाचे आंत असल्यास १ अंगुल नळी घालावी. त्यास तूपभात वगैरे खाऊं घालून उत्तरेस किंवा पूर्वेस उभा करून त्याचें पुरीष(मळ) आकर्षण करावें. तें अनुवासन बस्ती आणि पुच्छ उजवेकडे करून, त्यास निरूहबस्तीही द्यावी.

दद्रु, शोफ, कफ, श्वास, संग्रहणी व कुष्ट इत्यादि रोगांवर आणि विषार्त, गर्भिणी, प्रवासी, अशा अश्वांसही बस्ती द्यावी.

क्षुधा, तृषा, श्रम यांनीं व्याकुल झालेल्या अश्वांस, व दारू पाजलेल्या आणि अति व्याधित व पीडित अश्वास ही बस्ती वर्ज्य होय.

शीर टोंचून रक्त काढणें.

नकुलाचे शास्त्रांत अश्वांना एकंदर ७२००० हजार शिरा आहेत ह्मणून सांगितलें आहे. अश्वाच्या शिरा तोडणें झाल्यास शस्त्र अर्ध अंगुल रुंद व ६ अंगुलें लांब असून त्याचें अग्र साळीच्या टोंकाप्रमाणें किंवा कमलपुष्पाचे अग्रासारखें असावें. पक्व शोफ वगैरे झाल्यास वस्तान्याप्रमाणें तें शस्त्र १ एक अंगुल मात्र असावें. शिर टोंचणें हें अश्वास मुख्य औषध आहे. रक्त हें देहाचें मूळ आहे. आणि त्यावरच जीवन आहे. परंतु कांहीं पदार्थांनीं तें रक्त दूषित होऊन अनेक रक्तरोग होतात. यासाठीं दुष्ट रक्त शिरा टोंचून वाहवावें. शरत्काळ व उन्हाळा यांत शीर टोंचूं नये. झड लागली नसेल तेव्हां वर्षाऋतूंत अथवा थंडीचे दिवसांत मध्यान्ह काळीं शिरावेध करावा. शिशिर व वसंत ऋतूंत स्वेद काढावा व शीत कालांत शिरावेध करावा. शब्द करणारे व फेंसकट जें रक्त असतें तें वातापासून झालेलें; काळें व निळें असें रक्त पित्तोत्पन्न होय; आणि दाट पांढरें व पिच्छिल रक्त कफापासून होतें. दोन प्रकारचें रक्त असल्यास द्वंद्वापासून आणि चित्ररंगी असल्यास संनिपातापासून दूषित झालें, असें जाणावें. शीर

टोंचल्यावर ससाचे रक्ताप्रमाणें किंवा सेंदरासारखें जें रक्त निघतें तें शुद्ध होय. शस्त्रवैद्यानें वेळणीसारखें भांडें तोंडीं धरून तें रक्त त्यांत धरावें. कापडानें अश्वाच्या अंगाचें रक्त निवारण करावें. जर रक्तस्राव राहत नाहीं तर जेथें शस्त्र टोंचलें असेल तेथें लोखंडाचा डाग द्यावा.

वामभागीं किंवा दक्षिणभागीं वसेच्या १ अंगुळ अंतरावर पुढें १ वळी सोडून टाळूची शीर टोंचावी. शंखावरची शिर अंगापासून दोन अंगुलांवर, अश्रुपाताचे ठिकाणची डोळ्याखालीं २ अंगुलांवर, प्रोथाची* नाकाचे खालीं दोन अंगुलांवर, बाहूवरची सांध्याच्या वर दोन अंगुलें, आणि उरावरची आवर्ताच्या खालीं ४ अंगुलांवर, किणावरची वर १ किंवा २ अंगुलांवर, कानावरची नेत्रकूटावर, खुवावरची खुवसंधि सोडून २ अंगुलांवर, कानावरची कर्णमूलापासून २ अंगुलांवर, मानेची व राकिकेची ही कूर्चाचे वर ४ अंगुलें सोडून, गुडघ्यावरची ६ अंगुलें गुडघा सोडून, कूर्चावरची खुराच्यावर ६ अंगुलें सोडून, रोमांच्या वरची खुरसंधीपासून दोन अंगुलांवर, तळावरची मंडूकाग्र सोडून, कक्षेंतली चार अंगुलांवर, नाभि व कोठा यांवरची डावेकडे व उजवेकडे ८ अंगुलें सोडून, पक्षाचे ठिकाणची पार्श्वभागीं आसनाजवळ दोन अंगुलांवर, ऊरुसंधींतली खालीं, ४ अंगुलांवर, पुच्छावरची पुच्छमूळापासून २ दोन अंगुलांवर आणि शरीराचा पृष्ठभाग ककुद व डोकें यांतली शीर गुडघ्यांचे खालीं, याप्रमाणें खालीं टोंचावी. जेथें शीर टोंचली तेथील रक्त दोषाचे तारतम्यानें वाहूं द्यावें. टोंचतांना डाव्या आंगठ्यानें शीर दाबून मग शस्त्रानें ताडन करावें. केशयुक्त प्रदेशावरची शीर टोंचण्यापूर्वी तेथील केश छेदिले (भादरिले) पाहिजेत. टोंचल्यावर जें रक्त वाहील तें पात्रांत धरावें. ताळू, शंख, हनवटी, प्रोथ, कपाळ, स्कंध आणि कान या ठिकाणच्या शिरा

* प्रोथ वगैरे जे शारीरिक शब्द आले आहेत त्यांचा खुलासा व कोश प्रथम भागांत दिला आहे, तो बघावा.

लोहमय सारख्या शस्त्रानें टोंचाव्या. मांड्या, पाय, कूर्च आणि कोष्ठ या ठिकाणची व तळव्यावरची शीर अर्धांगुलपरिमाणाच्या शस्त्रानें छेदावी. तसेच अंडावरची आणि कोष्ठावरची व पुच्छावरची शीर अर्धांगुल शस्त्रानें छेदावी. पृष्ठ, बाहू व जंघा यांवरची अंगुलमात्र शस्त्रानें छेदावी. शस्त्राचें मुख सुतानें वेष्टून वर सांगितल्याप्रमाणें शीर टोंचून रक्त वाहू द्यावें. भलते ठिकाणीं ताडन केलेला, भ्यालेला व ज्याचें वीर्य क्षीण आहे त्या अश्वास शिशिरऋतूंत पाण्यांत शिरवून मग शिरावेध करावा ह्मणजे शिरा वाहत नाहींत.

अश्वास वमन किंवा रेच यांबद्दल रक्तस्राव करणें विहित होय. रक्ताचा भिन्न रंग दिसेपर्यंत स्राव करावा. पित्त झालें असल्यास पीतवर्ण, वायुदोष असल्यास काळें, आणि कफानें पांढरें व फेंसाळ असें रक्त होतें. कपोताचे रंगाप्रमाणें असल्यास पित्तजन्य जाणावें. आणि सन्निपाताचे रक्तांत सर्व दोष उत्पन्न होतात.

दुष्ट रक्त नाहींसें झालें ह्मणजे अश्वास स्वच्छ पुसून गोमूत्रांत तेल व हिरडे ९ पलें घालून दररोज देत जावें. याप्रमाणें तीन सप्तकें द्यावें.

काळ आणि अश्वाचें बळ पाहून शिरावेध करावा. त्यांतून दूषित रक्त वाहून गेलें असतां अश्वास परम सुख होतें, असें नकुलग्रंथांत सांगितलें आहे.

घोटे, गळा, मेंढ्र (शिश्न), कक्षांत, पुंड्रक, गुद, पुच्छ, बस्ति, जंघा, सर्वसंधी, जिव्हा, अधरोष्ठ, दाढा, शंख, कर्णमूळ आणि मणिबंधांत या ठिकाणीं रक्तस्राव करावा.

घोडा पाणी प्यालेला, श्रमलेला, पीडित व ताडन केलेला असल्यास शीर टोंचूं नये. श्रमानें व भारानें अश्वाचें शरीर पीडित झाल्यास आणि रक्तमांस क्षीण झाल्यास शिरावेध करावा.

गळ्याजवळच्या शिरांचें पन्नास पळेंपर्यंत, तोंडाचें व गंडस्थळांचें व दोन्ही कुक्षींचें शंभर पळेंपर्यंत, ताळूजवळचें पन्नास पळेंपर्यंत, पुच्छ

व मेंढू (शिश्न) या ठिकाणचें पन्नास पळेंपर्यंत, अंडाचें पंचवीस पळें-पर्यंत, आणि गुदाचे ठिकाणीं बारा पळेंपर्यंत, याप्रमाणें रक्त काढावें. जरी हें प्रमाण सांगितलें तरी नासकें रक्त जाऊन शुद्ध रक्त दिसेपर्यंत काढावें.

दुसरें प्रमाण गळ्याचें, तोंडाचें व गंडस्थळाचें शंभर पळेंपर्यंत रक्त काढावें व इतर सर्व ठिकाणचें पांच पांच पळेंपर्यंत काढावें.

डाग देण्याचा प्रकार.

अश्वास वायुप्रकोप झाला असतां सुज्ञ वैद्यानें यथाशास्त्र लोखंडानें अग्निडाग द्यावा. लोखंडाच्या पातळ शलाकाकरून डाग द्यावा. आणि स्नेहानें डाग देणें असल्यास वार्तीनीं किंवा बिंदूनीं डाग द्यावा. शलाकेनें रक्तापर्यंत व मांसलप्रदेशास फलकांनीं डाग द्यावा.

धातुपरीक्षा.

आतां रोगांचा उद्भव समजण्याकरितां धातूचें लक्षण सांगतों. रक्त-दोषापासून घोड्यास महाभय प्राप्त होतें. यासाठीं विचक्षणांनीं आधीं त्याचें रक्त पाहावें. आषाढमासीं शीर तोडून रक्ताचें शोधन करावें. नंतर अश्वास पिंड (लाडू) वगैरे घालून श्रावणमासीं तूप पाजावें; ह्मणजे तो वज्राप्रमाणें बळकट होतो. ज्या अश्वास रक्त अधिक आहे तो जर शुष्क पदार्थ खाईल तर त्यास पित्ताधिक्य होऊन त्या योगानें तो नाश पावेल. रक्ताधिक अश्व स्निग्ध(तेलकट) गवत खाईल-तर कफाधिक्य होऊन नाश पावेल. आणि रक्तहीन घोडा रूक्ष गवत खात असल्यास वायुप्रकोप होऊन नाश पावेल. धातूचें लक्षणही रक्त-विकारावरून सुज्ञांनीं जाणावें.

ज्या वेळेस पित्तानें रक्तप्रकोप होतो त्या वेळेस घोड्यास कंडू उ-त्पन्न होऊन तो नेहमीं अंग घांसतो. तेव्हां त्यास उत्तम छाया व जलाश्रय असेल तेथें त्यास लागेल तितकें पाणी व उत्तम आहार द्यावा.

याप्रमाणें पित्तापासून झालेल्या रक्तावरून अश्वाची परीक्षा करून शिरामोक्ष करावा आणि त्यास कुटकी व गूळ द्यावा ह्मणजे तो शुद्ध व निरोगी असा होतो. घोड्याचें रक्त पित्तानें दूषित होऊन तो अश्रु गाळीत असेल व त्याचे नेत्राचे ठिकाणीं पांढरेपणा येईल तर तो अश्व थोडे काळांत मृत्यु पावतो. याकरितां प्रयत्नानें रक्तदोषनिवारण करावें. जो घोडा कफ व रक्त यांचा प्रकोप झाल्यामुळें खालीं तोंड करतो व वारंवार खोकतो, आहार घेत नाहीं, नाउमेद असतो, चाबुकानें मारलें असतां त्यास समजत नाहीं, गुद व पृष्ठ (पाठ) यांचें ज्ञान नसतें, नाकानें पाणी ओढतो, विस्तवानें शेकण्याची इच्छा करतो, अशा अश्वाचें रक्त शोधन करून त्यास तूप व गूळ द्यावा.

कफरक्तानें दूषित झालेल्या घोड्याचे नेत्राजवळ बिंदु उत्पन्न होऊन त्याचे पोटाशीं खाज उत्पन्न होते, तेव्हां तो सहा महिन्यांचे आंत मरतो. त्यास सुंठ, अमृता, गोखरू, नागरमोथे, श्यामा, वचा, हिंग व षष्ठी या पदार्थांचा पिंड (गोळा) करून देत जावा ह्मणजे त्यास सुखावह होतो. तो पिंड न खाईल तर त्यांत सैंधव द्यावें.

अश्वास वातरक्तप्रकोपानें पीडा झाल्यास तो अकालीं मैथुनाविषयीं सक्त होतो, कुशीस ताडन करतो, फार श्वास सोडतो, एके ठिकाणीं रमत नाहीं, अमर्याद हिंसतो, तेव्हां त्यास रक्तशोधन करून पुष्कळ तूप द्यावें ह्मणजे शुद्ध होऊन पुष्ट होतो. जेव्हां त्याच्या तोंडानवळ तांबडा पट्टा, व मुखास खाज उत्पन्न होतें तेव्हां तो अमृतासिवाय दुसऱ्या औषधानें जगणार नाहीं. त्यास ह्मशीचें दहीं व भात रात्रीं देत जावा.

घोड्याचें रक्त संनिपातानें जेव्हां दूषित होतें तेव्हां तो कांपतो व फार खोकतो, त्यास निद्रा व आळस ज्यास्त होतात, अग्नि मंद होतो, तो बस्तीवर मान ठेवतो, कान पाडतो, व लाळ गाळतो, तेव्हां त्याचें रक्त शोधून लंघन करवावें. नंतर थोडें पाणी व आहार द्यावा.

कधीं उष्ण, कधीं शीतल व कधीं औषध या द्वारानें त्यास अ-मोदक द्यावें. पथ्या (हिरडा), अमृता (गुळवेल), कुटकी, व वेखंड यांचा काढा किंवा चूर्ण करून त्यास द्यावें. शिरीष, श्रीफळ आणि वेतस हे पदार्थ अश्वाच्या मंदाग्नित्वास व वायूस भस्म करितात. ज्येष्ठमध, मोहाचा कांदा, गुळवेळ, चंदन, क्षौद्रक आणि लाख या पदार्थांचा तृतीयांश काढा करून सन्निपात झालेल्या अश्वास द्यावा ह्मणजे तो सन्निपात नाहींसा होतो. अश्व प्रकृतीनें स्वस्थ असूनही त्याचे नेत्रांचे जवळ पूर्वी सांगितलेलीं चिन्हें झाल्यास तो अश्व पुष्ट असला तरी तीन महिन्यांत नाश पावतो. ज्याच्या नेत्रांच्या आंत अनेक रंगांची रेषा उत्पन्न होते, व देहाचे ठिकाणीं जडपणा येतो, त्याचें आयुष्य पांच महिने राहिलें असें समजावें. ज्याचे जिभेवर एकाएकीं बिंदु उत्पन्न होतो, तो अश्व एक किंवा दोन महिन्यांत मरण पावतो. ज्या घोड्याचा रंग एकाएकीं पालटून निळा पडतो तो पांच महिन्यांनीं मरतो. ज्याची आकृति वज्रासारखी होते तो सहा महिन्यांनीं मरतो. ज्याची आकृति पांढरी होते तो सात महिन्यांनीं व ज्यास पंचका होते तो आठ महिन्यांनीं मरतो. हळदीसारखा ज्याचा रंग होतो तो अश्व नऊ महिन्यांनीं, लाखेप्रमाणें रंग झाल्यास दहा महिन्यांनीं, ज्याची कांति रूक्ष झाली असेल तो अकरा महिन्यांनीं, आणि जो बर्फाप्रमाणें थंड झाला असेल तो एक वर्षानें मरतो.

ज्या घोड्याचा श्वास उष्ण होतो, शरीर घामेजतें, व जीभ बर्फासारखी थंड होते, तो सहा महिने वांचतो. ज्याच्या मानेच्या समोर, पायाजवळ व उदराचे ठिकाणीं पट्टा उत्पन्न होतो, आणि लाल मूत्र होतें, तो सहा महिने वांचतो. ज्याच्या कानांत व नेत्रांत रक्त येतें तो वातपित्तानें पीडित झालेला अश्व दहा महिने जगतो. ज्या घोड्याची नेत्रकांति वातरक्तानें नाहींशी होते, तो, व ज्यास मूत्र-

रुक्ष होतें तो अश्व हे सात महिने जगतात. ज्याचे नेत्र वातरोगानें *हळदीसारखे होतात त्याचें आयुष्य ७ महिने होय. ज्याचे नेत्र वातविकारानें अनेक रंगांचे होतात, तो सात दिवसांत मरतो. ज्याचा एक डोळा निळा व दुसरा लाल होतो तो पित्तरोगी घोडा महिनाभर जगतो. ज्याचें मुख पित्तानें प्रसन्न दिसतें व रक्तांत काळिमा असते तो १९ दिवस जगतो. याप्रमाणें चिन्हांवरून अश्वाचा रक्तविकार जाणून नंतर वर सांगितल्याप्रमाणें उपाय करावे. रोगी, फार ताडन केलेला, व शीर टोंचलेला, असा जो अश्व आहे त्यास पाणी पाजल्यावर थंड प्रदेशांत बांधावें.

शिरोरोगपरीक्षा.

अश्वास श्वास, तहान, मर्माचे ठिकाणीं शून्यत्व, अति उष्णता व जडपणा हीं चिन्हें होऊन तो अश्व खालीं तोंड करतो, आणि त्याला निद्रा व आळस फार येतात, तो पित्तोद्भव शिरोरोग समजावा. त्यास पूर्वी सांगितल्याप्रमाणें शंखादिस्थानीं शिरावेध करावा. शंभर वेळ धुतलेल्या तुपानें मस्तकास अभ्यंग करावें. प्रपौंडरीक, मधुक, चंदन, वाळा व कमळ यांचा कल्क करून मस्तकावर लेपन करावें. दुधानें साधलेलें तूप, मध, वाळा व कमळ यांचा कल्क करून नासिकेंत सिंचन करावें. खाण्यास तीळ व मूग तूप घालून द्यावे. हरळी, अर्जुन वृक्षाचीं पानें, व शालपत्रें यांचा घांस द्यावा.

अश्वास मस्तकरोग हा वात, पित्त, कफ, संनिपात, रक्त आणि अभिघात (प्रहार) या कारणांपासून होतो. घोडा खालीं मान घालतो, दीन होतो, त्याचा आहार मंद होतो, नेहमीं रोषमान होतो, अंग रोमांचयुक्त होतें, व डोकें कांपूं लागतें तेव्हां तो रोग वातापासून आहे असें समजावें. यास शंख व तालु यांच्यांमधील शिरा टोंचून अंगास तेलानें सिंचन करावें.

अतिविष, पिंपळी, वचा, मीठ, व सुरसेचें पार्श्वपत्र यांसहित दारु हें प्रतिपादन द्यावें. भोजनांत रसयुक्त ओदन (भात) तिळाचें तेल व थोडी कुटकी घालून द्यावा.

नेत्ररोगपरीक्षा.

घोड्याच्या नेत्रांवर मांस वाढल्यामुळें जेव्हां दृष्टि झांकली जाते तेव्हां कफात्मक प्रवारकाक्ष नांवाचा नेत्ररोग झाला आहे असें समजावें. या अश्वास जमिनीवर पाडून त्याचे नेत्र उघडून नंतर कुशल वैद्यानें लोहगळानें व तीक्ष्ण शस्त्रानें प्रवारकाचा छेद करावा. परंतु डोळ्यांतील बाहुलीस अगदीं धक्का लागूं देऊं नये. नंतर त्या नेत्रांत मध व सैंधव भरावें. प्रवारकाचा नाश होण्याकरितां शंखावरची शीर तोडावी. कुष्ठ, वेखंड, त्रिकटु (सुंठ, मिरे, पिंपळी) व लवण हे पदार्थ दारूंत द्यावे. त्यास निवाऱ्यांत बांधावें. रसयुक्त हरळी खाऊं घालावी, परंतु तीक्ष्ण व मधुर पदार्थ देऊं नयेत.

रक्ताचा स्राव झाल्यानें समग्र किंवा अर्धे अथवा तृतीयांश अश्वाचे नेत्र लाल होतात तेव्हां त्यास स्राव नांवाचा नेत्ररोग झाला असें जाणावें.

अश्वाच्या शिराचे ठिकाणीं प्रहार केल्यानें नेत्रांतून रक्तस्राव होत असल्यास तो अभिघातोद्भव नेत्ररोग जाणावा.

वरील नेत्ररोगास चिकित्साः—इंद्रजव, तालपत्र, मंजिष्ठा, मध, हळद, शैलेयक आणि हरळी हे पदार्थ पाण्यानें धुऊन त्यांचें अंजन वर्तीनें (वातीनें) सुज्ञ वैद्याकडून नेत्रांत घालावें. मंजिष्ठा, हरिताळ, लोध्र, हवालक, हरेणुक, कुष्ठ, उशीर (वाळा) व मनशीळ हे पदार्थ पाण्यांत वाटून सांवलींत वाळवावे व त्यांचें अंजन घालावें. श्रीभिस्सक, फल, लोध्र, कश्मरीचें फळ, मधुक, साखर, व रसांजन हे समभाग मधांत मिश्र करून त्यांचें अंजन नेत्रांत वर्तीनें घालावें, म्हणजे रक्ताभिस्यंद नांवाच्या नेत्ररोगाचा नाश होतो.

अश्वाचे नेत्रास खालीं किंवा वर पडळ येतें तें हिरवें किंवा निळें असल्यास पित्तापासून, तांबडें असल्यास वायूपासून, किंचित् पिवळें जाड व पांढरें असल्यास कफापासून आणि मिश्र रंगाचें असल्यास संनिपातापासून आहे असें जाणावें. संनिपातजन्य पडळ तांबडें व काळें असें मिश्र वर्णाचें असल्यास असाध्य किंवा कष्ट-साध्य होय.

पडळास उपाय—सर्व पडळास शिशिर प्रशस्त होय. अश्रु-पात, प्रघाण, कपाळ व शंख या टिकाणीं मध व सैंधव यांचें अंजन घालावें, आणि गोमूत्र व मध यांचें सेंचन करावें ह्मणजे कफजन्य पटलाचा नाश होतो. गोदंत, सैंधव, हरिताल, मनशीळ, आणि मिरे हे गोमूत्रांत खलून त्यांचें अंजन मधांत घालावें ह्मणजे कफोद्भव पटलाचा नाश होतो. वातजन्य पटल असल्यास वरील चूर्ण मांस व नागरमोथे घालून द्यावें. प्रपौंडरीक, ज्येष्ठमध, शंख, मोतीं, व प्रवाळ,हे समभाग करून पाण्यांत खलून एक दिवस उन्हांत वाळ-वून पुन्हा पाण्यांत खलून तें वातीनें लावावें. त्यावर त्रिफळा व तूप द्यावें. ह्मणजे रक्तपित्तापासून झालेलें पडळ नाश पावतें. पडळ झालें असतां घोड्यास नेहमींची वेळ सोडून पाणी पाजावें. वायू-पासून झालेलें मांस कीळशस्त्रानें फाडून त्यांत त्रिकटुचूर्ण व सैंधव हें घालावें.

नेत्ररोगमुंजिका.

पडळाचे आंत किडा उत्पन्न होतो त्यास मुंजिका ह्मण-तात. व किडे पुष्कळ झाले ह्मणजे मुंजनाळ ह्मणतात. हा रोग झाला असतां अश्वाला भूमीवर पाडून बळकट बांधून मार्गांत (डोळ्याच्या आंखांत) सुईनें टोंचावें व बारीक कापडानें त्याचे अश्रु पुसावेत. त्या अश्वास सुखांत ठेवावें. शस्त्रास सूत गुंडाळून तें तिळायेवढें करावें

आणि त्यानें पांढरे व कृष्ण वर्ण झालेल्या नेत्रास टोंचावें. नंतर अंगठ्यानें नेत्र पिळून त्यांतील मुंजक (कृमि) ओढून बाहेर पाण्यांत टाकावें. मुंजक डोळ्यांतून निघाल्यावर गोमूत्रानें नेत्रशोधन करावें. मग मधानें डोळे भरून बारीक कापडानें वेष्टन करावें. बाहेरील बाजूस पंच वल्कलाच्या कल्कांत तूप घालून त्याचा लेप द्यावा. मुंजकास जो विधि सांगितला तोच मुंजनालावर व व्रणावरही प्रशस्त होय. प्रपौंडरीक, ज्येष्ठमध व रक्तचंदन यांचा कल्क त्रिफळा व पाणी यांसहित तेल कढवून त्याचें नस्य द्यावें. हें नस्य व्रणासही प्रशस्त होय.

पिंपळी, सैंधव, सुंठ, गैरिक, अरुणावचा, गोदंत, उष्ट्रदंत, व अतिविष हे पदार्थ वस्त्रगाळ करून मधांत त्याचें अंजन घोड्यास घालावें म्हणजे मुंजकाचा नाश होतो.

ज्या अश्वाच्या नेत्रापासून पू पडत असेल किंवा ज्यास चर्मकोप झाला असेल त्यास ब्याहड्याचें अंजन मधांत घालावें. शंख व अश्रुपात या ठिकाणीं कपाळावरली शीर टोंचावी. त्रिफळेच्या काढ्यांत लोध्र घालून त्यानें सिंचन करावें व पंच कल्काचें चूर्ण मधांत मिसळून त्याचा लेप द्यावा.

श्लेष्मपरीक्षा.

जेव्हां अश्वाच्या नेत्रांतून नेहमीं श्लेष्मा (मळ) वाहतो, अश्रु वाहतात, काच उत्पन्न होते, व डोळ्यांस पांढरेपणा येतो, तेव्हां पिंपळी, लोध्र, कटुक, रोहिणी, त्रिफळा व पिचुमंद हे पदार्थ गोमूत्रांत भिजत घालून किंवा कढवून राहिलेल्या पाण्यांत मध घालून आणि सोसेल इतकें गरम करून अश्वाच्या नेत्रांस त्याची वाफ द्यावी व तें पाणी डोळ्यांतही घालावें. कटु तेल पाण्यांत कढवून वावडिंगाचा कल्क मिसळून, तें नस्य द्यावें. गैरिक,

आलें, काजळ, बृहतीफल, मिरीं, पिंपळी, वावडिंगें, व सैंधव हे पदार्थ समभाग करून ताम्रपात्रामध्यें गोमूत्रांत भिजत ठेवावे. ते पुष्कळ भिजल्यावर पुन्हां पीठ करावें. याप्रमाणें हें चूर्णांजन कफात्मक नेत्ररोगावर प्रशस्त होय.

जो घोडा मुखांतून व नाकांतून श्लेष्मा (कफ) गाळतो, अत्यंत दीन होतो, ज्याचें डोकें जड होतें, आहार मंद व टाळू शुष्क होते, त्यास कफोद्भवशिरोरोग झाला, असें जाणावें.

यास टाळूचे ठिकाणीं शिरावेध करावा. पौंडरिक, वावडिंगें, कुटकी, डोरलीं व मिरीं हे पदार्थ चूर्ण करून मेंढीचे दुधांत त्यांचें नस्य करावें. सुंठ, बडीशेप, तगर व हरेणुक यांचा गोमूत्रांत कल्क करून तो तेलांत कढवावा आणि त्याचें नस्य द्यावें. तीळ व मूग हे खाण्यास द्यावे. त्रिकटु, कुटकी व मध देऊन त्यास साहेलसें उष्ण करावें.

सिंहानक (शिंगाडा) रोगपरीक्षा.

सिंहानक (शिंगाडा) हा रोग वात, पित्त, कफ व सन्निपात यांपासून होतो. त्याचें लक्षणः—नाकांतून फेसाचा स्राव होत असतां तो रोग वातापासून झाला आहे असें समजावें; तांबडा, पिंवळा व काळा असा स्राव होत असल्यास पित्तजन्य रोग जाणावा; घट्ट व दह्यासारिखा स्राव असल्यास कफापासून रोग आहे असें जाणावें; आणि अनेक रंगांचा स्राव होत असल्यास सन्निपातजन्य अतएव असाध्य होय. वात व कफ यांपासून हा रोग झाला असतां मस्तकाचे ठिकाणीं घाम उत्पन्न करावा; पित्तापासून असल्यास प्रियंगु, चंदन व वाळा यांनीं मस्तकास लेपन करावें. कोणतेही सिंहानकास शंख व टाळू या ठिकाणीं शीर टोंचावी. बृहती, पांढऱ्या मोहऱ्या, व डोरलीं हीं गोमूत्रांत चूर्ण करून व तेलांत आलोडन करून नस्य द्यावें, [illegible] खाण्यास घालावी, पाणी थोडें द्यावें. नासिकेच्या अग्रभागीं [illegible] देऊन आंत

नलिकाछिद्रानें औषध घालावें. याप्रकारानें कफाचें आकर्षण होतें. तर हा उपाय सिंहानकावर अवश्य करावा. शिरांचें रेचन करावें. अतिविषाचें चूर्ण व कूटचूर्ण श्लेष्म्याचा नाश होण्यासाठीं द्यावें. वसु, वावडिंग, राळ, देवदार, रजनी, वाराहीकंक, आणि वालमूळ हे समभाग घेऊन त्यांचा कल्क करून पंचमूळांच्या कषायांत तेल पक्क करून, त्यासह तें नस्य कटुचूर्णयुक्त द्यावें. ह्मणजे वात व कफ यांपासून झालेल्या सिंहानकाचा शम होतो. पित्तसिंहानकास मंजिष्ठा, ज्येष्ठमध, लोध्र, पिंपळी व रजनी (हळ`) दोन प्रकारची (अंबेहळद व गांवठी हाळद) यांचें नस्य दुधाशीं द्यावें. लोध्र, प्रपौंडरीक, ज्येष्ठमध, व निळें कमळ यांचा कल्क करून तो तेलपाणी व दूध यांत कढवावा, व तें नस्य द्यावें. ह्मणजे पित्तसिंहानकाचा नाश होतो. नस्य दिल्यावर घोड्याला कांहीं वेळ पुढच्या पायांस बांधून चालवावें, व पृष्ठभागीं ताडन करावें; ह्मणजे नाकांतून श्लेष्मा निघून जातो. असें दररोज प्रातःकाळीं करावें. सखल प्रदेशांत चालवावें. नासाछिद्रास गुडूची, त्रिफळा, निंब व अडुळसा यांचा कल्क करून सूक्ष्म कलमानें प्रोक्षण करावें. खाण्यास तिखट मूग तुपानें चोपडलेले असे द्यावे. पित्तसिंहानकावर तेल देऊं नये. वात व पित्त या द्वंद्वापासून हा रोग झाला असल्यास दोन्ही विधि करावे आणि सन्निपातापासून झाला असल्यास तिन्हीही उपचार करावे.

संनिपातरोगपरीक्षा.

वर सांगितलेलीं तिन्हीं लक्षणें भासत असतां संनिपातरोग जाणावा. तो असाध्य अथवा कष्टसाध्य दोन्हीही आहे. त्यास पूर्वोक्त शिरावेध करावा. देवदारू, दोन्ही हळदी, पिंपळी, शृंगवेरक, प्रपौंडरीक, मधुक व सरसाचीं पानें यांचें दारूंत प्रतिपान द्यावें. श्रीवासक, सर्जरस, वेखंड, हरेणुक व तूप हे पदार्थ मिश्र करून त्यांची धुरी ना-

कांत द्यावी. आणि तीळ व मूग मध व तूप यांबरोबर खाण्यास द्यावे.

रक्तादि शिरोरोग.

कटु क्षार व आम्ल हे रस अतिशय सेवन केल्यानें अश्वाचें रक्त कुपित होऊन शिरोरोग होतो. त्यापासून शून्यता, अक्षिकूट व नेत्रांचे ठिकाणीं लाली हीं उत्पन्न होतात. त्याच्या मनांत खिन्नता असते, व नेत्रांतून कधींकधीं रक्त गळतें. हा रोग अश्वाच्या डोक्यावर काठी किंवा धोंडा वगैरे मारला असतांही उत्पन्न होतो. या घोड्याचे कान ताठ, डोकें जड, व मन खिन्न असतें. पित्तजन्य शिरोरोगास जी क्रिया सांगितली, तीच यासही करावी. जो घोडा नेहमीं आकाशाकडे पाहतो, व ज्याच्या नाकांत किडे झालेले दिसतात, त्यास कृमिजन्य रोग आहे, असें समजावें. यास त्रिकटु, वावडिंग व डोरलीं हीं दारूसहित वाळवून त्यांचें नस्य द्यावें. वावडिंग, लसूण, लोध्र व बृहतीचीं फळें यांचा गोमूत्रांत कल्क करून, तेलांत पाचित करून, तें सोसेल असें उष्ण नस्य द्यावें आणि तीळ व मूग यांत वावडिंग व तूप घालून खाऊं घालावें.

कर्णरोग.

दोषांनीं अथवा प्रहारांनीं रक्त दूषित झालें असतां सर्वांगाचे ठायीं वेदना होऊन अश्वास शोथ नांवाचा कर्णरोग होतो. कानांतून पू गळूं लागला ह्मणजे तो रोग कानांत झाला, असें समजावें.

वस्त्रानें शलाकेचें अग्र वेष्टन करून त्यानें आंतील पू काढावा. नंतर अश्वास पाडून बंधन करावें व त्याचे कानांत मध व तूप घालून कान भरावा. पिंपळी, लोध्र, ज्येष्ठमध, मधुक व चंदन यांनीं सिद्ध केलेलें घृत कानांत घालण्यास प्रशस्त होय.

कुड्याचें बीं पीठ करून त्यांत ज्येष्ठमध घालून घृतांत

आलोडन करावें. व किंचित् ऊन करून त्यांत वस्त्र भिजवून तें कानांत घालावें. कवठाचा रस, मध व तूप मंदोष्ण करून तें कानांत घालावें. क्षीरवृक्षाचें पान व साल, सापाची कांत, जटामांसी, गुग्गुळ, कुष्ठचूर्ण व मनशीळ हे पदार्थ तुपांत मर्दित करून त्यांचा धूर कानांस द्यावा. खावयाला पिंपळी व तिखट मूग हे मध मिश्र करून द्यावे.

कान सुजून वांकडे होतात, त्यास उपचारः—प्रथम कान शस्त्रानीं छेदून मग सैंधव, संचळ व गूळ हीं प्रत्येक एक एक टांक घेऊन वाटून त्यांचा कानावर लेप करावा, व तसाच दुसरे दिवशीं कान धुऊन पुन्हां लेप करावा; आणि सुंठ, सैंधव व लसूण हीं पावशेर प्रमाणें घेऊन कुटून तुपाबरोबर पोटांत द्यावीं. येणेंकरून तीन दिवसांत कानाचे सर्व रोग बरे होतील.

कर्णमूळः— कानाखालीं गांठी येतात, अथवा मानेस गांठी येतात तें. त्यास उपचार—लोखंड तापवून डाग द्यावा.

घ्राणरोग—(नासारोग).

ज्याच्या नाकांत पुटकुळ्या, व्रण किंवा सूज आली असेल त्यास घ्राणरोग झाला असें जाणावें. त्याचें दुष्ट रक्त आकर्षण करावें. नंतर त्यास जमिनीवर पाडून शस्त्रानें नासापुटास टोंचावें. पुढें त्यास घृताभ्यंग करावा. आणि मग पंचवल्कलाचे उदकानें तुपासह वरचेवर त्या व्रणास सेचन करावें.

गुग्गुळाचा धूप जाळावा. त्रिफळेच्या काढ्याबरोबर हरळी खाण्यास द्यावी. सीतळ नस्य द्यावें. बिंब (तोंडलें) याचीं पानें पाण्यांत भिजवून मध व तूप यांजबरोबर खावयाला द्यावीं. तिळाशीं व तिक्त (तिखट) मुगांशीं उत्तम रक्तचंदन, लोध्र, मध, हस्ताळ, कालेब, उपळसरी व वालाक्ष हे पदार्थ शेळीच्या दुधांत मिळवून त्यांचा कल्क

व तिळाचें तेल हें अभ्यास दिलें असतां मांसव्रणाचा नाश करतें.

व्रणपरीक्षा.

व्रण सर्व रूपांनीं युक्त असतां तो संनिपातजन्य किंवा द्विरूप ह्मणजे द्वंद्वजन्य होय. दुष्ट व्रणास आधीं शुद्ध करावें आणि नंतर तो बुजविण्याचा उपाय करावा. जो व्रण प्रथम उत्पन्न होऊन मग त्यास दुर्गंध सुटतो, पुढें फुटतो आणि नंतर पीटिका (फोड) येतो, तो अशुद्ध होय. तो याप्रमाणें नसल्यास शुद्ध होय. दंतीमूल, दोन्ही हळदी, चित्रक व विश्वभेषज(सुंठ), किंवा रक्तजन्य असल्यास सैंधव, हे पदार्थ पेजेंत चूर्ण करून व्रणास लाविले असतां शोधन होतें. तीळ व सातूची पेंड हीं, किंवा दहीं, सैंधव, निंबाचीं पानें व तिळकल्क हीं मधाशीं द्यावीं; ह्मणजे व्रणाची शुद्धि होते.

व्रण शुद्ध झाल्यावर मध व सैंधव शिवाय करून वरील पिंड दिला असतां व्रण बुजतो. डाळिंब, आवळी, अगस्त्य व कंवठ यांच्या साळीचें चूर्ण हें शुद्ध व्रणास लाविलें असतां व्रण बुजतो. व्रण बुजल्यावर केश येण्याकरतां डुकराच्या अस्थि अथवा केश, दंत किंवा नख आणि वृषभादिकांचें गंडस्थळ किंवा कांस यांचें हाड किंवा पपणीचे केश मिळेल तें एकत्र करून जाळावें, व ती राख तूप व तेल यांत लावावी, ह्मणजे केश उगवतात.

नाडीचे ठिकाणीं व्रण असल्यास, कण्हेर, दंती, अर्क (रुई), स्नेह, कंटक व चित्रक यांसह भल्लाक (बिबा) लावावा. घेरोसा गोमूत्रांत खलून त्या नाडीव्रणांत भरावा. रक्तापासून किंवा क्षतापासून व्रण असल्यास मूलकादिक व आम्ल पदार्थांनीं स्वेद (घाम) उत्पन्न करावा. ज्येष्ठमध व प्रतती यांचा कल्क तूप व मध यांसह वस्त्रानें व्रणास बांधावा. व तुपानें सेचन करावें. पंचवल्कलांच्या कल्कानें तुपांत लेप करावा. त्याण्यास वाळलेलें मद्य द्यावें. पाणी थोडें पाजावें. छद-

मार्गी व्रण असल्यास वर सांगितलेला शोधनप्रकार करून सांगितले-ल्या सर्व क्रिया कराव्या. जो व्रण अति मोठा फार दिवसांचा किंवा मांस, मज्जा आणि अस्थि यां ठिकाणीं असेल तो असाध्य किंवा कष्ट-साध्य होय, असें जाणावें.

पादरोग.

आतां पादरोगाचें लक्षण व चिकित्सा सांगतों. मंडूकता, पांसुखुर, पुनःखुर, चूर्णक, अध्यस्थि, दर्भक, चक्रवाकिक, उलूक, पादसंस्थान, पादविद्रालिका, आकर्ण्य, उपजंघा, गर्दभ, प्रपोटक, कर्दमक, पृष्ट-तल व भिन्नखुर याप्रमाणें अश्वास पादरोग होतात. मंडूकता हा रोग मंडुकस्थानीं व्रण झाला असतां उत्पन्न होतो. पायावर प्रहार केला असतां व दुष्ट कर्दमांत चालविलें असतां पांसुखुर नांवाचा रोग होतो. सर्व पादरोगांस शिरावेध प्रशस्त होय ज्यास तळपायाशीं हा रोग झाला आहे, त्याचें मंडुकशोधन करावें. अति तीक्ष्ण शस्त्रानें छिन्न (आर्द्र)मांस कापावें व तळपायाची केशांतली शीर टोंचून दुष्ट रक्त का-ढावें. नंतर तें वाहवावें.अश्वास त्रिफळ्याच्या काढ्यांत गुग्गुळ पाजावा. या उपायांनीं रोगाचा शम न झाल्यास अग्नीचा डाग द्यावा. दूधभात आणि गुग्गुळ हें पान करवावें. असें सात, सोळा, किंवा बारा दिवस करावें. त्यास खाण्यास हरळी व पिण्यास उष्णोदक थंड करून द्यावें. हाच क्रम सर्व पादरोगांवर प्रशस्त होय. व्रण किंवा रोमसंबंधी ग्रंथी असेल ती छेदावी. मग रुई, कण्हेरी व चित्रक यांच्या मुळ्या गोमू-त्रांत वाटून त्यास लेप द्यावा. ह्मणजे तो व्रण वाळतो. नंतर दंती, न-रकी, भल्लातक (बिबा), असिका आणि शितें यांचा रुईच्या दुधांत लेप द्यावा. ह्मणजे त्या रोगाचा भेद होतो. इतक्यानेंही परिहार न झाल्यास पूर्वीप्रमाणें अग्निदाह (डाग) देऊन त्रिफळेच्या काढ्यांत गुग्गुळ पाजावा. दाह (डाग) हा सर्व पादरोगांस प्रशस्त होय. आ-

र्दक नांवाचा रोग झाल्यास फाडून तत्क्षणीं दाह करून तो व्रण भुजेपर्यंत गुग्गुळ पाजावा. मुस्तकाकी आणि यव हीं त्यास वर्षभर देऊं नयेत. प्रपोटक रोगास फाडणें शिवायकरून वरील सर्व विधि करावा. कदंबक रोग म्हणजे शिळेप्रमाणें पायांस काठिण्य प्राप्त होतें. जंघांचे ठिकाणीं सूज येऊन ती मृदु असेल तर तो अध्यस्थि नामक रोग होय त्यास अग्निदाह करून आमर्दकास सांगितलेली सर्व क्रिया करावी. उपजंघ नामक रोगास विशेषेंकरून शिरावेध योग्य होय ज्या एका उपचारानें पादरोग कांहीं शांत होईल, तीच क्रिया वैद्यानें पुनःपुन्हा करावी.

लंगितपरीक्षा.

लंगित (लंगडणें) हा रोग दोन प्रकारचा आहे. एक वातादि दोषांनीं उत्पन्न होतो, व दुसरा अभिघात (प्रहार) केल्यापासून होतो. त्यास उपायः—घोडा उरांत, बाहूंचे ठिकाणीं, जानु. जंघा, त्रिक, कूर्च, खूर अथवा मंडूक या ठिकाणीं प्रहारावांचून लंगडत असेल तर तो वातादि महादोषांनीं लंगडतो, असें जाणावें. त्यास उपवास घालून शुद्ध करावें; नंतर हळद, अतिविष, लोध्र, पिंपळी, बिळायची, सुंठ, तालिसपत्र, वेखंड, कुष्ठ, कुचला, कंकाळ व सैंधव या औषधांसह दारूंत प्रतिपान तीक्ष्ण व शीत यांचें समालोडन करून प्रतिदिवशीं द्यावें. असें तीन किंवा सात दिवस करावें. रक्त शुद्ध नसल्यास वैद्यानें उरांतली शीर शस्त्रानें टोंचावी. कारण, शिरांतून दुष्ट रक्तस्राव झाला असतां, अश्वास सुख होतें. नंतर शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें दोन्ही पायांतील शिरावेध करावा. शिंशपा व पाटलीमूल साळीसह पाण्यांत कढवून त्यांत तूप व तेल घालून त्यांतून गुग्गुळ द्यावा. हा लंगडण्यावर हितावह होय.

प्रहारापासून असल्यास तूप शंभर वेळ धुऊन त्याचे उरास अभ्यंग करावें. आणि पंचवल्कलांचे चूर्णाचा लेप वरचेवर करावा. असें सात सप्तकें ह्मणजे ४९ दिवस करावें. घोडा ठाण्यावर असतां बीस दिवस करावें. नंतर त्यास फिरवून निरूहबस्ती करावा. तिसरे सप्तकाचे शेवटीं घोड्याचें रक्त अशुद्ध असल्यास पुन्हां शीर टोंचावी; आणि अग्नीनें पोळावें, ह्मणजे प्रहारजन्य लंगडणें नाहींसें होतें.

कपि, कच्छुक व वाह्याल यांचें मांस आणि निंब व सैंधव यांचा कषाय चतुर्थांश उरवून त्यांत आलें, सिंधु व हरिद्राचूर्ण हीं घालून तेल व त्र्योषचूर्ण यांसहित घोड्यास द्यावें. ते दिवशीं त्याला पाणी थोडें पाजावें. मागले भागास लंगडत असतां अनुवासन-बस्ति करावा. सर्व लंगडण्यांस शिरावेध प्रशस्त होय. उरांतील रोगानें लंगडत असतां जी क्रिया सांगितली ती सर्व लंगडण्यांस करावी. नेहमीं जो लगडतो त्यास कंबरेंत धनुर्वात आहे, असें जाणावें. अंडाजवळ त्याची शीर टोंचून त्याला खाण्यास चांगलें द्यावें, व निरूह करावा. वातहारक तैलांनीं अभ्यंग करावें. जो घोडा तीन पायांवर उभा राहून ध्यान करतो, तो अश्व शुद्ध आहे असें समजावें. तसाच जो पुढचे भागावर चालतो, मागल्या भागापेक्षां पुढचे भागावर ज्याचें उत्थान असतें, तोही शुद्ध व दृढ होय. झोंपेंतल्या सारखा जो घोडा उरांत नेहमीं १ किंवा तीन अंगुलें ही वांकलेला असतो, त्याची परीक्षा झाली पाहिजे. याहून जास्त वांकला असल्यास तो मोठा बळवान् असला तरी ग्राह्य नाहीं. जो दोन्ही किंवा एक खांदावर उचलून वेगानें गतीची तुलना ठेवितो, तो वातकटि जाणावा. जो वाळवंटांतून जात असतां कंबर उचलतो , जो मान आंखडून उराकडे पाहतो, ज्याचे कान अस्ताव्यस्त होतात, जो चालतांना मागले खुरांच्या अग्रानें जमिनीस

टेंकतो, गुडघे आंखडतो, व पुढचे भागानें उठून कांहीं लोळून मग मागला भाग उचलतो, ते सर्व अश्व वातबद्ध व अश्वकर्मांत निरुपयोगी होत.

अश्वास निरूह करणें तो, त्यास आधीं फिरवून, स्नान घालून व पाणी पाजून, चारा घातल्यानंतर तो सुखानें एकाग्र बसला असेल तेव्हां करावा. लंगितास (लंगडेपणास) निरूह करावयाचा तो तीन, पांच किंवा सात दिवस करावा.

कासरोग.

कास (खोकला) हा रोग तीन प्रकारचा आहे: जो खोकला श्वास व श्लेष्मा नसून रूक्ष असेल व शरीर कृश झालें असेल, तो कास वातजन्य होय; ज्यापासून अश्वास घाम येतो, खोकताना निळे व पिवळे असे बेडके पडतात, तो पित्तजन्य; आणि जो अधिक असल्यानें अश्वाचे रोमही दूषित होतात, अश्वाचें शरीर व डोकें जड झालेलें, अग्नि मंद होतो, खिन्नता येते, दह्यासारखा पांढरा कफ पडतो, खावयास न दिलें ह्मणजे त्यास सुख होतें, असा जो कास तो कफोद्भव जाणावा. ह्या तिन्ही लक्षणांनीं युक्त असतां सन्निपातिक समजावा. लाल कफ पडल्यास रक्तजन्य कास जाणावा. जो घोडा खोकतांना शरीर व मान पसरतो, अशक्त होतो, आणि पुवाप्रमाणें दुर्गंधयुक्त कफ पडतो, त्यास क्षतापासून कास आहे, असें समजावें.

वातकासास उपायः—पंचमूलांचे काढ्यांत मांसाचा रस करून तो तिळाचें तेल व मीठ यांसहित खाऊं घालावा. धमासा, रिंगणी, बृहती व कटुरोहिणी, यांचें चूर्ण करून वार्ताकपुष्प तेलांत साधून वंशलोचन व गोधूमचूर्ण हे सर्व दुधांत एकत्र करून वार्ताकी

फलाचे काढ्यांत सुंठ, मागधक व तिळांचें तेल यांसह पानक द्यावें. मूलकाचा रस व वार्ताक कढवून तेलमिश्रकाढा पाजावा.

कुलित्थ, दर्भमूल व मारलेला गोमेद यांचा धूर नासिकेंत द्यावा.

पित्तकास.

गोमयाचा रस व पिंपळीचें चूर्ण यांचा लेह मध व तुपांत द्यावा. यवचूर्ण, वंशलोचन, धात्री व मागधिका, हे पदार्थ तूप, मध व दूध यांसहित खाऊं घालावे. पिंपळी, मध, दूध, साकर आणि क्षौद्र हें पानक द्यावें. पंचतिक्तांचा कषाय दिला असतां मिश्रान्न खाऊं घालावें. मागधिकायुक्त मूग मध व तूप यांशीं द्यावे. चूर्ण, मांसलैं-का, वंशलोचन, मध, पिंपळी, लोध्र, चंदन व कमळें हे पदार्थ तुपांत भिजवून त्यांचा धूर नाकांत द्यावा.

श्लेष्मकास.

चित्रक, त्रिफलाचूर्ण, नागरमोथे व त्रिकटु यांचा लेह द्यावा. तिक्तवृत व तिक्त मूग खाऊं घालावे. तिळांचें तेल, मध, त्रिकटु व गोमूत्र यानीं मर्दन केलेले व्योषचूर्णमिश्रित कुलित्थ हे भक्षणास योग्य होत. दंतिमूल, हरिद्रा, हिंग व बृहतीफळ यांची धुरी द्यावी, ह्मणजे कफकासाचा नाश होतो.

ज्वर.

पित्तजनक पदार्थ सेवन केले असतां पित्तजन्यज्वररोग होतो. ज्वरानें अंगास उष्ण घाम येतो व अश्वाचे नेत्र लाल होतात. त्याचे शरीरास बोरीचे पानांचा फेंस लावावा. ताडाच्या ओल्या पंख्यांनीं वारा घालावा. साखर घालून दूध पिण्यास द्यावें. कफ व पित्त यांपासून ज्वर असल्यास दुधांत पांढरीं कमळें मर्दन करून व तूप घालून

त्यांचा लेप द्यावा. दर्भ, काश व इक्षुमूल यांच्या कल्काने मंजिष्ठा व *शर्करा घालून दुधाचा बस्ति करावा. तूप व यव खाण्यास द्यावे. पिण्यास थंड पाणी व खाण्यास हरळी हीं त्यांस देत जावीं. आणि पित्तज्वरास सांगितलेली सर्व क्रिया करावी. पित्तजन्य व कफपित्तजन्य या दोन्ही ज्वरांचा उद्भव क्रोध, अतिश्रम आणि कडू, आंबट व खारट पदार्थांचें फार सेवन यांपासून होतो.

जीर्णज्वर.

अजीर्णाच्या योगानें घोड्याचा आहार मंद होतो, त्याचें मन खेदयुक्त असतें, जंबांनीं चाळतो, मूत्रपुरीष कष्टानें करतो, जंघा सुजतात आणि खूर व मुख या ठिकाणीं व्रण होतात; याप्रमाणें चिन्हें झालीं असतां जीर्णज्वर जाणावा. यास निदान तीन दिवस उपास घालून मग यथायोग्य प्रतिपानें दारूशीं द्यावीं. असें तीन किंवा पांच दिवस करून सप्तरात्रानंतर शिरावेध करावा. अश्व उरानें खाजत असल्यास उरावरची शीर टोंचावी, जंघावर लंगडत असतां जंघेवरची आणि कूर्चावर लंगडत असतां कूर्चावरची शीर टोंचावी. मग प्रतिदिवशीं वाढता पिंड देत जावा. कुटकी, पिंपळी, सुंठ, वेखंड, रामठ व सैंधव यांसहित पिंड द्यावा. अशुद्ध असल्यास पूर्वी सांगितल्याप्रमाणें गुग्गुळ द्यावा.

श्लेष्मज्वर.

कफजनक पदार्थांच्या सेवनापासून कफज्वर होतो. या ज्वराचे योगानें अश्वाच्या नासिकांतून नेहमीं कफाचा स्राव होतो. यास पिंपळी, सुंठ, गुडूची, हळद, वेखंड, राळे, यव, नागरमोथे, व कंटकरोहिणी हे पदार्थ कढवून चतुर्थांश उरवावे व हा कषाय मद्याशीं पाजावा. खाण्यास पंचतिक्तक, सित्धान आणि मूग कटुकासह द्यावे. ते गरम असून त्यांत मध घातलेला असावा. वाळूच्या

पिंडांनीं मस्तक व शरीर यांचे ठायीं घाम काढावा. शंख व जत्रु या ठिकाणची शीर टोंचावी. सन्निपातजन्य ज्वर असतां सर्व ज्वरांचीं चिन्हें त्यांत होतात. तो असाध्य होय. त्यास सर्व ज्वरासारखी क्रिया करावी.

वातज्वर.

खोकला, ताठपणा, मूर्छा, व रक्तासहित कफ इत्यादि वातज्वराचीं लक्षणें होत. प्रहारापासून ज्वर असल्यास वरचेवर जांभया येतात. त्यास पंचवल्कलांच्या कल्कानें मधासहित अश्वाच्या सर्व शरीरास लेपन करावें. पित्तज्वराचीही क्रिया या ज्वरास करावी.

अतिसार.

अश्वास अतिसार, वायु, पित्त, कफ व संनिपात होतो. श्वासाचे वेळीं घोडा संकोच करून अल्प किंवा बहुत शब्द सहित फेंसयुक्त मळाचा स्राव करीत असतां, तो अतिसार वातापासून झाला असें समजावें. अश्वास घाम व दाह होत असून निळा व तांबडा स्राव होत असतां, आणि अश्व मंद व अशक्त होऊन त्यास रोमांच येत असतां, कफजन्य अतिसार जाणावा. याशिवाय लक्षणें होत असतां पित्तजन्य अतिसार, आणि सर्व लक्षणें एकदम होत असल्यास संनिपातजन्य अतिसार, होय.

यावर चिकित्सा अग्निपुराणांत सांगितली आहे तीः—

नागरमोथे, अतिविष, विष्णुक्रांत व चिल्लमालिका यांचा कषाय हा सर्व अतिसारांस नाशक होय.

बृहती, शालपर्णी, पिठवणी, रिंगणी, बेलफळ, सुंठ, कंवठ व पाडळ यांचा कषाय करावा. साळीचे तांदुळांची केलेली पेज, दहीं आ-

णि आम्लवेतस हीं त्यास खाण्यास देऊन नंतर वर सांगितलेला कषाय त्यास प्रतिपान द्यावें, ह्मणजे वातातिसाराचा नाश होतो.

जांभूळ, आंबा व डाळिंब यांचे साल्टींचा कषाय करून मधासहित प्रतिपान द्यावें. अथवा त्यांचें चूर्ण मधाशीं व तेलाशीं द्यावें. जांभूळ आदिकरून जे पदार्थ, त्यांच्या काढ्यांत कुटज व मध घालून तो द्यावा. तांबडे साळीच्या तांदुळांची पेज करून पाजावी. ह्मणजे पित्तातिसाराचा नाश होतो.

कुटज वृक्षाचें बीज, डाळिंब आणि आंबा या साल्टींचें चूर्ण, मातुळिंगाचा रस व सैंधव ह्यांचा लेह करून अश्वास चाटवावा. ह्मणजे कफातिसाराचा नाश होतो.

कृमिकोष्ठपरीक्षा.

अश्व रोड झाला असून त्याचे विष्टेंत कृमि वगैरे जंतु पडतील तर तो कृमिकोष्ठजन्य अतिसार समजावा. श्लेष्मयुक्त कोष्ठ ज्यास असेल तो घोडा मंदाहार, दुर्बळ, व ज्याचें अंग रोमांचानें फुगीर असा होतो; पुरीष हे श्लेष्मानें युक्त व पिच्छल असें होतें; आणि निद्रा व आळस हीं त्यास फार येतात. कृमिकोष्ठ झाल्यास महिनाभर बकऱ्याचें मांस दुधाशीं सिद्ध करून द्यावें. तीळ, दूध, गूळ व दहीं आणि भात एकत्र करून तें अन्न अश्वास द्यावें. वावडिंग, चित्रक, ओंवा, स्थलवेत, कपिला, वेखंड आणि रिष्ठ यांचा कषाय करावा. कपिल्लकाचा कल्क व हा कषाय यांनीं तूप साधून तें वावडिंगचूर्णासहित त्यास पाजावें.

वावडिंग, तूप, पंचक्षार, पडवळ, निंबपत्र, वेखंड, चित्रक, पिंपळी व आलें यांचें चूर्ण एकत्र करून दारूसहित हें पान द्यावें. या चूर्णपानापासून कृमींचा नाश होतो. हा प्रयोग कृमिकोष्ठावर व मंदाग्नीस दीपन करण्यास प्रशस्त होय.

घोड्याचा आहार मंद झाला आहे व कृमि वगैरे नाहींत तेव्हां तें श्लेष्मकोष्ठ जाणावें. त्यास कृमिकोष्ठाचीच क्रिया करावी.

कृमिरोगावर–(१) हिंगणाची साल पावशेर, पळसाचें बीं व चोखोवा ९ टांक, यांचें चूर्ण करून गुळांत कालवून देणें. (२) हिंग, पळसबीं आणि वावडिंगें हीं प्रत्येक ९ टांक प्रमाणें घेऊन चूर्ण करून तें सवदणीचे पाण्याशीं द्यावें. (३) हिरडे, वेहडे, मिरे आणि लसूण, हीं प्रत्येक ९ टांक आणि सुंठ, पिंपळी, सैंधव, वेखंड, वावडिंग, अजमोदा, चोखोवा, गांधीण, घेडिकातरा, शेवग्याची साल, कडसराचें बीं आणि हिंगणाची साल, हीं प्रत्येक ३ टांक घेऊन चूर्ण करून तें चूर्ण गुळाबरोबर कालवून सात दिवस द्यावें म्हणजे सर्व कृमिरोग जातील. हेंच औषध शूळादि सर्व वायूंवर फार गुणकारक आहे. घोड्याचे पोटांत कीड पडते त्यास उपायः–गूळ, हळद, भांग व मीठ हें प्रत्येक पावशेर घेऊन, कुटून, पाण्यांत कालवून व गोळा करून तो गोळा चारावा. आणि तिसरे प्रहरपर्यंत घोड्याला उन्हांत बांधावें. नंतर मोठ्या भांड्यांत पाणी घालून त्यापुढें ठेवावें व एकदम पिईल तितकें पिऊं द्यावें.

मूत्रपरीक्षा.

अश्व आयासयुक्त होऊन थोडें थोडें व फेंसट असें मूत्र करीत असेल तर तो वातमूत्ररोग आहे, असें समजावें. वेदनांनीं पीडित होऊन तो थोडें मूत्र करितो व मुततांना त्याचे केंस कंपायमान होतात, त्यास सन्निपातजन्य मूत्ररोग आहे, असें जाणावें. त्यास शिश्नापासून पार्श्वभागीं बस्तीपर्यंत अभ्यंग करून हळूहळू मर्दन करावें. पाषाणभेद, सुंठ, गोखरू, दोन्हीबृहती, एरंडमूळ, सुविष्णुक्रांत, व शतावरी यांचा पाण्यांत कषाय करून द्यावा. खाण्यास

यवांची पेज करून पाजावी. नंतर वरील कषायाचें प्रतिपान द्यावें. ह्मणजे वातमूत्राचा व दुसरे मूत्ररोगांचा नाश होतो.

शोथ (सूज).

शोथ (सूज) उत्पन्न झाल्यापासून वेदना होऊन, अतिस्थूलता व मृदुता होत असल्यास तो शोथ वातजन्य होय; वेदना, उष्णता, अत्यंत उच्छूनता, काठिन्य व मोटेपणा असल्यास कफजन्य आहे; रक्तापासून शोथ असल्यास तो पित्तजन्य आहे असें समजावें; आणि हीं सर्व चिन्हें होत असल्यास संनिपातजन्य जाणावा. दोन चिन्हें होत असल्यास द्वंद्वजन्य शोथ समजावा. यास प्रथम जळवा लावून शीर टोंचावी. नंतर ही पुढील क्रिया करावीः शोथ वातोत्पन्न असल्यास तैलाभ्यंग करावें. शोपांचा लेप देऊन एरंडाचीं पानें बांधावीं. पिंपळी, सुंठ, वसु, देवदारु, रुई, आणि शिग्रू यांचा लेप द्यावा. लोध्र, एरंड, वायवर्णा व अंकोलक यांचीं मुळें पीठ करून गोमूत्रांत मर्दून त्याचा लेप द्यावा. पंचमूलांचा कषाय तिळाचे तेलाशीं प्रातःकाळीं पाजावा. भोजनांत रसयुक्त भात द्यावा. पित्तजन्य शोथास मंजिष्ठा, धायटी, लोध्र, उपलसरी व नवीन कमळें यांचा लेप द्यावा. व क्षीर (दूध) बस्ति करावा. पानास, दर्भ, काशा, देवनळ आणि ऊस यांच्या मुळ्यांचा काढा शर्करा व मध यांसहित प्रशस्त होय. श्लेष्मशोथास पंचतिक्तकांत सिद्ध केलेलें इष्टक (गोमय) गाईचे तुपांत मिश्र करून त्याचा सिकतापुटांनीं रूक्ष लेप करावा. चवक, व्योष, वावडिंग, एला, कुष्ठ, जिरें आणि सैंधव हीं गोमूत्रांत खलून दारूसहित भोजनास प्रशस्त होत. सन्निपातजन्य शोथ असल्यास सर्व शोथांची क्रिया करावी. व द्वंद्वजन्य शोथ असल्यास रक्तमोक्ष करून दोहोंची क्रिया करावी; ह्मणजे त्या उपायांनीं शोथाचा नाश होतो.

मुष्कपरीक्षा.

ज्या अश्वांचे वृषण दिसण्यांत मृदु असून स्पर्शास कठिण व रूक्ष असे लागतात त्यांस रक्तांड असें ह्मणतात. व त्यास पित्तांडावर सांगितलेल्या सर्व क्रिया कराव्या. ज्याचें अंड उच्च झालें असेल, त्यास मुष्कपर्यंत कीलन (शेंकणें) करावें. अशा अश्वास पुष्कळ भ्रमण करवूं नये. त्याचे शरीरास सतत अभ्यंग करावें. आणि त्रिफलेच्या काढ्यांत गुग्गुळ द्यावा. याप्रमाणें व्रण बुजेपर्यंत क्रिया करावी.

अंत्ररोगपरीक्षा.

पुष्कळ भोजन व स्नान केल्यानंतर, पाठीवर बसून फिरवतांना जो घोडा बसण्याची इच्छा करतो, त्यास तसेंच फिरविलें असतां रक्तप्रकोप होऊन, त्याचें मेहन (शिश्न) शून्य व प्रक्लिन्न (घामेजलेलें) होतें, त्यावर पुटकुळ्या येतात व त्या ठिकाणीं माशा बसतात; त्या घोड्यास औनीत नामाचा अजार झाला, असें समजावें. यास अंडासमीप कोष्ठशोषण करावें. मूत्रकोष्ठास तुपानें सेचन करावें. क्षार, तैल, जल व कोष्ठ हे पानास द्यावे. खैर व क्षीरवृक्ष यांचा सोसे असा गरम काढा करून त्यानें व्रण सेचन करावें. अति तीक्ष्ण पदार्थांचा तुपांत लेप द्यावा. मराली व सिलारस यांची धुरी द्यावी. सात्वण, सालफण, बाहवा, आणि कुटज यांचे सालींचें चूर्ण करून त्याचा लेप करावा. लवण, हाळद, रुई, मिरीं, बिबा, चित्रक आणि कुड्याचीं फळें यांचें तेल काढूनतें गोमूत्राशीं लावावें; ह्मणजे व्रण बुजतो. खाण्यास तिक्तमूग, मध व तेल यांसहित द्यावे.

उदरपरीक्षा.

उदर हें आठ प्रकारचें आहे; वातजन्य, पित्तजन्य, कफज, सं-

निपातज, प्लीहोदर, परिस्रावोदर, आणि आध्मानोदर. तेजास रूक्षता येते, वायु शब्दयुक्त सरतो, मलत्याग करतानां गुद निघतें, आणि आहार मंद होतो, हीं वातोदराचीं लक्षणें होत. पिंवळी विष्ठा, पोट मोठें, घाम, उष्ण शब्द आणि उष्णश्वास हीं पित्तोदराचीं चिन्हें जाणावीं. उदरांत सूज येऊन तें वाढत जातें व शरीरांत आळस व कृशपणा फार येतो, तें कफोदर जाणावें. उदरास व्रण होऊन तें कठिण व मोठें होतें, आणि शरीरास रोडपणा येतो, तें प्लीहोदर जाणावें. अल्प मल होतो, वायु सरतो व रक्त फेंसाळ होतें, तें आध्मानोदर होय. परिस्रावोदर झालें असतां, मूत्रांत दाह कधीं नसतो. अश्व रोड असून त्याचें पोट जलपूर्ण असल्यासारखें दिसतें त्यास उदकोदर आहे, असें समजावें. यास चिकित्सा: पंचमुळाचा कषाय करून त्यांत तेल घालून अश्वास पाजावें. नंतर यव खाऊं घालून तेलांनीं निरूह करावा. पिंपळी, मीठ, क्षारपान, चित्रक व हिंग यांचा कल्क करून त्यांत तेल व महिषादिकांचें मूत्र घालून कढवावें, त्यांत कटुकचूर्ण, स्नुही (शेराचे) दुग्धांत मिळविलेलें घालावें आणि मग अश्वाची शक्ति पाहून त्यास तें तैलपान द्यावें. शक्तिबाहेर अतिपान दिल्यास घोडा मरतो. तैलपानानंतर मृदुग्रासांनीं त्यास भोजन घालावें. असें केल्यानें रोग नष्ट न झाल्यास पुन्हा हीच क्रिया करावी. तुम्रंदती व वेखंड यांचा कल्क करून त्याच्या कषायांत साधलेल्या तुपाचें पान वातोदरावर प्रशस्त होय. वातोदरास सांगितलेली क्रिया श्लेष्मोदरास करावी. संनिपातोदरास सर्वसाधारण क्रिया करावी. प्लीहोदरास त्रिकटुकाचा पिंड करून तो क्षार व सैंधव यांसह द्यावा. नंतर गाईचें अथवा म्हशीचें मूत्र पाजावें. याप्रमाणें अश्वाची शक्ति पाहून प्रतिदिवशीं करीत जावें, म्हणजे प्लीहोदराचा नाश होतो. जी क्रिया वातोदरास सांगितली तीच स्रावोदरास व पित्तोदरास करावी. उदकोदर झालें असतां अश्वास बांधून जमिनीवर पाडावें. आणि

हृदयाच्या खालीं व नाभीचे वर चार अंगुलें छेदन करावें. छेदण्यास शस्त्र एक अंगुल कमळाच्या पानासारखें असावें. तें पोटांत शिरवावें, छेदले ठिकाणीं व्रणावर वस्त्र वेष्टित नळी ठेवून कोष्ठांत हलकेपणा येईपर्यंत पाणी काढावें. तसें करून स्वच्छ पाणी येऊं लागलें म्हणजे तो रोग साध्य असें समजावें. लाल पाणी किंवा रक्त येऊं लागलें असतां असाध्य होय. नंतर नळी काढून व्रणावर तुपांत भिजलेल्या कापडाची पट्टी बांधावी. क्षीरवृक्षाचे कषायांनीं अश्वास वेष्टन करावें आणि त्यास निर्वात प्रदेशीं बांधून तीन दिवस पाणी व अन्न देऊं नये. मग हरळी द्यावी. पाणी क्षीरवृक्षाच्या सालीसहित कढवून त्यांत मध घालून द्यावें. नंतर त्याचे व्रण बुजून कांहीं शक्ति आली म्हणजे यवान्न शिजवून खाण्यास देत जावें.

घोड्याचें पोट दुखतें तेव्हां त्यास औषधः—केळीचा कांदा, केतकीचें धान (दांडा), आणि उंबराची साल, हीं समभाग घेऊन चूर्ण करावें. आणि पाणी घालून तो रस दोनशेर द्यावा. व गाईचें हिरवें दूध २ शेर एकत्र करून तीन दिवस द्यावें, म्हणजे पोट दुखणें बरें होईल.

गांठाळीं झालीं असतां पोट गडगडतें, हागतांना फार कुंथतो, श्वासोच्छ्वास करितो, कृश होतो व स्तब्ध राहतो, त्यास उपचारः—अंगास तेल व तूप चोळावें, उन्हांत बांधावें, आणि टाकळीचा रस १ शेर, तिळाचें तेल अर्धाशेर आणि हिंग ९ टांक अशीं एकत्र करून तें पोटांत द्यावें. असें तीन दिवस पर्यंत करावें.

पोटांत पाणी पितावेळीं जळू गेली तर घशांत असल्यास हातांनीं काढावी; पोटांत गेली असल्यास जैतूनचें तेल पाजावें.

अर्श (मूळव्याध) परीक्षा.

गुदस्थानींचे अर्शरोगानें (मूळव्याधीनें) घोडा रोड, रूक्ष, मं-

दाहार, बळहीन व शिरायुक्त असा होतो. आंमळ, बोर किंवा खारीक या प्रमाणें गुदाचे आंत मांसाच्या गांठी एक, दोन किंवा पुष्कळ येतात; तो अर्श (मूळव्याध) रोग जाणावा. यास चिकित्सा: सहा अंगुळें लांब व चार किंवा तीन अंगुळें रुंद यंत्र करून त्यांत पांच अंगुळें छिद्र ठेवावें. दोन बाजूंस दोन छिद्रें ठेवावीं. एका छिद्रानें छेदादि कर्म करावें. नंतर छिद्रांतून अर्श अवलोकन करून यंत्राचें छिद्र ओढावें. मग लोहशलाकेनें तेथें दाह करावा; आणि जळले ठिकाणीं मध व तूप यांचा लेप करून यंत्र काढावें. मग अश्वास सोडून उठवून कांहीं चालवावें; आणि मस्तकावर व त्रिकावर अति गार पाणी घालावें. त्या रात्रीं घोड्यास घास देऊं नये. प्रातःकाळीं त्रिफलेच्या काढ्यांत गुग्गुळ द्यावा. पिण्यास कढवलेलें पाणी थंड करून द्यावें; व खाण्यास दूर्वा (हरळी) द्यावी. गुग्गुळ त्रिफलेच्या कषायांत सात दिवस देऊन त्यास शक्ति आली ह्मणजे यथेष्टाहार घालून पाहिजे तितकें क्रमानें फिरवावें. वातजन्य व कफजन्य अर्श असला तर अग्नीनें दाह करावा. आणि पित्तजन्य असल्यास दुधानें दाह करावा.

उन्मादपरीक्षा.

अश्वास कफ व पित्त यांपासून जरी उन्माद झाला तरी वातावांचून तो होत नाहीं. वातप्रकोपाच्या कारणांनीं वायु कुपित झाला असतां उन्माद होतो. त्याचीं लक्षणें:—जो पाणी तोंडीत पितो, दांतांनीं लगाम खातो, कधीं तृण आपण होऊन खातो व कधीं खात नाहीं, आणि एकादे वेळेस सावध असतो व कधीं बेसावध असतो; यावरून उन्माद जाणून चिकित्सा करावी. शीतजन्य रोगावर जीं अग्निदाह, भोजन, अभ्यंग व पान इत्यादि कर्मे सांगितलीं आहेत, तीं सर्व करावीं. उन्मादयुक्त अश्व, बांधून पाडिल्याशिवाय

त्यास कोणतीही क्रिया करूं नये. निंबपत्र, वेखंड, कुष्ट, लाक्षा, मीठ, हिंग, गोलोम–खुर–शृंग (गाईचे केश, खूर, शिंग) व सिद्धार्थ या पदार्थांचें चूर्ण करून गुल्मकाष्ठाच्या अग्नीवर तुपासह त्याचा धूर द्यावा. ह्मणजे उन्मादाची शांति होते.

विषपरीक्षा.

स्थावर आणि जंगम असें दोन प्रकारचें विष असतें. त्यांत प्राण्यापासून उत्पन्न झालेलें विष तें जंगम, आणि मूळापासून झालेलें तें स्थावर होय. अंगास घाम येणें, रोमांच उभारणें, अरुचि, अवयवांत ताठपणा, निर्वाणमूलता, लाळ गळणें व बहुत अन्न खाणें हीं सर्पदंश झाल्याचीं चिन्हें जाणावीं. हींच स्थावर विषांचींही होत. जंगम विषापासून लाळ गळते व सूज उत्पन्न होते; व इतर सर्व दंशांचींही चिन्हें होतात. विषपरीक्षा करून अभ्यास आधीं तूप पाजावें. नंतर उद्वर्तनादिक करावें. सर्पदंश झाल्यास तांदुळजाच्या व बिल्वाच्या आणि कवठाच्या मुळ्या गाईच्या तुपांत मर्दन करून पाजाव्या. शस्त्रानें स्कंधावरची शीर टोंचावी, आणि उद्वर्तन करावें.

अपस्मारपरीक्षा.

घोडा बलवान् व स्वस्थ असून अकस्मात् जमिनीवर पडतो, तो अपस्मारी होय. यास उन्मादास सांगितलेली सर्व क्रिया करावी.

षट्पदादिभक्षणपरीक्षा (पोटांत माशा वगैरे गेल्यास उपाय).

अश्वास पांढरेपणा, कपिलत्व आणि हिरवेपणा येऊन, शोष, मूर्च्छा, भ्रम आणि अधिक श्वास असे विकार झाले असतां, सर्पदंशाची क्रिया व औषधउपचार करावे.

उत्कर्णपरीक्षा.

ज्याचें पुच्छ व कान ताठ, व शरीर शिथिल होतें, त्यास उत्कर्णरोग झाला असें जाणावें. त्यास वसाघृत आणि तेल यांनीं अभ्यंग करावें. प्रसारिणी आदिकरून तेलांनीं अनुवासन करावें. जवस, लवण, तीळ व यव यांचें कांजिक (पेज) त्यास प्रशस्त होय. जांगलिक रस हा पंचमूलांचा कषाय व तेल यांच्याबरोबर पिण्यास द्यावा. अथवा गूळ व तेल यांसह सुरा पिण्यास द्यावी. कुत्र्याच्या रोंपटाचें व डोक्याचें, व मेंढा, मांजर व बकरा यांचें ताजें रक्त पंचमूलांच्या काढ्यांत द्यावें. त्याच कषायांत मांसरस, तीळ व तांदूळ घालून त्यांची कणेर करून, ती तिळाचें तेल, तूप व वसा यांसहित भोजनास द्यावी. हरळीचा घांस व पिण्यास उष्णोदक द्यावें. त्रिवृत्तादिक तेलांनीं अश्वाचे कान भरावे. या क्रियेनें जर उत्कर्णरोग शांत झाला नाहीं तर उदर, कपाळ व कान यां ठिकाणीं चंडी द्यावी. ज्यास या रोगापासून ग्रासाचा द्वेष, नेहमीं अश्वान (दम), मूत्रविष्ठा करितांना क्लेश, लाळ, व्रण व श्वास होतात, तो अश्व जगत नाहीं. उत्कर्णरोगी अश्वास सफेत व स्निग्ध असें स्थान व प्रावरणें असावीं.

वातोद्भवरोगपरीक्षा.

ज्या अश्वाची मान कधीं वांकते, वर होत नाहीं किंवा वर झाली असतां वांकत नाहीं, आणि कधीं अगदीं ताठ होते त्यास दारुण वातरोग झाला असें समजावें. ज्याची मान वर सांगितल्याप्रमाणें असून तिच्यांत स्फुरण (कंप) असतें, आणि अश्वाचा आहार मंद होतो, तेव्हां त्या रोगास (मंन्याचाली) ह्मणतात. घोडा निश्चल असून ज्याची हनुवटी चंचळ होते व लाळ फार गळते, त्या रोगास हनुग्रह असें ह्मणतात. घोड्याची पाठ ताठून उंच होते, तो पृष्ठ-

ग्रहरोग होय. ज्याचा एक कान लांब होतो व अर्धे शरीर वाकतें, त्यास एकांग रोग जाणावा. जो अश्व पूर्वी संग्रामांत असून पुढें अगदीं फार दिवस स्वस्थ होतो, त्यास मृगरोग होतो. त्या योगानें अश्वास अतिशय जांभया येतात. जो घोडा प्रथम पूर्व भागानें चालून नंतर मागला भाग उचलतो, ज्याचें अंग ताठतें व वेदना उत्पन्न होतात, त्यास आक्षेपकरोग जाणावा. जो अश्व मागल्या भागाचे ठिकाणीं वक्र होऊन मंडलाकृतीनें चालतो व मंदाहार होतो, त्यास भूमिक्षांतरोग ह्मणतात. अश्व पृष्ठभागानें चालून भूमीवर एकदम बसतो, त्यास कपोतकनिषादिरोग ह्मणतात; या रोगांतून घोडा वांचण्यास फार आयास होव. ज्याच्या हनुवटी विकार पावतात, व नाक भेद पावतें, त्यास अर्दितरोगी ह्मणतात. हे सर्व वातोद्भव रोग जाणावे. या रोगास उत्कर्ण रोगाची चिकित्सा करावी. कपोतकनिषाद रोगास पान मात्र विशेष आहे. तें हें:—हिरडे, शुंठी, लंबुक व साहस हे पदार्थ चूर्ग करून, तें तिळाचे तेलांत मिश्र करून पाजावें.

श्वासबलपरीक्षा.

कफ व वात यांपासून झालेली सिरागत सूज, तिच्या योगानें घोडा अति वेदनायुक्त होऊन खंजतो, व त्याचे सांधे ताठतात, त्यास वैद्यानें वसातेल व तूप हीं पांच क्षारांशीं मिश्र करून पाजावीं, व शोथास त्यांनीं मर्दन करावें. तग्वासक आणि करंज यांनीं शोधन करावें. पिण्यास तेलपाणी द्यावें व खाण्यास हरळी द्यावी. पंचमूळाचा कषाय करून त्यांत पिंपळीचा कल्क व दूध घालून त्यानें बस्ती करावा. त्रिवृततैलानें तैलानुवासन करावें. आणि मग अग्नीनें दाह करावा. ह्मणजे त्यास सुख होतें.

हाडें मोडतात त्यांचें वर्णन.

ही इजा दोन प्रकारची आहे. एक साधी व दुसरी विशेष. ही इजा पडल्यानें किंवा लागल्यानें किंवा भरधांव धांवतांना किंवा खड्यांत पडल्यानें होते. परंतु जितकीं हाडें मांसांत आहेत त्यांची माहिती होणें फार कठिण आहे.

ज्या हाडाजवळ मांस थोडें आहे, तीं हाडें लवकर समजतात. पायाचीं हाडें तुटलीं तर तीं चार तऱ्हेनें समजतात. पहिला प्रकार, पाय जमिनीवर टेंकीत नाहीं. दुसरा प्रकार, पाय हालवतो. तिसरा प्रकार, कान लावून ऐकलें तर तुटलेले हाडाचा आवाज, हाडावर हाड घांसतें त्यामुळें ऐकूं येतो. आणि चवथा प्रकार, तो पाय सुजलेला राहतो. कारण, त्याच्या वरचें मांस आंवळून जातें व त्यापासून त्यास फार इजा होते व त्या ठिकाणीं सूज येते. टिबिया ह्मणजे पाठीमागले पायाच्या मांडीचें हाड, ह्युमरस ह्मणजे पुढील पायाच्या मांडीचें हाड, आसिटेब्यूलम ह्मणजे फऱ्यावरचा सर, इलियमसॉफ्ट ह्मणजे गुदद्वाराच्या हाडाचें टोंक, आणि स्क्याप्यूला ह्मणजे खुब्याचें हाड, इतक्या ठिकाणचीं हाडें मोडलीं तर घोडा बरा होत नाहीं. अशा स्थितींत त्यास मारून टाकावें.

थोडे उमरीच्या वयांत घोडा असून जर त्याचें हाड तडकलें तर वळू घोडा करण्याकडे त्याचा उपयोग करावा.

उपाय—हाड जागचे जागेवर बसवावें आणि गव्हांची कणीक त्याजवर ठेवून पट्टी बांधावी. कपड्याची झोळी करून त्यांत दुखावलेला भाग ठेवावा. कारण, त्यास धक्का लागून तो भाग हालूंनये आळशीच्या तेलाचा जुलाब द्यावा. ताप येत असल्यास नायट्रिक इथर पाण्यांत द्यावें. आरटरी ह्मणजे चांगल्या रक्ताची शीर, व्हेन ह्मणजे काळ्या रक्ताची शीर, व नर्व्ह ह्मणजे ऐकूं येणारी शीर ह्यांच्या योगानें व फैबरन यांच्या योगानें मांस जमतें.

खालच्या अबड्याचें हाड मोडलें तर रबर ऊन पाण्यांत भिजवून त्या जागेवर ठेवावें, आणि त्याच्यावर गरम कपडा बांधावा. दोन दिवस घोड्यास खाण्यास घालूं नये व कदाचित् घालणें झाल्यास भुस्सा किंवा शिजवलेला दाणा खाण्यास द्यावा. व रेक्टस ह्मणजे गुदद्वार यांत पिचकारी मारावी. कमरेच्या हाडाच्या बाजूचें टोंक तुटलें तर बरें होतें; पण मणका तुटला तर बरा होत नाहीं. घोडा मरून जातो.

सामान्य परीक्षा.

वातादि दोषांचीं सामान्य लक्षणें व चिकित्सा आतां सांगतों. ज्या कुशींत अध्मान, क्षुद्रकास, कृशत्व, पुष्कळ व फेंसाळ मूत्र, आहार मंद आणि शरीरावर दीप्ति हीं लक्षणें असतील, त्यास वातरोगापासून शोष झाला आहे असें समजावें. श्वासाचे ठिकाणीं दुर्बळत्व, तृषादाह आणि रोमांचे ठिकाणीं संकीर्णता (मिश्रण) हीं पित्तशोषांचीं लक्षणें होत. वेगवेगळे व लांब केश, मंद आहार, क्षीणता, अतिइच्छा, शीतल शरीर, जास्त आळस, आणि जिव्हेंत भेद हीं चिन्हें कफशोषाचीं होत. हीं सर्व चिन्हें होत असल्यास संनिपातशोष होय. तो शोष असाध्य अथवा कष्टसाध्य जाणावा.

वरील वातादि शोषांपासून अश्वाचें शरीर दुर्गंधयुक्त होतें व दिवसेंदिवस क्षीण होतें. यास चिकित्साः—

पंचमूळांच्या कषायांत मांसाचा रस करून, त्याच्याशीं तेल, मीठ घालून, शाल्यान्न(भात)युक्तीनें खाऊं घालावा. ह्मणजे त्याचे अग्नींत बळ उत्पन्न होतें. मग प्रसारिणी आदीकरून तेलांनीं त्यास स्थिर करावें. या उपायानें वातशोषार्त अश्व जर बरा न होईल तर त्यास दूर्वा, साळीचा भात आणि देवनळाचीं व काशाचीं मुळें हीं एकत्र मंदअग्नीनें कढवून त्यांत मांस घालून तें द्यावें. यवान्न घृतासहित खाऊं

घालावें. पित्तशोष असतां वसा व निंब यांचा कषाय करून त्यांत मेंढ्याचें, हरणाचें अथवा पक्ष्याचें मांस कुळित्थासहित शिजवून त्या रसाशीं मद्य व कटुक घातलेले तीळ खाऊं घालावे. कफशोषार्त अश्वास अग्नीचें दीपन केल्यावर हा उपाय करावा. संनिपातोद्भव शोष असल्यास तिन्ही उपाय करावे. सर्व प्रकारचे शोषांस चितेचा धूर द्यावा आणि जलचराचे रक्तांत पिंपळीचें चूर्ण समभागानें घालून त्याचें अंजन डोळ्यांत घालावें.

साध्यासाध्य परीक्षा.

ज्याचा एक व्याधि शांत होतो तोंच दुसरा उत्पन्न होतो, तो दूर होतो इतक्यांत तिसरा उद्भवतो, ज्या अश्वाची पूर्वप्रकृति विपरीत होते, देह पुष्ट होतो, परंतु गंधाचें ज्ञान ज्यास नाहींसें होतें, ज्याला सात दिवस औषध दिलें असून कांहीं विशेष होत नाहीं, जो अग्निदीप्त असून क्षुब्ध होत नाहीं, ताडण, दाह व काकादि दंश हे जो चुकवीत नाहीं, हनुवटी व जीभ अति ताठ किंवा अति सैल होते, निराहार असून पुष्ट असतो, आहारापासून ज्याची तृप्ति होत नाहीं, ज्याचें पूर्वांग दाहयुक्त आणि मागलें शरीर शीतल असतें, नाभी, उर व गुद या ठिकाणीं शैत्य असून जो शीतोष्ण सहन करतो, ज्यास शूलाध्मान आहे, पापणी लवत नाहीं, चालतांना क्लेश होतात, फार कांपतो, श्वास फार सोडतो, ज्याचें शिश्न शून्य होतें, ज्याची विष्टा कफयुक्त, फेसाळ व पांढरी होते, मलावरोध होतो, सूज कठिण असते, अतिसारानें क्षीण झाला असतां अंगास सूज येते, पश्चात् मूत्ररोग होतो, शिश्न झांकत नाहीं, डोळे निस्तेज होतात, सर्व अंगापेक्षां द्रोणी विस्तीर्ण होते, आणि ज्यास श्वास, घाम व मूत्र फार होतात, हे सर्व अश्व औषधादिकांनीं असाध्य होत. आतां साध्य अश्वः—जो पुष्कळ पान करतो, शरीर झाडतो, पुच्छ फार हालवतो आणि घोडीशीं रम-

माण होतो तो साध्य होय. ज्याचें नेत्रेंद्रिय तेजस्वी आहे, ज्याचे बाहुंस घाम येतो आणि शिंक व मूर्छा येतांना ज्याच्या शिरा प्रफुल्लित होतात, तो साध्य होय. परंतु साध्य अश्वाची उपचाराविषयीं कांहीं काळ हयगय केली असतां तेच असाध्य होतात.

आयुष्यपरीक्षा.

शालिहोत्रादि मुनींनीं सांगितल्याप्रमाणें अश्वाचें अरिष्टलक्षण असें आहे: जो घोडा खिन्न, दीन व निस्तेज असतो, व दिलेलें खात नाहीं आणि रोग नसतां अशी स्थिति ज्याची असते, तो अश्व आयुष्यहीन होय. ज्याच्या कपाळावर व पुच्छाचे ठिकाणीं कंप उत्पन्न होतो, ज्याचे पुच्छाचे केश गळतात आणि ज्यास दमा असतो तो अश्व ७ दिवस जगतो. जो आपलें शिश्न बाहेर करून वाघाप्रमाणें बसतो, ज्याचे दांत एकाएकीं गळून पडतात, तालु आणि जीभ काळी होते ते अश्व गतायुषी जाणावे. ज्यास स्नान घातलें असतां प्रथम पोट वाळतें, त्याचें मरण १ महिन्यानें होतें. नाक, शिश्न, डोळे, व गुद या ठिकाणीं काळें रक्त होतें; व ज्याचे स्तन, उदर, नेत्र व गुद हे मूत्राप्रमाणें पीतवर्ण होतात, तो अश्व गतायुषी होय. ज्याच्या विष्ठामूत्रास दुर्गंध येतो, ज्यास हर्ष झाला असतां कांपतो, तोंडांतून घांस गाळतो, ज्यावर माशा बसतात, डोळ्यांस निमेष होतो, शीर टोंचली असतां पांढरें रक्त निघतें, मस्तक, टाळू, कंठ व हृदय हीं शुष्क होतात, कानांनीं ऐकूं येत नाहीं, डोळ्यांनीं दिसत नाहींसें होतें, स्पर्शज्ञान नष्ट होतें, शेंपूट हालवीत नाहीं, कान ताठ करतो, रक्तनाश होतो, मुखानें लाळ गाळतो, दाट घाम येतो, टाकूस फोड येतात, नेत्र निस्तेज असतात, खाण्या पिण्याचा ज्यास कंटाळा येतो आणि झोंपेवांचून झुलतो, या चिन्हांपैकीं एकही चिन्ह ज्यास झालें असेल तो अश्व एक महिन्यापर्यंत जगतो. पूर्वीं रोगी असून घोड्या-

स कांहीं उपचार न होतां वरील चिन्ह झालें तर तो पांच दिवसांतच मरतो. ज्याचे मानेवर गोळा व खाउचे ओंठावर पांढरेपणा येतो, व मूत्रांत रक्त पडतें, तो सात दिवसही जगत नाहीं. ज्याचा श्वास उष्ण होतो, शरीर घामेजतें आणि जीभ बर्फासारखी होते, तो अश्व अल्पायुषी जाणावा. ज्याचे अश्रु लाल व नेत्रप्रांत पांढरे होतात, ते अश्व अल्पायुषी होत. ज्याचे नेत्र घामेजल्या मांसाप्रमाणें किंवा रक्तवर्ण व निळे असून त्यांत काळे पिवळे बिंदु उत्पन्न झाले असतील तो अश्व अल्पायुषी होय. ज्याचे नेत्रांत अनेक रंग होतात तो अश्व सात दिवसही वांचत नाहीं. एक डोळा तांबडा असून दुसरा निळा असेल व नेत्रप्रांत निळे व पिवळे असतील तर त्या अश्वास तीन महिने आयुष्य जाणावें. ज्याच्या नेत्राजवळ अनेक रंगाच्या रेषा आहेत व नेत्र फुटीर आहेत तो महिनाभर जगतो.

नेत्रांत पांढरेपणा व नेत्रप्रांतांत रेषा दिसत असल्यास दोन महिने जगतो. सहा महिन्यांनीं मरणाऱ्या घोड्याचे नेत्रांत अनेक बिंदु उत्पन्न होतात. ज्याचे नेत्र नील होतात तो अश्व ७ महिने, ज्याच्या नेत्ररंगांत व्यत्यय येतो, नेत्रप्रांत व नासिका येथील रंग बदलतो, तो दहा महिने जगतो. त्यांची दृष्टि रूक्ष होते आणि वातानें पांढरी, पित्तानें पिवळी किंवा तांबडी, कफानें पांढरी व पाण्याच्या योगानें कृष्णवर्ण याप्रमाणें दृष्टींत विकार होतात.

घोड्यांस उलट्या होतात त्यांजवर इलाज.

घोड्यांचे बेंबीजवळ डाग द्यावा. डाग देण्याची कृति प्रस्तुत भागांतील पृष्ठ २६ याजवर लिहिली आहे, ती पहावी. फारच उलट्या होतील तर तंगाखालीं रक्त काढावें. रक्त काढण्याचे प्रकार पृष्ठ २१ याजवर लिहिलेले पाहावे.

२. दुसरा उपचार—काथ एक पैसाभार, लवंग जंगली ६ सहा

मासे, स्पंज १॥ दीड पैसाभार, फटकी १॥ दिड पैसाभार, शंखजिरें २ दोन पैसेभार, संगपछिता २ दोन पैसेभार, आणि कापूर ६ सहा मासे, हे सर्व जिन्नस पाण्यांत घालून त्यांचा काढा घोड्यांस पाजावा, तो काढा शेरभर पाण्यांत कढवून पाऊणशेर उरला ह्मणजे, थंड झाल्यावर पाजावा.

जुलाब होण्याविषयीं उपाय.

१. बामझाडाचीं पानें एक शेरभर आणि शिककई अतपाव. बामझाडाचीं पानें बारीक करून रस काढावा. त्यांत शिककई बारीक करून एकत्र करावी. आणि तो रस नळीनें घोड्यास पाजावा. हें औषध अनुभविक आहे.

२. गव्हाचें पीठ पावशेर व कोपलशेर. कोपलशेराचे रसांत पीठ मिळवावें. मग हरभऱ्या एवढ्या गोळ्या कराव्या. एक किंवा दोन गोळ्या सकाळीं द्याव्या. जुलाब झाल्यावर ते बंद होण्यास उतम अर्धाशेर दह्यांत शिजलेले तांदूळ घालून खाण्यास द्यावे.

३. सोनामुखी अतपाव, खडीसाखर पावशेर, मध उत्तम पावशेर, आणि बाळहिर्डे एक पैसाभार, यांच्या मधांत आठ गोळ्या कराव्या. दररोज दिवशीं एक गोळी द्यावी. हें औषधही अनुभविक आहे.

मोठे घोड्यास जुलाब होण्यास उपाय.

१. जेपाळाचे बियांचा मगज. लहान घोड्यास चतुर्थांश व मोठ्या घोड्यांस अर्ध्या बीचा मगज पुरे होतो. त्यांत दोन तोळे पांढरें जिरें मिळवून गुळांत द्यावें. त्यावर गरम पाणी पिण्यास द्यावें. तें नळींत घालून पाजावें. लहान घोड्यास एक तोळा पांढरें जिरें द्यावें ह्मणजे जुलाब होतील.

घोडा कसाही प्रकारचा अजारी झाला तर खालीं लिहिलेला जुलाब त्यास द्यावाः—

१. हिर्डे, बाळहिर्डे, अमला, सेरे, (हिंदी), सदखू झाडाची साल, चित्रकाची साल, सुंठ, गेरू, पित्तपापडा, रिंगणी, निंबझाडाची साल व मुळी, किरमणीओंवा, आणि धावडी हे सर्व जिन्नस बारीक करावे. त्यांपैकीं दोन पैसेभार घेऊन आठशेर पाण्यांत कढावावे. त्यांतील एकशेर पाणी राहिल्यावर थंड करून घोड्यास पाजावें. असें दोन आटवडे करावें, सर्व रोग बरे होतील.

घोट्यानें औषध पाजण्याची रीति.

औषधाचा गोळा देण्यापेक्षां घोट्यानें औषध देणें हें मोठें मेहनतीचें काम आहे; आणि शिवाय तें औषध देतांना वांया फार जातें. जेव्हां औषध घोड्यास लौकर लागू झालें पाहिजे अशी भावना दिसते, तेव्हां गोळीच्या रूपानें जर औषध दिलें तर तें लौकर लागूं पडणार नाहीं; सबब पातळ औषध घोट्यानेंच दिलें पाहिजे. घोटा बैलाचे शिंगाचाच करावा. त्या शिंगाचें टोंक तिरकस कांपावें. तें असें कीं, त्याच्या वाटें चिरकंडी जाईल. अथवा तोटी सारखें तोंड केलें तरी चालेल. ह्मणजे भराभर पोटांत औषध जाईल. केव्हां केव्हां घोट्याचे ऐवजीं बाटलीनें जरूरीचे वेळेस औषध पाजितात. परंतु कांचेचें भांडें भंगशिर आहे, आणि त्यापासून कांहीं भयंकर होतें; सबब बैलाचे शिंगाचाच घोटा असावा. घोटा देते समयीं जशी गोळी देतांना घोड्याची जीभ धरितात, तशी धरावी. नंतर घोड्याचें तोंड वर पुष्कळ उंच धरावें. आणि हळूंहळूं औषध त्या घोट्यानें त्याचे गळ्यांत सोडावें. सगळें औषध गिळून जाई तोंपर्यंत घोड्याचें तोंड वरतीं धरलें पाहिजे, सोडूं नये; जर औषध देतांना त्यांतील कांहीं सांडलें तर त्या ऐवजीं दुसऱ्यानें तसें औषध तितकेंच घेऊन

पाजावें. घोडा जर ढांसेल किंवा ढांसण्याचा यत्न करील तर डोकें खालीं करून मोकळेपणानें ढांसतां येण्यासाठीं आणि ढांसतांना तें औषध त्याचे श्वासनळींत जाऊं नये, यासाठीं घोड्याचें डोकें लागलेंच सोडावें. घोडा आतां ढिसेल असें चिन्ह दिसतांच जर लागलेंच डोकें सोडून दिलें तर कांहीं औषध श्वासनळींत जाईल, आणि घोडा मरेल; ह्मणून त्याविषयीं खबरदारी ठेवावी.

ढाळक देण्याची रीति.

जेव्हां ढाळक द्यावयाचें असेल तेव्हां धान्याचा भुसा किंवा कोंडा दोन किंवा तीन रात्रींपर्यंत द्यावा, दाणा देऊं नये. ह्मणजे त्याचा कोठा मोकळा राहील, बद्धकुष्ठ राहणार नाहीं. कोठा नरम करून ढाळकाचें औषध दिलें असतां लौकर लागूं होतें. व मळ निघून येतो. जर याप्रमाणें न केलें तर पक्वाशयांत जो अन्नाचा कठिण मळ झालेला असतो, तो गुदद्वारावाटे लवकर बाहेर येत नाहीं. आणि गुदद्वारावर दाब पडून गुदद्वार सुजेल. ढाळक देणें तें दिवसाचे मध्यवेळीं द्यावें. नंतर घोडा तबेल्यांतून बाहेर काढूं देऊं नये. आणि भुश्याबरोबर त्याला पाणी पाजावें. तो जितकें थंड पाणी पिईल तितकें भुश्याबरोबर द्यावें. दुसरे दिवशीं सकाळीं एक तासपर्यंत घोडा थोडा बाहेर फिरवावा. ह्मणजे जर त्याला पोटांत औषध लागूं झालें नसेल तर लागूं होईल. घोड्याचें शेंपूट दोरीनें बांधून ठेविलें पाहिजे ह्मणजे शेपटीची मळानें वाण होणार नाहीं. घोडा एक तास फिरविल्यावर जर जुलाब लागू न होईल तर त्याजवर बसून थोडा दुडकी चालीवर फिरवून आणावा, इतकेंही करून जर जुलाब लागूं न होईल तर पुनः आणखी बारा वाजतां त्यास फिरावयास न्यावें. घोड्याला जसा जुलाब लागूं व्हावा तसा लागूं झाला ह्मणजे त्याला घरीं आणून तबेल्यांत बांधावें. मग कोणतेही कारणानें त्याला बाहेर काढूं नये.